ISSN 2230-7745

# समाजशास्त्र संशोधन पत्रिका

## मराठी समाजशास्त्र परिषद

वर्ष ३४ वे    अंक - २१ वा    फेब्रुवारी-२०१७    किंमत रु. ५०/-


रत्नागिरी जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षणाची स्थिती
प्रा.आनंद आंबेकर

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा लोकसंख्या नियंत्रण विषयक विचार
प्रा. प्रियदर्शन भवरे

महाराष्ट्रातील आदिवासींचे आर्थिक जीवन : समस्या आणि उपाययोजना
प्रा. वसंत मोरे

केसापूर गावातील प्रकल्पग्रस्तांच्या सामाजिक, आर्थिक स्थितीचा अभ्यास
प्रा. नंदकुमार कुकलारे

आदिवासींचे मानवी हक्क आणि वास्तवता
डॉ. जयश्री महाजन

महात्मा गांधी तंटामुक्त अभियान बनले लोकचळवळ
प्रा. राजकुमार भगत

जागतिकीकरणाचे परिणाम- एक समाजशास्त्रीय अभ्यास
प्रा.प्रकाश कांबळे

रत्नागिरी तालुक्यातील जलयुक्त शिवार अभियान अंमलबजावणीचे अध्ययन
प्रा. सचिन सनगरे

महाराष्ट्रातील रामोशी-बेरड या भटक्या विमुक्त जमातींची सामाजिक चळवळ
प्रा.सौ.सुषमा जाधव

विमुद्रीकरणाचे (चलनबदलाचे) समाजावरील सामाजिक व आर्थिक परिणाम
डॉ. दादासाहेब मोटे

भारतीय संविधान आणि मानवी हक्क
प्रा.मनाली शेटे

२६ व्या अधिवेशनाचा अहवाल
सचिव, म.स.प.


मराठी समाजशास्त्र परिषदेचे मुखपत्र

# मराठी समाजशास्त्र परिषद

(नोंदणी क्र. महाराष्ट्र/२७-८३ औरंगाबाद)

द्वारा- समाजशास्त्र विभाग, नाइट कॉलेज ऑफ आर्टस् अॅण्ड कॉमर्स, कोल्हापूर.


## - कार्यकारी मंडळ -

**अध्यक्ष** : डॉ. महेंद्रकुमार जाधव

**सचिव** : डॉ. अरुण पौडमल

**कोषाध्यक्ष** : डॉ. संध्या पौडमल

**कार्यकारणी सदस्य** :

डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण
स्वा. रा. ती. म. विद्यापीठ, नांदेड

डॉ. ज्योती पोटे
मुंबई विद्यापीठ, मुंबई

डॉ. सिंधु काकडे
एस. एन. डी. टी. विद्यापीठ, मुंबई

डॉ. प्रशांत सोनवणे
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

डॉ. दीपक पवार
रा. सं. तु. म. विद्यापीठ, नागपूर

डॉ. सुभाष पवार
सं. गा. म. विद्यापीठ, अमरावती

डॉ. विकास शेवाळे
सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे

प्रा. दिवाकर उराडे
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

प्रा. प्रविण घोडेस्वार
य. च. म. मु. विद्यापीठ, नाशिक.

ISSN 2230-7745

# समाजशास्त्र संशोधन पत्रिका

## मराठी समाजशास्त्र परिषद

वर्ष ३४ वे | अंक - २१ वा | फेब्रुवारी-२०१७ | किंमत रु. ५०/-

मुख्य संपादक : डॉ. महेंद्रकुमार जाधव

कार्यकारी संपादक: डॉ. अरुण पौडमल
डॉ. संध्या पौडमल

अतिथी संपादक: डॉ. शैलजा माने
डॉ. प्रतिभा देसाई
डॉ. नलिनी बोरकर

संपादक समिती सदस्य: डॉ. संजय कोळेकर
डॉ. शाम सोमवंशी
डॉ. सुजाता गोखले
डॉ. अर्जुन जाधव
डॉ. अशोक गायकवाड
डॉ. प्रतिभा अहिरे
डॉ. नंदा कंधारे
प्रा. प्रविण घोडेस्वार

संपादकीय सल्लागार मंडळ
डॉ. एस.एन. पवार
डॉ.पी.एम. शिंदे
डॉ.पी.के. कुलकर्णी
डॉ.डी.यु. मोटे

संपर्क पत्ता:
अध्यक्ष, मराठी समाजशास्त्र परिषद,
द्वारा: समाजशास्त्र विभाग, नाइट कॉलेज
ऑफ आर्टस् अॅण्ड कॉमर्स, कोल्हापूर ४१६ ००२
www.mspmonline.com
E-mail: marathisocio@gmail.com
टंकण व मांडणी:
श्रीकांत कॉम्प्युटर्स अॅण्ड पब्लिशर्स
कोल्हापूर-०९८९०४९९४६६

टीप: या अंकातील लेखकांनी व्यक्त केलेल्या मतांशी संपादक, संपादक मंडळ तसेच प्रकाशक, मुद्रक सहमत असतीलच असे नाही.

# अनुक्रमणिका



| अ.नं. | शोधनिबंधाचे शीर्षक | लेखक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | रत्नागिरी जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षणाची स्थिती | प्रा.आनंद आंबेकर | ५ |
| २ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा लोकसंख्या नियंत्रण विषयक विचार | प्रा. प्रियदर्शन भवरे | ११ |
| ३ | महाराष्ट्रातील आदिवासींचे आर्थिक जीवन : समस्या आणि उपाययोजना | प्रा. वसंत मोरे | २० |
| ४ | केसापूर गावातील प्रकल्पग्रस्तांच्या सामाजिक, आर्थिक स्थितीचा अभ्यास | प्रा. नंदकुमार कुकलारे | २६ |
| ५ | आदिवासींचे मानवी हक्क आणि वास्तवता | डॉ. जयश्री महाजन | ३२ |
| ६ | म. गांधी तंटामुक्त अभियान बनले लोकचळवळ | प्रा. राजकुमार भगत | ३६ |
| ७ | जागतिकीकरणाचे परिणाम- एक समाजशास्त्रीय अभ्यास | प्रा.प्रकाश कांबळे | ४० |
| ८ | रत्नागिरी तालुक्यातील जलयुक्त शिवार अभियान अंमलबजावणीचे अध्ययन | प्रा. सचिन सनगरे | ४६ |
| ९ | महाराष्ट्रातील रामोशी-बेरड या भटक्या विमुक्त जमातींची सामाजिक चळवळ | प्रा.सौ.सुषमा जाधव | ४९ |
| १० | विमुद्रीकरणाचे (चलनबदलाचे) समाजावरील सामाजिक व आर्थिक परिणाम | डॉ. दादासाहेब मोटे | ५८ |
| ११ | भारतीय संविधान आणि मानवी हक्क | प्रा.मनाली शेटे | ६६ |
| १२ | २६ व्या अधिवेशनाचा अहवाल | -- | ७० |

# संपादकीय

समाजशास्त्र संशोधन पत्रिकेचा २१ वा अंक प्रकाशित करताना अत्यंत आनंद होत आहे. आज जागतिकीकरणाच्या बदलत्या काळाबरोबर नवे प्रश्नही निर्माण होत आहेत. नवनव्या समस्या, जाणिवा निर्माण होताना दिसतात. असहिष्णुतेच्या वातावरणात शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक क्षेत्रांचे व्यापारीकरण, बाजारीकरण प्रचंड मोठ्या प्रमाणात वाढताना दिसत आहे. अशा काळात मानवी मूल्यांचा ऱ्हास होत असल्याचे दिसून येत आहे किंबहुना तो होतोच. राष्ट्रीय एकात्मतेला, एकसंघतेला नवे आवाहन उभे रहात आहे. सर्वांगिण सर्वकश बदलाची म्हणजेच व्यवस्था परिवर्तनाची दिशा अधिक तीव्र करण्याची गरज या काळाची किड बनली आहे. अशावेळी राष्ट्रीय ऐक्याची आणि एकात्मतेची वैश्विक विचारसरणी आत्मसाद करण्यासाठी प्रस्तुत अंकासाठी महाराष्ट्र राज्यातील लेख मागविण्यात आले आहेत. त्यांचे अभ्यासपूर्ण विचार समाजापर्यंत पोहचवण्याची आवश्यकता आहे. सदरच्या २१व्या अंकामध्ये एकूण ११ शोधनिबंधाचा समावेश करण्यात आलेला आहे.

प्रा. आनंद आंबेकर यांचा शोधनिबंध 'रत्नागिरी जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षणाची स्थिती' यामध्ये सदर जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षणाचे स्वरूप व प्राथमिक शिक्षणाची स्थिती जाणून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. सदर शोधनिबंधाचे सामाजिक दृष्टिकोनातून १९९७ ते २०१३ पर्यंत प्राथमिक शिक्षणामध्ये गुणात्मक वाढीसाठी शिक्षण संस्था व गळतीचे प्रमाण कमी करण्याकरिता प्रशासन व काही जनप्रतिनिधी यांनी प्रयत्न केलेला दिसून येतो.

प्रा. प्रियदर्शन भवरे यांनी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा लोकसंख्या नियंत्रण विषयक विचार' या शोधनिबंधात राज्यघटना, समाज, राजकारण, धर्म, अर्थकारण, शिक्षण इत्यादी विविध क्षेत्राबद्दल मूलगामी चिंतनाविषयी डॉ. आंबेडकरांचे विचार मांडलेले आहेत. त्याचप्रमाणे झोपडपट्ट्यांचा, लहान शेतकरी, शेतमजूर, दलित आणि आदिवासी समाज यांच्यासाठी कुटूंब नियोजनाचा प्रसार व्हावा या दृष्टिने त्यांचे लोकसंख्या नियंत्रण विषयक विचार प्रा. भवरे यांनी आपल्या शोधनिबंधातून व्यक्त केले आहेत.

प्रा. वसंत मोरे यांचा शोधनिबंध 'महाराष्ट्रातील आदिवासींचे आर्थिक जीवन : समस्या व उपाययोजना' यामध्ये आदिवासी समाजाचे आर्थिक जीवन त्याचबरोबर आदिवासी समाजाशी संबंधित विविध समस्या व त्यावरील उपाययोजना यावर सविस्तर चर्चा केलेली आहे. सदर शोधनिबंधामध्ये आदिवासी समाजात मोठ्या प्रमाणात होत असलेले सामाजिक परिवर्तनावर भर दिलेला नाही. कारण शहरी समाजाच्या प्रवेशामुळे आदिवासी समाजामध्ये बरेच प्रश्न उद्‌भवले आहेत.

प्रा. नंदकुमार ककलारे यांचा शोधनिबंध 'केसापुर गावातील प्रकल्पग्रस्तांच्या सामाजिक, आर्थिक स्थितीचा अभ्यास' यात प्रकल्पग्रस्तांच्या सामाजिक, आर्थिक स्थिती त्याचबरोबर प्रकल्पामुळे प्रकल्प ग्रस्तांना कोणकोणत्या विविध समस्यांना तोंड द्यावे लागत आहे याचा आढावा घेण्यात आला आहे. सदर प्रकल्पामुळे प्रकल्पापूर्वी जमीनदार असलेले लोक प्रकल्पानंतर भुमिहीन झालेले आहेत व त्यांच्यासमोर विविध आव्हाने उभी राहिलेली दिसून येतात.

डॉ. जयश्री महाजन यांनी 'आदिवासींचे मानवी हक्क आणि वास्तवता' या शोधनिबंधात आदिवासींच्या मूलभूत हक्कांच्या अडचणींवर प्रकाश टाकलेला आहे. त्याचप्रमाणे आदिवासींच्या मुलभूत हक्काच्या पायमळीवर प्रकाश टाकलेला आहे. आदिवासींना घटनेने दिलेले मूलभूत हक्क मिळणे हा त्यांचा मूलभूत अधिकार आहे या विषयांवरही सखोल चिंतन केलेले दिसून येत आहे.

प्रा. राजकुमार भगत यांचा शोधनिबंध 'म. गांधी तंटामुक्त अभियान बनले लोकचळवळ' यात योजनेचे महत्त्व व मोहिमेबाबत सविस्तर मांडणी केलेली आहे. तसेच महात्मा गांधी तंटामुकत गाव अभियानामुळे महाराष्ट्रात एक

वेगळी ओळख निर्माण झाली असून सदर मोहिमेची दखल युनोस्कोने घेतलेली आहे. त्याचबरोबर या मोहिमेत नक्षलवादी गावांचाही समावेश आहे.

प्रा. प्रकाश कांबळे यांनी 'जागतिकीकरणाचे परिणाम एक समाजशास्त्रीय अभ्यास' या शोधनिबंधात जागतिकीकरणातील नविन आर्थिक धोरणामध्ये उदारीकरण, खाजगीकरण या क्षेत्रांचा विस्तार करुन सरकारचा आर्थिक क्षेत्रातील सहभागाविषयी मुख्य हेतू सांगून आर्थिक परिणामाचा व सामाजिक परिणामाचा अभ्यास केलेला दिसून येतो.

प्रा. सचिन सनगरे यांनी 'रत्नागिरी तालुक्यातील जलयुक्त शिवार अभियान अंमलबजावणीचे अध्ययन' या शोधनिबंधात पाणी टंचाई व त्यातून निर्माण होणारे विविध प्रश्न या विषयी आपले भाष्य केलेले दिसून येत आहे. त्यांच्यामते कोकणात एकूण पर्जन्यमान हे अन्य प्रदेशांपेक्षा भिन्न आहे. तसेच पाण्याचे नियोजन व व्यवस्थापन, जलसिंचन यामध्ये कोकण आजूनही मागे आहे व जल साक्षरता कोकणात अजूनही झालेली दिसून येत नाही असे मत त्यांनी व्यक्त केले आहे.

प्रा. सौ. सुषमा जाधव यांचा शोधनिबंध 'रामोशी, बेरड या भटक्या विमुक्त जमातींची महाराष्ट्रातील सामाजिक चळवळ' यात रामोशी, बेरड समाजाच्या समस्या त्याचबरोबर रामोशी, बेरड या जमातीच्या महाराष्ट्रातील चळवळीचा आढावा घेण्यात आलेला आहे. सदर शोधनिबंधामध्ये रामोशी बेरड समाजाची चळवळ मोठ्या प्रमाणात संघटनात्मक स्वरूपात झालेली असली तरी त्या चळवळीचा फायदा जमातीतील सर्वसामान्य लोकांना म्हणावा तितका झालेला नाही, असे दिसून येते. एकंदरित इतक्या मोठ्या प्रमाणात चळवळ होऊन देखील जमातीत फारसा बदल झालेला दिसून येत नाही.

डॉ. दादासाहेब मोटे यांचा शोधनिबंध 'विमुद्रिकरणाचे समाजावरील सामाजिक व आर्थिक परिणाम' यात विमुद्रिकरणाचे होकारार्थी व नकारार्थी अशा दोन्ही परिणामांची चर्चा केलेली दिसून येते. तसेच विमुद्रिकरणाचा परिणाम शेतकरी आणि त्याचे व्यवसाय, शेतमजूर, व्यापारी वर्ग, नोकरदार वर्ग इत्यादी समाजातील सर्व घटकांना स्पर्श करणारा आहे.

प्रा. मनाली शेटे यांनी 'भारतीय संविधान आणि मानवी हक्क' या विषयावरील आपल्या शोधनिबंधात मानवी हक्कांची सकल्पना सांगून मानवी हक्कांचा विचार प्राचीन काळापासून निरंतर चालत आलेला दिसतो व मानवी संस्कृतीच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर त्या वेगवेगळ्या संज्ञा वापरलेल्या दिसतात. त्यांच्यामते मानवी हक्कांचा विकास हा पहिली पिढी, दुसरी, पिढी, तिसरी पिढी या तीन पिढ्यांच्य हक्कासंदर्भात मांडला जातो याचे सविस्तर विवेचन त्यांनी आपल्या शोधनिबंधात स्पष्ट केल्याचे दिसून येते.

अशा प्रकारे अनेक वेगवेगळ्या विषयाला स्पर्श करुन या २१व्या विशेषांकामध्ये चिंतन करण्यात आले आहे. हा अंक वाचकांना, समाजशास्त्राच्या अभ्यासकांना निश्चितच स्वागतार्ह वाटेल, याकरीता वर्तमानाचे भान ठेवून भविष्याचा वेध घेण्याचे सामर्थ आपणास लाभो.

सदर समाजशास्त्र संशोधन पत्रिकेसाठी संपादक मंडळ व सल्लागार मंडळासह ज्यांनी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या मदत केली अशा सर्वांचे आभार.

● अतिथी संपादक ●

**डॉ. शैलजा माने, डॉ. प्रतिमा देसाई, डॉ. नलिनी बोरकर**

# रत्नागिरी जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षणाची स्थिती

**प्रा. आनंद आंबेकर**
समाजशास्त्र विभाग,
गोगटे जोगळेकर महाविद्यालय, रत्नागिरी.

**प्रास्ताविकः**

शिक्षणाचा उदय प्रागैतिहासिक काळात झाला. सुरूवातीच्या काळात कुटुंब हे शिक्षणाचे केंद्र व आईवडील हेच बालकांचे गुरू होते. मानवी जीवनामध्ये जसजशी सुधारणा होत गेली व जीवनाच्या कक्षा जसजशा वाढल्या त्याप्रमाणे आईवडिलांना चरितार्थामध्ये व घराबाहेरील कार्यामध्ये वेळ घालवावा लागला, त्यामुळे आपल्या मुलास शिक्षण देण्यास त्यांना वेळ मिळेनासा झाला. तसेच मानवाच्या अगदी सुरूवातीच्या काळात अगदी प्राणिसदृश्य म्हणजे उपजीविकेपुरते शिक्षण हा विचार बदलून, लिहिणे - वाचणे व अंकगणित हे शिक्षणाचे स्वरूप प्राप्त झाले. हे नवे स्वरूपही आईबापांना बालकांना शिक्षण देण्याच्या दृष्टीने झेपेनासे झाले. म्हणून समाजाला शिक्षण देण्याच्या यंत्रणेची आवश्यकता भासू लागली. त्यातूनच शाळा ही संस्था अस्तित्वात आली व शिक्षकी व्यवसायाला सुरूवात झाली. भारतासारख्या देशामध्ये शिक्षकांच्या घरी विद्यार्थ्यांनी राहावयाचे, ज्ञानार्जन करावयाचे व शिक्षकाने पदवी दिली व शिफारस केली म्हणजे मग पितृगृही परत जावयाचे असा परिपाठ होता. सामान्यतः पंचवीसशे वर्षांपूर्वीपासून शाळा ही औपचारिक शिक्षणयंत्रणा अस्तित्वात आहे, असे मानण्यास हरकत नाही. मानवाच्या विचारांनी प्रगती होत गेली, त्याप्रमाणे जीवनातील समस्यांबाबत विचारवंत निरनिराळे सिद्धांत मांडू लागले. भूत, वर्तमान, भविष्य यांची सांगड घालण्याचा काहींनी प्रयत्न केला. मानवाचे सर्वसामान्य स्वरूप व त्याची प्रगती या विषयीचे विचारही मांडण्यात येऊ लागले. शिक्षण म्हणजे ज्ञान, अभिवृत्ती व सवयींचे संपादन असल्यामुळे, थोडक्यात शिक्षण म्हणजेच मानवाची प्रगती असल्यामुळे, जीवनाच्या विविध बाजूंचा विचार करणाऱ्या तत्ववेत्त्यांनी शिक्षणविषयक सिद्धांत मांडण्याचाही प्रयत्न केला. सुरूवातीच्या काळात शिक्षण ही एक कला मानली जात होती. शास्त्रांच्या प्रगतीचा शिक्षण विषयक विचारांवर प्रभाव पडून शिक्षण हे कलेबरोबर शास्त्रही आहे असे मानण्यात येऊ लागले.

प्रस्तूत शोधनिबंधात शालेय शिक्षणाचे स्वरूप आणि रत्नागिरी प्राथमिक शिक्षणाची स्थिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**उद्देशः**

१. शालेय शिक्षण स्वरूप जाणून घेणे

२. रत्नागिरी जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षणाची स्थिती जाणून घेणे

**गृहितकेः**

१. शालेय शिक्षण विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्व विकासात भर घालते.

२. रत्नागिरी जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षणाची प्रगती होत आहे

**संशोधन पद्धती :**

व्यष्टी अध्ययन व वर्णनात्मक आराखडा वापरण्यात आला आहे. रत्नागिरी जिल्ह्याच्या शासकिय प्रकाशनातील १९९७ व २०१३ च्या माहितीच्या आधारे तथ्य संकलनासाठी गुणात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे.

**शालेय समाजरचनाः**

शाळा हा एक लहानसा समाज आहे. या समाजात अनेक सामाजिक समूह असतात. शिक्षकांचा समूह, मुलांचा समूह, निरनिराळे वर्ग, निरनिराळी मंडळे हे सर्व सामाजिक समूह होत.

समाजातील निरनिराळ्या थरांतील मुले शाळेत येतात. त्यांत मुलगे असतात, मुली असतात, श्रीमंतांची मुले असतात, गरीबांची मुले असतात, निरनिराळ्या जातीची मुले असतात, व निरनिराळ्या धर्माची मुले असतात. समाजात निरनिराळे व्यवसाय करणारे लोक असतात, त्यांची मुले शाळेत असतात. या दृष्टीने विचार करता शाळा हे एक समाजाचे प्रातिनिधीक स्वरूप असे म्हणता येईल. असे असले तरी शालेय समाजाची काही खास वैशिष्ट्ये आहेत.

**शालेय समाजोच वैशिष्ट्य**

नेहमीच्या समाजात सामाजिक श्रेणीरचना असते. ही सामाजिक श्रेणी रचना सामाजिक वर्गावरून अस्तित्वात येत असते. हे सामाजिक वर्ग संपत्ती, व्यवसाय, शिक्षण वगैरे निरनिराळ्या गोष्टींवरून पडतात. तसेच समाजात जातीवरून व धर्मावरून वर्ग पडतात, लिंगभेदामुळे स्त्री व पुरूष असे वर्ग पडतात. शाळेत पडणारे वर्ग फक्त शिक्षणावरून पडतात. त्यांत इतर गोष्टींना थारा नसतो. शालेय समाजाची श्रेणीरचना गुणवत्ता व शिक्षण यावरून आधारलेली असते. मुलांनी एका श्रेणीरचनेतून वरच्या श्रेणीत जाण्यासाठी शाळेत एक खास यंत्रणा उभारलेली असते. ती म्हणजे शिक्षक वर्ग होय. नेहमीच्या समाजात अशी सोय नसते.

नेहमीच्या समाजात व्यक्ती व्यक्तींमध्ये होणाऱ्या आंतरक्रिया या इष्ट असतात असे नाही. शाळेमध्ये मुलां मुलांमध्ये होणाऱ्या आंतरक्रिया इष्ट ठेवण्याचा कटाक्षाने प्रयत्न होत असतो. समाजातून होणारे व्यक्तिनियंत्रण व शाळेतून होणारे व्यक्तिनियंत्रण यामध्ये फरक आहे. शाळेमध्ये होणारे व्यक्तिनियंत्रण सहेतुक असते, तर समाजातील व्यक्तिनियंत्रण आपोआप घडत असते. समाजाकडून होणारे व्यक्तिनियंत्रण इष्ट स्वरूपाचे असेलच असे नाही.

मुलांच्या नेहमीच्या परिसराचे नियंत्रण करून त्यांच्या विकासाला पोषक असे परिसर निर्माण करण्याचा प्रयत्न शाळेकडून होत असतो. समता, न्याय, बंधुभाव, स्वातंत्र्य या तत्त्वांची अंमलबजावणी करून शाळेला मुलांच्या कार्यावर समाजाचे एकूण कार्य अवलंबून असते. यावरून आपणाला असे म्हणता येईल की, शाळा ही समाजाची एक आदर्श लहान प्रतिकृती आहे, School is an Idealised Epitome of Society.

शालेय समाजाचे खरे स्वरूप कसे असावे,याची कल्पना या विवेचनावरून येईल. आज सर्वच शाळांचे स्वरूप असे असेलच असे नाही. त्यात काही अनिष्ट गोष्टीही संभवत असतील. शैक्षणिक समाजाशास्त्राच्या दृष्टीकोनातून शाळा ही एक समाजाची आदर्श प्रतिकृती असते. म्हणून शालेय समाजाशी संबंधित असलेले सर्व घटक यांच्या आंतरक्रियाही आदर्श असणे आवश्यक आहे.

**शालेय समाजाचे घटक**

समाज हा अनेक सामाजिक संस्थांनी बनलेला असतो. या सामाजिक संस्थांचे कार्य एकमेकांना पूरक झाल्यास समाजाला स्वास्थः लाभते. शिक्षण ही एक सामाजिक संस्था आहे. शिक्षणाच्या कार्यावर इतर सामाजिक संस्थांचे कार्य अवलंबून असते. शाळा ही शिक्षण देणारी संस्था आहे. प्रत्येक संस्थेचे कार्य पार पाडण्यासाठी एखादी यंत्रणा अस्तित्वात यावी लागते. शाळेचीही अशीच एक यंत्रणा आहे. या यंत्रणेचे घटक पुढील प्रमाणे आहेत.

१. व्यवस्थापक मंडळ
२. मुख्याध्यापक
३. शिक्षक
४. विद्यार्थी
५. इतर सेवकवर्ग

**रत्नागिरी जिल्ह्याची ओळखः**

प्रपितामह श्रीपरशुरामाने निर्माण केलेली आणि विपुल सृष्टीसौदर्याने नटलेली कोकण ही पवित्र पावन भूमी होय. एका बाजूला गगनाला गवसणी घालणारे उंच डोंगर तर दुसऱ्या बाजूला पाताळाचा वेध घेणाऱ्या खोल दऱ्या, नारळी-पोफळीच्या विस्तीर्ण बागा, डोंगरातून नागमोडी वळणे घेत धावणारे रस्ते, अथांग सागर आणि क्षितिजावर रंगांची उधळण करणारा सूर्यास्त अशा कितीतरी

गोष्टींमुळे या जिल्ह्यात सौंदर्याचा साक्षात्कार होत असतो.

**भौगोलिक स्थान**

महाराष्ट्र राज्याच्या पश्चिम किनाऱ्यावर परसलेला रत्नागिरी जिल्हा कोकणचा एक प्रमुख भाग आहे. हा जिल्हा १६° ३० ते १८°.०४ उत्तर अक्षांश आणि ७३°.०२ ते ७३°.५२ पूर्व रेखांश या भौगोलिक पट्टयामध्ये वसला आहे. उत्तरेकडून दक्षिणेकडे चिंचोळ्या होत जाणाऱ्या किनारपट्टीत जिल्ह्याचे क्षेत्र पसरले आहे. जिल्ह्याची उत्तर दक्षिण लांबी २२५ कि.मी. असून पूर्व पश्चिम विस्तार सुमारे ६४ कि.मी. लांबीचा समुद्रकिनारा लाभला आहे. या जिल्ह्याला सुमारे १६७ कि.मी. समुद्रकिनारा लाभला आहे. जिल्ह्याच्या उत्तर सीमेवर रायगड जिल्हा, पश्चिमेस अरबी समुद्र व दक्षिणेस सिंधुदुर्ग जिल्हा आणि पूर्वेला सह्याद्रीपर्वताच्या रांगा आहेत. त्या पलिकडे सातारा, सांगली व कोल्हापूर हे जिल्हे आहेत. रत्नागिरी जिल्ह्यात कुठूनही प्रवेश करावयाचा तर तो घाट उतरूनच करावा लागतो. या जिल्ह्यात जाण्यासाठी कुंभार्ली घाट आणि कोल्हापूरला जाण्यासाठी आंबा घाट चढावा लागतो. या घाटातील प्रवास म्हणजे विलोभनीय सौंदर्याची मेजवानी असते.

जिल्ह्याच्या पूर्व सीमेवर सह्याद्रीच्या उंच रांगा आहेत. या पर्वत शिखरांची उंची साधारणपणे ४०० मीटर ते २००० मीटर आहे. हा खडकांचा उभाभाग व किनारपट्टी यामधला प्रदेश एकमेकांना समांतर अशा असंख्य डोंगरांचा आहे. त्यामुळे सह्याद्रीतून उगम पावलेले पाण्याचे प्रवाह एकमेकांना समांतर असे वाहत असून खाडीच्या स्वरूपात समुद्राला मिळतात.

जिल्ह्याची दक्षिणोत्तर लांबी सर्वसाधारणपणे २२५ कि.मी. आहे. जिल्ह्याची एकूण भौगोलिक रचना लक्षात घेता त्यांचे तीन स्वाभाविक विभाग पडतात. १. सह्याद्री पट्टी व त्याचा उताराचा भाग म्हणजेच पूर्वेकडील डोंगराळ प्रदेश ज्यामध्ये डोंगरमाथा व सभोवतालचा १५ कि.मी. पर्यंतचा प्रदेश २. वलाटी - म्हणजेच मध्य भाग ज्यामध्ये सह्याद्री पर्वताच्या पायथ्यापासून १५ कि.मी. अंतरा नंतरचा आणि किनारपट्टीपासून १० ते १५ कि.मी. अंतराच्या प्रदेशाचा समावेश होतो. ३. खालाटी - म्हणजेच किनारपट्टी व त्यालगतचा भूभाग होय. हा पट्टा समुद्रकिनाऱ्यापासून जवळजवळ १५ कि.मी. दूर आहे.

**रत्नागिरी जिल्ह्यातील १९९७ मधील प्राथमिक शिक्षणाची स्थिती:**

१.रत्नागिरी जिल्ह्यामध्ये पट नोंदणीचे प्रमाण १०० असून विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण इयत्ता ४ थी व ७ वी मध्ये अनुक्रमे ४.०४ व १६.०७ टक्के इतके आहे. दिवसेंदिवस हे प्रमाण कमी होत असून सन १९९६- ९७ मध्ये हे प्रमाण फार अल्प होते. जिल्ह्यामध्ये प्राथमिक शाळांची संख्या पुरेशा प्रमाणात असून, प्रचलित निकषांप्रमाणे एखाद्या ठिकाणी नवीन प्राथमिक शाळा सुरू करणेची मागणी आल्यास त्या ठिकाणी नियमानुसार नवीन शाळा सुरू करणेत येते. जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांमध्ये सध्या २.२२ लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

रत्नागिरी जिल्ह्यामध्ये २५१ केंद्रीय शाळा असून त्यांची नियमानुसार सर्व कामे चालू आहेत. सर्व शाळांवर देखरेख ठेवणे आणि आवश्यक ते मार्गदर्शन केले जाते.

जिल्ह्यात सर्व केंद्रिय शाळांच्या केंद्रीय शिक्षण सल्लागार समित्यांची स्थापना करणेत आलेली असून त्यांची कामे व्यवस्थित चालू आहेत. त्यांचे मार्फत दरमहाच्या १५ तारखेच्या आत सभा घेऊन कक्षेतील शाळांना मार्गदर्शन केले जाते.

तालुका स्तरावर विकास गट शिक्षण सल्लागार समित्यांची स्थापना करण्यात आलेली असून त्यांच्याही दरमहा सभा आयोजित केल्या जातात. अशाच प्रकारे जिल्हा शिक्षण सल्लागार समिती व जिल्हा सल्लागार समितीच्या कार्यकारी समितीची स्थापना करणेत आली असून मा. पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली सभा आयोजित केल्या जातात.

२. शासन पुरस्कृत शालेय पोषण आहार कार्यक्रमांतर्गत माहे डिसेंबर १९९६ ते मार्च १९९७ अखेर रत्नागिरी जिल्ह्यातील ५३० शाळांना दूध पुरवठा व उर्वरित शाळांतील विद्यार्थ्यांना कडधान्य पुरवठा करणेत आला असून त्यामध्ये सरासरी १.१० लाख विद्यार्थ्यांना योजनेचा लाभ मिळाला आहे. सन १९९७-९८ पासून केंद्र पुरस्कृत योजनेखाली रत्नागिरी जिल्ह्याचा समावेश झाला असून त्यादृष्टीने पूर्वतयारी चालू आहे. कार्यक्रम अंमलबजावणीची माहिती सर्व गटशिक्षणाधिकारी यांना देणेत आली असून सर्व तालुक्यांनी कार्यवाही चालू केली आहे.

रत्नागिरी जिल्ह्यातील वरिष्ठ श्रेणीस पात्र असलेल्या सर्व म्हणजे ४६८४ प्राथमिक शिक्षकांना चट्टोपाध्याय वेतनश्रेणीनुसार वरिष्ठ श्रेणी देणेत आली असून त्या शिक्षकांनी अर्हताकारी सेवा पूर्ण केली आहे. अशा शिक्षकांचे वरिष्ठ श्रेणीसाठीचे प्रस्ताव तालुक्यांकडून मागविणेत आले आहेत. रत्नागिरी जिल्ह्यातील १८९५ प्राथमिक शाळांना टू.इन.वन संच पुरविणेत आले असून ते सर्व संच चालू स्थितीमध्ये आहेत. तसेच शासनाकडून प्राप्त झालेले ४४४ दूरदर्शन संच प्राथमिक शाळांना पुरविलेले आहेत. रत्नागिरी जिल्हा परिषद शाळांपैकी ७५ टक्क्यांपेक्षा कमी उपस्थिती असणारी एकही शाळा जिल्ह्यामध्ये नाही. २९ शाळांची उपस्थिती ८९ टक्क्यांपर्यंत व २५८२ शाळांची उपस्थिती ९० टक्क्यांपेक्षा जास्त आहे. सन १९९६-९७ मध्ये जिल्ह्यांमध्ये फक्त ३४ विद्यार्थी पालकांच्या नोकरीच्या कारणामुळे मध्येच शाळा सोडून गेले आहेत. सन १९९५-९६ व १९९६-९७ मध्ये जिल्ह्यामध्ये अनुक्रमे इयत्ता १ ली व २ री च्या मुलांसाठी किमान अध्ययन क्षमता प्रकल्प राबविणेत आला होता. त्याचे रिझल्ट उत्कृष्ट मिळाले आहेत. सर्वेक्षणानुसार २०५५२ विद्यार्थ्यांना इयत्ता १ ली मध्ये प्रवेश घ्यावयाचा होता तो ९९.०९ टक्के साध्य करणेत आला आहे. जिल्ह्यातील प्राथमिक शाळांतील इयत्ता १ ली ते ४ थी मधील विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी पूर्ण करणेत आली असून ते काम ९९ टक्क्यांपर्यंत पूर्ण करणेत आले आहे.

३. अनुसूचित जाती जमातीच्या मुलांच्या गणवेष व लेखन साहित्य पुरवठा करणेसाठी सन १९९६-९७ साठी रक्कम रूपये ६.०० लाखाची तरतूद प्राप्त झाली होती. त्यामधून ३४८८ विद्यार्थी - विद्यार्थीनींना योजनेचा लाभ देणेत आला असून गळतीचे प्रमाण कमी होणेस मदत झाली आहे. जिल्ह्यामध्ये जिल्हा परिषदेमार्फत ६९३ बालवाड्या चालू आहेत. सदर सर्व बालवाड्या इयत्ता १ ली ४ थीच्या प्राथमिक शाळांना जोडून आहेत. आता जिल्ह्यामध्ये आय.सी.डी.एस. योजनेखालील अंगणवाड्यांची योजना जिल्ह्याला लागू झाली असून सध्या फक्त चार तालुक्यामध्ये ही योजना कार्यन्वित झालेली आहे. याशिवाय जिल्ह्यामध्ये विना अनुदान तत्वावर ८८ बालवाड्या चालू असून त्यामध्ये ३३७६ बालके पूर्ण प्राथमिक शिक्षण घेत आहेत.

४. सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजनेखाली निधी संकलनाचे या जिल्ह्यासाठी १ कोटी रूपयांचे लक्ष्य देणेत आले आहे. त्यानुसार कार्यवाही चालू असून जिल्ह्यामध्ये आतापर्यंत एकूण २५.०० लाख रूपये निधी संकलित करणेत आला आहे. पूर्वीच्या योजनेखाली २६३० विद्यार्थ्यांना योजनेचा लाभ मिळत आहे. सन १९९६-९७ साठी रत्नागिरी जिल्ह्याला शैक्षणिक उठाव योजनेखाली१८.५४ लाख रूपयांचे लक्ष्य देणेत आले होते. शिक्षकांच्या अथक प्रयत्नाने आणि ग्रामस्थांच्या उत्कृष्ट सहकार्याने हे लक्ष्य २२५ टक्के साध्य करणेत आले असून जिल्ह्यामध्ये वस्तुरूपाने बांधकाम स्वरूपात व रोख स्वरूपात असा एकूण ४१.७९ लाख इतका निधी उपलब्ध करणेत आला आहे. त्यामुळे अनेक शाळा शैक्षणिक साहित्य व इमारत डागडूजीच्या मदतीमुळे सुस्थितीमध्ये आलेल्या आहेत. केंद्र पुरस्कृत खडूफळा योजनेखालील सर्व शाळांचे एक शिक्षकी शाळांतून द्विशिक्षकी शाळांमध्ये रूपांतर

करणेत आले असून सर्व शाळा शैक्षणिकदृष्ट्या सक्षम करणेत आलेल्या आहेत. याशिवाय जिल्ह्यातील ५३९ वरिष्ठ प्राथमिक शाळांचा या योजनेखाली समावेश करणेत आला असून त्यांना शासननिकषांप्रमाणे विविध प्रकारचे शैक्षणिक साहित्य पुरविणेत आले आहे. जिल्ह्यातील प्राथमिक शाळांसाठी सन १९९५-९६ अखेर २८६५ वर्ग खोल्यांची आवश्यकता होती. सन १९९६-९७ मध्ये निरनिराळ्या योजनेखाली एकूण ५४४ वर्ग खोल्यांची बांधकामे हाती घेण्यात आली आहेत. ती सर्व कामे पूर्णतेच्या मार्गावर आहेत.

**रत्नागिरी जिल्ह्यातील २०१३ मधील प्राथमिक शिक्षणाची स्थितीः**

१. जिल्ह्यात सर्व शिक्षा अभियान उत्तमरीतीने राबविले गेल्यामुळे सातवीपर्यंत विद्यार्थी गळतीचे प्रमाण शून्यावर आणण्यात प्रशासनाला यश आले आहे. अभियानांतर्गत सन २०१३ -१४ या आर्थिक वर्षात जिल्ह्यासाठी २८ कोटी ६९ लाख ४४ हजार रूपयांचे अनुदान मंजूर झाले आहे. या अनुदानातून इयत्ता १ ली ते ८ वीच्या सर्व विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके व स्वाध्यायपुस्तिका पुरविण्यात येत आहेत. शिक्षक प्रशिक्षण, वयानुरूप समकक्ष वर्गात दाखल झालेल्या मुलांसाठी विशेष प्रशिक्षण, नवोपक्रमांतर्गत मुलींचे शिक्षण, अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीच्या मुलांचे शिक्षण, संगणक शिक्षण, अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी उपक्रम, मुलींच्या शिक्षणासाठी विविध योजना यासारखे उपक्रम राबविले जातात.

२. इयत्ता १ ली ते ८ वीच्या सर्व मुली, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती तसेच दारिद्र्य रेषेखालील पालकांची मुले यांना प्रत्येकी दोन गणवेशासाठी चारशे रूपयांपर्यंतची तरतूद करण्यात आली आहे. समावेशित शिक्षण उपक्रमांतर्गत ० ते १८ वयोगटातील अपंग विद्यार्थ्यांसाठी विविध सेवा पुरविल्या जातात.शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत इयत्ता १ ली ते ८ वीच्या मुलांना आहार देण्यात येतो.

३. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जमातीमधील दारिद्र्य रेषेखालील मुलींना ७५ टक्के उपस्थितीच्या आधारे जास्तीत जास्त २२० रूपये इतकी रक्कम देण्यात येते. योजनेसाठी जिल्हा नियोजन समितीकडून सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात १९८३ लाभार्थींना ३ लाख ५ हजार ९५८ रूपयांचे वितरण करण्यात आले. याच योजनेअंतर्गत विशेष घटकाखाली १ हजार ७०५ लाभार्थ्यांना २ लाख ४ हजार ६४५ रूपये भत्त्यांचे वाटप करण्यात आले.

४. जिल्हा परिषद शाळेतील अनुसूचित जाती, अनुसूचित जमातींच्या दारिद्र्य रेषेखालील विद्यार्थ्यांना गणवेश व लेखन साहित्याकरिता सन २०१२-१३ या वित्तीय वर्षात गणवेशासाठी ६ लाख ९४ हजार ५६४ रूपये वर्ग करण्यात आले होते. तर १ लाख ५८ हजार ९०६ रूपये लेखन साहित्यावर खर्च करण्यात आला.

५. विद्यार्थ्यांना अपघातामुळे होणाऱ्या हानीची काही प्रमाणात भरपाई देण्याच्या दृष्टीने राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदान योजना राबविली जाते. इयत्ता १ ली ते १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी ही योजना असून अपघाती मृत्यू, कायमचे अपंगत्व या कारणाकरिता सानुग्रह अनुदान दिले जाते. या योजने अंतर्गत २०१२-१३ मध्ये १० विद्यार्थ्यांना ६ लाख ७१ हजार इतक्या अनुदानाचे वाटप करण्यात आले आहे.

**समारोपः**

शालेय शिक्षणातील प्राथमिक शिक्षणाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. सामाजिक दृष्टीकोनातून शिक्षण म्हणजे स्वतःच्या अनुभवातून होणारे परिवर्तन किंवा विकास होय. रत्नागिरी जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षणाचा आढावा घेताना १९९७ मधील संख्यात्मक आढावा घेताना तत्कालिन पालकमंत्री मा. नामदार रविंद्र माने यांनी प्राथमिक शिक्षण व्यवस्थेसाठी गुणात्मक वाढीसाठी शिक्षक संख्या वाढीचे महत्त्वाचे धोरण स्विकारले होते. तर २०१३ मध्ये तत्कालिन पालकमंत्री उदय सामंत

यांनी विद्यार्थी गळतीचे प्रमाण शून्यावर आणण्यात प्रशासनाला यश प्राप्त झाले होते.

संदर्भः


१. श्री. महाजनी, श्री. ब. गोगटे - (१९९२) शैक्षणिक समाजशास्त्र
२. Report of the University Education Commission (१९४८) Govt. of India
३. प्रा. वि.पां.बोकील - शिक्षणाचे तत्वज्ञान
४. K.G. Saiyidain -Education, Culture and the Social Order
५. डॉ. न.रा. पारसनीस -शिक्षणाची तात्वीक आणि समाजशास्त्रीय भूमिका
६. रत्नागिरी जिल्हा विकासाची वाटचाल - (१९९७) महाराष्ट्र राज्य मंत्री मंडळाची बैठक, रत्नागिरी
७. विकासरत्न (२०१३) जिल्हा माहिती कार्यालय रत्नागिरी.



## आवाहन

मराठी समाजशास्त्र पत्रिकेच्या प्रकाशनासाठी ज्यांना देणगी द्यावयाची असेल त्यांनी सचिव, मराठी समाजशास्त्र परिषद या नावाने डिमांड ड्राफ्ट/चेक अथवा रोखीने डॉ. महेंद्रकुमार जाधव, अध्यक्ष, मराठी समाजशास्त्र परिषद, द्वारा-समाजशास्त्र विभाग, नाइट कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड कॉमर्स, आझाद चौक, कोल्हापूर येथे जमा करावे. देणगीदारांची नावे पुढील अंकात छापण्यात येतील.

- संपादक, म.स.प.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा लोकसंख्या नियंत्रण विषयक विचार

प्रा. प्रियदर्शन भवरे
समाजशास्त्र विभाग,
बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना

प्रस्तावना:

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आयुष्यभर समाज, राजकारण, धर्म, राज्यघटना, अर्थकारण, शिक्षण या विविध क्षेत्राबद्दल मूलगामी चिंतन केले. भारतीय समाज रचनेतील अनेकानेक विसंगती यांचे यथायोग्य आकलन करण्यात भारतीय समाज कमी पडत असल्याने आज विविध अशा जटिल सामाजिक प्रश्नांना तोंड देण्याची आपल्यावर वेळ आली आहे. त्यांचे अर्थविषयक विचार, शेतीविषयक कुटुंब नियोजन विषयक आणि भाषावार प्रांत रचनाविषयक दृष्टिकोन पुरेशा गांभीर्याने विचारात न घेतल्याने देशाला आजची दुरवस्था प्राप्त झाली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना समाजात हीन वागणूक देण्यात येणाऱ्या स्त्रियांबद्दल अपार सहानुभूती होती. कुटुंबातील स्त्रियांचे कष्ट कमी व्हावेत म्हणून घटस्फोट, पोटगी, पुनर्विवाह, वडिलोपार्जित संपत्तीत वारसा, दत्तक घेणे इत्यादी हक्क देणाऱ्या हिंदू कोड बिलाचा आग्रह धरला. संततिनियमन, कुटुंबनियोजन हा स्त्रियांचा जिव्हाळ्याचा विषय भारतात संततिनियमनाची आवश्यकता प्रतिपादन करताना स्त्रियांच्या दृष्टिने त्याचा स्वीकार कसा उपकारक ठरेल, याचे विवेचन त्यांनी केले आहे.

आज भारताची लोकसंख्या सव्वाशे कोटीच्याही पुढे गेलेली आहे भारतात लोकसंख्येचा प्रश्न किती चिंताजनक बनलेला आहे हे वेगळे सांगायची गरज नाही. भारतातील कोणतीही विकासविषयक योजना प्रचंड लोकसंख्या या एकमेव कारणामुळे अपयशी ठरते. लोकसंख्या आणि साधन संपत्ती यांचा परस्परांशी जवळचा संबंध आहे. वाढत्या लोकसंख्येला मर्यादित साधनसंपत्ती कशी पुरेशी ठरणार? भारताला लोकसंख्येचा प्रश्न सोडविता आला तरच विकासाची फळे खऱ्या अर्थाने चाखता येतील. प्रस्तुत शोध निबंधात डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे लोकसंख्या नियंत्रण विषयक विचार प्रतिपादन करण्याचा प्रयत्न केला आहे.

**उद्देश :-**

१. अतिरिक्त लोकसंख्या वृध्दीबद्दल डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराचा अभ्यास करणे.

२. अतिरिक्त लोकसंख्या वृध्दीचे सामाजिक, आर्थिक पैलूंवर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास करणे.

३. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराची समर्थकता शोधणे.

४. वाढत्या लोकसंख्येच्या नियंत्रणासाठी उपाय सुचविणे.

**गृहितकृत्य :-**

१. वाढत्या लोकसंख्येमुळे देशाच्या सामाजिक, आर्थिक शैक्षणिक प्रगतीवर परिणाम होतो.

२. देशाच्या एकूणच विकासामध्ये वाढती लोकसंख्या हा अडथळा आहे.

३. वाढत्या लोकसंख्येमुळे विविध सामाजिक आर्थिक प्रश्न निर्माण होतात.

४. डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे विचार सद्यकालिन परिस्थितीत किती समर्पक आहे?

प्रस्तुत शोध निबंधामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर जनन नियंत्रणाचा दृष्टिकोन व वर्तमान भारताची लोकसंख्या यासंदर्भात विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला आहे. लोकसंख्या वृध्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी भारत अपयशी का ठरला आहे? वाढत्या लोकसंख्येमुळे आपल्या देशाला कोणकोणते परिणाम भोगावे लागले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा दृष्टिकोन आपल्या देशासाठी किती समर्पक आहे. या अशा पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लोकसंख्याविषयक दृष्टिकोनाचे महत्व याठिकाणी अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला आहे. वाढत्या लोकसंख्येचे विविध सामाजिक आर्थिक परिणामही अधोरेखित केले आहे. मुंबई विधी मंडळात बाबासाहेबांनी वाढत्या लोकसंख्येबद्दल जो विधेयक मांडला. त्याला विरोध का झाला याबाबतही थोडक्यात परामर्श घेण्याचा प्रयत्न केला आहे. या पार्श्वभूमीवर प्रस्तुतचा शोध निबंधाचे लेखन करताना दुय्यम साधन सामग्रीचा उपयोग केला आहे. यासाठी विविध ग्रंथ, वर्तमानपत्रे, जनगणना अहवाल आदींचा आधार घेतला आहे.

**पार्श्वभूमी:**

१९५० पासून अनेक विकसनशील देशातील लोकसंख्या अकल्पीतपणे वाढू लागली. लोकसंख्या इतक्या गतींने वाढेल याचा कुणी अंदाजही व्यक्त करु शकले नाही. १९३० मध्ये जागतिक लोकसंख्या दोन कोटी होती. १९६० ला तीन कोटी झाली. २००० साली जागतिक लोकसंख्या सहा कोटी होती. याचा अर्थ असा की, जागतिक लोकसंख्या १९६०-२००० या चाळीस वर्षाच्या कालखंडात जवळपास तीन कोटीनी वाढली. अशाप्रकारे एकूणच जागतिक स्तरावर लोकसंख्या हा एक गंभीर प्रश्न वा आव्हान म्हणून उभा राहिला आहे.

एकोणीसाव्या शतकाच्या सुरुवाती पासून ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञ माल्थस यांच्या लोकसंख्येच्या सिध्दांताचा बराच बोलबाला झाला होता. ''अन्न धान्याचे उत्पादन सावकाशीने अंकगणिती श्रेणीने वाढते, तर लोकसंख्या झपाट्याने-भूमिती श्रेणीने वाढते, त्यामुळे अतिरिक्त लोकसंख्येचा प्रश्न निर्माण होतो. दारिद्र्य, बेकारी, दुष्काळ, रोगराई, बालमृत्यू वगैरेमुळे लोकसंख्या कमी होऊन पुन्हा समतोल साधला जातो '' अशा प्रकारचा हा सिध्दांत पाश्चात्य राष्ट्रांमध्ये बऱ्याच काळपर्यंत मान्य होता. परंतु तेथील तांत्रिक प्रगतीमुळे व खुल्या आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे, त्याचा फारसा प्रभावी अविष्कार प्रत्यक्ष निदर्शनास आला नाही.

भारतात मात्र इ.स. १८७१ पासूनच्या लोकसंख्या गणनेची आकडेवारी लक्षात घेता; माल्थसचा सिध्दांत भारतात लागू होतोय, असे पाश्चात्य अर्थशास्त्रज्ञांचे प्रतिपादन होते; कारण एखाद्या देशात लोकसंख्या वाढलेली दिसली, तरी पुढच्या दशकात दुष्काळ किंवा रोगराई (एन्फ्लुएंझा, मलेरिया, कॉलरा, प्लेग इत्यादी रोग) यामुळे ती कमी झालेली दिसते. तेव्हा भारतातले दारिद्र्य, बेकारी, दुष्काळ, रोगराई इत्यादींना अतिरिक्त लोकसंख्या हेच कारण आहे; असा युक्तिवाद केला जाऊ लागला. या युक्तिवादाला विरोध करताना दादाभाई नौरोजींनी असे मत व्यक्त केले की, सत्तेच्या आधारावर भारतातील लोकांचे शोषण करुन इंग्लिश लोकांनी मिळविलेला नफा, व्याज, इत्यादी स्वयपातील मोठ्या प्रमाणावरील उत्पन्न, इंग्लंडला पाठविण्यात येत असल्यामुळेच भारत दरिद्री होत चालला आहे. परकीय सत्ता हीच या देशाच्या दारिद्र्याला व शोषणाला जबाबदार आहे, अतिरीक्त लोकसंख्या नव्हे. अर्थात हे मत सर्वच राष्ट्रवाद्यांना मान्य झाले असे नाही

इ.स.१९२१ पर्यंत स्थिर राहिलेली भारताची लोकसंख्या १९२१ पासून झपाट्याने वाढू लागली इ.स. १९३१ च्या व नंतरच्या जनगणनेच्या माहितीवरुन दिसते. इ.स. १९३० सालच्या जागतिक महामंदीचे परिणाम इतर देशांप्रमाणेच भारतातही दृष्टोत्पत्तीस येत होते. शेतीच्या दुरावस्थेमुळे ग्रामीण भागातील वाढते दारिद्र्य आणि उद्योगधंद्यातील मंदीमुळे शहरातील वाढती बेकारी यामुळे लोकसंख्या प्रश्नाकडे भारतातील अर्थशास्त्रज्ञांचे लक्ष वेधले गेले

**भारतातील संततिनियमनाची परिस्थिती:**

इ.स. १९२० पासून भारतात प्रा.र.धों. कर्वे संततिनियमनाचा प्रचार करीत होते. अमेरिकन बर्थ कंट्रोल लीग १९२१ मध्ये स्थापन करुन अमेरिकेत संततिनियमन चळवळीचा पाया घालणारी मार्गारेट सँगर इ.स. १९३५ मध्ये संततिनियमनाचा प्रचार करण्यासाठी भारतात आली होती. महात्मा गांधीबरोबर तिने यासंदर्भात चर्चा केली. महात्मा गांधींनी देशाचे पारतंत्र्य आणि कौटुंबिक कर्तव्यात खर्च होणारी शक्ती लक्षात घेता; कुटुंब मर्यादित करण्याची आवश्यकता मान्य केली, परंतु त्यासाठी कृत्रिम साधनांची गरज नाही; या संदर्भातील महात्मा गांधींची विचारसरणी वेगळी व स्त्रियांना पटण्यासारखी नाही. ते म्हणतात ''एक मूल होऊ देण्यापुरतेच विवाहित स्त्रीपुरुषांनी कामसंबंध ठेवावा, एरवी आत्मसंयमन करावे.'' विवाहांतर्गत ब्रह्मचर्य, हाच संततिनियमनाचा एकमेव मार्ग होय, असे त्यांचे मत होते. भारतातील समाज अध्यात्मवादी असल्यामुळे विवाहांतर्गत ब्रह्मचर्य व आत्मसंयमन यांच्या साहाय्याने मुलांचे जन्म रोखता येतील व कुटुंब मर्यादित करता येईल, असे मत त्यांनी व्यक्त केले. गांधीवादी लोकांनी हीच विचारसरणी पुढे आणली.

गांधी वाद्याप्रमाणेच हिंदू महासभेने या ठरावाला विरोध केला त्यांनी सांगितले की, संख्या हेच सामर्थ्य आहे. हिंदूची संख्या वाढली पाहिजे. मुस्लिम लिगने देखील ठरावाला विरोध केला. कारण त्यांचा पवित्र धर्मग्रंथ कुराणमध्ये संततीनियमनाला मान्यता नाही. कम्युनिस्टांनी याला विरोध करताना सांगितले की, देशातील दारिद्र्य भांडवलशाहीमुळे निर्माण झाले आहे आणि भांडवलशाहीचे प्रवक्ते मुख्य प्रश्नावरुन दुसरीकडे लक्ष वेधण्यासाठी संततीनियमनाचा पुरस्कार करतात. राष्ट्रवाद्यांनी सांगितले की, ब्रिटीश साम्राज्यशाहीमुळे देशात दारिद्र्य निर्माण झाले आहे. साम्राज्यशाही गेली की आपोआपच देशातील दारिद्र्याचा प्रश्न सुटेल सर्व पक्षांनी या ठरावाला वेगवेगळया कारणासाठी अशा प्रकारे विरोध केला.

या पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे लक्ष अतिरिक्त लोकसंख्येच्या नियंत्रणाकडे वेधले गेले. सर्वसामान्य लोकांच्या बाबतीत ब्रह्मचर्य आणि आत्मसंयमन हा उपाय अव्यवहार्य आहे व मानवी स्वभावाला अनुसरुन नाही बाबासाहेब म्हणतात ''एकमेकांवर प्रेम करणारे तरुण पती-पत्नी एकत्र राहात असतील, तर त्यांना कामवासनेचा मोह टाळणे फारच अवघड आहे. तेव्हा अवास्तव नीतिकल्पनांच्या आधारे विवाहांतर्गत ब्रह्मचर्याची अपेक्षा करणे हे मानवी स्वभावाला धरुन नाही शिवाय सहज प्रेरणांचा कोंडमारा करुन अगदी इच्छेविरुध्द स्त्रीने आत्मसंयमन केले, पण पतीला ते शक्य झाले नाही तर पत्नीवर लादल्या गेलेल्या शरीरसंबंधाचे परिणाम; जन्माला येणारी मुले आणि पत्नी यांनाच पाठोपाठची बाळंतपणे रोग, दारिद्र्य वा अन्य स्वरुपात भोगावे लागतात. चोर सोडून संन्याशाला फाशी, असा प्रकार होतो. तेव्हा नको असलेल्या अपत्यांचा जन्मच टाळणे हाच त्यावर परिणामकारक उपाय होऊ शकतो आणि त्यादृष्टीने संततिनियमनाची साधने हे स्त्रियांना मिळालेले वरदानच म्हणावे लागेल.'' या पार्श्वभूमीवर

बाबासाहेबांचे संततिनियमन विषयक विचार हे स्त्रीमुक्ती चळवळीतील कार्यकर्त्यांना अधिक स्वागतार्ह वाटतात

देशान्तर, बालविवाह बंद होऊन मुलींच्या विवाहाचे वय वाढणे, स्त्रियांचे आर्थिक स्वावलंबन वगैरे उपाय कसे मर्यादित स्वरुपाचे किंवा निरुपयोगी व अव्यवहार्य आहेत; ते त्यांनी विशद केले. संततिनियमन हा एकच उपाय लोकसंख्या नियंत्रित करण्यासाठी उपयुक्त आहे, आवश्यक आहे, असा त्यांचा ठाम विश्वास होता. कुटुंब, कुटुंबातील मुलांचा विकास, स्त्रियांचे आरोग्य, देशाची आर्थिक उन्नती, दारिद्र्य - निवारण, अन्न पुरवठा अशा विविध दृष्टिकोनांतून त्यांनी या प्रश्नाचा विचार केला.

**संततिनियमनांबद्दलचा अशासकीय ठराव**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कुटुंब नियोजन आणि लोकसंख्या नियंत्रण याबाबतचे विचार समजावून घेताना बाबासाहेबांच्या वतीने श्री.पी.जे. रोहम यांनी मुंबई प्रांताच्या विधिमंडळापुढे १० नोव्हेंबर १९३८ रोजी मांडलेला संततिनियमनाच्या उपाययोजनां बद्दलचा अशासकीय ठराव; आणि त्यावरील भाषण हा मूलभूत आधार मानावा लागतो. डॉ. आंबेडकर स्वत:च हा ठराव मांडणार होते; पण काही कारणाने त्यादिवशी ते हजर राहू न शकल्याने त्यांच्या वतीने श्री. रोहम यांनी ठराव मांडला आणि बाबासाहेबांशी झालेल्या चर्चेनुसारच त्यांनी त्यावर भाषण केले हा ठराव पुढीलप्रमाणे होता : कुटुंब मर्यादित करण्याची निकडीची गरज लक्षात घेता या (मुंबई) प्रांतातील जनतेमध्ये संततिनियमनाच्या बाबतीत, एक प्रभावी प्रचार मोहीम सरकारने हाती घ्यावी आणि प्रत्यक्षात जन्मनियंत्रण करण्याच्या दृष्टीने पुरेशा प्रमाणात सोयी पुरवाव्यात, अशी शिफारस विधानसभा शासनाला करीत आहे.

हा ठराव बिनसरकारी होता आणि उघडपणे तो फेटाळला जाणार हे माहीत असूनही सर्वसामान्य लोकांच्या दारिद्र्याला कारणीभूत होणाऱ्या भारतातील अतिरिक्त लोकसंख्येच्या समस्येकडे शासनाने स्वीकारणे व राबविणे कसे अगत्याचे आहे; हे शासनाला पटवून देण्याकरिता स्वतंत्र मजूर पक्षातर्फे हा ठराव मांडला गेला. हा ठराव ५२ विरुध्द ११ मताने फेटाळला गेला. विसाव्या शतकात वावरत असूनही अध्यात्मवाद आणि धार्मिकता यांनी झपाटलेल्या भारतीय समाजाला, बाबासाहेबांचे विचार त्या काळात पचले नाहीत; असे खेदाने म्हणावे लागते. परंतु या ठरावावरुनच बाबासाहेबांचा द्रष्टेपणा, काळाच्या पुढे जाऊन देशाच्या उन्नतीविषयी विचार करण्याची ताकद, दरिद्री लोक आणि स्त्रिया यांच्याबद्दलची कळकळ स्पष्ट होते

श्री.बी.के. गायकवाड यांनी ठरावाला अनुमोदन देताना असा विचार मांडला की, ''कुटुंबाला पोसण्यासाठी अनेकांवर भीक मागण्याची वेळ येते. उदरनिर्वाह करणे अशक्य झाल्याने अनेक जणांनी आत्महत्या केली आहे. जोपर्यंत सरकारजवळ बेकारीच्या व दारिद्र्याच्या समस्येवर जालीम उपाय नाही, तोपर्यंत तरी सरकारने ही संततिनियमनाची योजना स्वीकारावी त्यामुळे बेकारीला आवर घालणे व मर्यादित कुटुंबाला बऱ्यापैकी पोषण व्यवस्था उपलब्ध करुन देणे शक्य होईल. उपलब्ध शेतजमिनीवर लोकसंख्येचा जो ताण पडतो, त्यामुळेच मुख्यत: शेतजमिनीचे छोटे छोटे तुकडे होतात व परिणामत: शेतकरी दरिद्री बनत जातात''

असेच मत स्वतंत्र मंजूर पक्षाची घटना व कार्यक्रम याबद्दलच्या वृत्तान्तात बाबासाहेबांनी नमुद केले आहे. संततिनियमनाबद्दल ठरावावरील भाषणात ते नमूद करतात की, ''भारतात प्रत्येकी फक्त पाऊण एकर जमीन मिळू शकते आणि रॉयल कमिशनच्या

म्हणण्याप्रमाणे तर आतापर्यंत लागवडीखाली न आलेल्या जमिनीपैकी बरीचशी जमीन जवळजवळ निरुपयोगी अशीच आहे. लोकसंख्येच्या अतिरिक्त वाढीमुळे आपल्या देशात जंगल, जमिनी आणि चराऊ कुरणेही लागवडीखाली आणली गेली आहेत. त्याचा परिणाम म्हणून शेतीला उपयुक्त जनावरे आणि त्यायोगे शेणासारखी सेंद्रिय खते यांचा तुटवडा भासून शेती व्यवस्था सुधारणे अवघड बनत चालले आहे. पाण्याच्या तुटवड्यामुळे व इतर कारणांमुळे कृत्रिम खतांचा जास्त प्रमाणात वापर करणे शक्य नाही. शेतीच्या या दुरावस्थेमुळे ग्रामीण भागात कमालीचे दारिद्र्य निर्माण होऊन अनेकांना पौष्टिक अन्नही मिळू शकत नाही. तेव्हा दारिद्र्यनिवारण व पुरेशा प्रमाणात अन्नपुरवठा, यासाठी संततिनियमन करुन लोकसंख्यानियंत्रण केल्याशिवाय तरणोपाय नाही'' असे त्यांनी प्रतिपादन केले.

दरिद्री माणसे आणि स्त्रिया यांच्या दृष्टिकोनातून संततिनियमनाची गरज दरिद्री माणसे आणि स्त्रिया यांच्या दृष्टिकोनातून बाबासाहेबांनी संततिनियमनाची आवश्यकता प्रतिपादन केली आहे. बाबासाहेबांना स्वतःला दारिद्र्याचे चटके बसलेले असल्यामुळे, दरिद्री माणसांना संततिनियमन हे वरदान ठरेल; असे जर वाटले, तर नवल नाही. परंतु जास्त मुले जन्माला घालाव्या लागणाऱ्या स्त्रियांना त्या संकटातून मुक्त करुन दिलासा देणाऱ्या संततिनियमनाचा पुरस्कार करण्यामागे बाबासाहेबांची स्त्रियांबद्दलची एक विशिष्ट दृष्टी दिसून येते. पाठोपाठ मुलांना जन्म द्याव्या लागणाऱ्या स्त्रियांच्या दुःखाकडे त्यांनी लक्ष वेधले मोठ्या संख्येने मुले होणे, लागोपाठ मुले होणे, यामुळे अनेक स्त्रिया मृत्यूमुखी पडतात. नको असलेली संतती टाळण्यासाठी अनेक स्त्रिया अघोरी पद्धतीने गर्भपात घडविण्याचा प्रयत्न करतात. कोणत्याही कारणाने स्वीकारावीशी न वाटणारी मुले जन्माला आली, तर मुलांच्या संगोपनाकडे मातांचे दुर्लक्ष होते, अशी मुले समाजाला निव्वळ भार बनतात. रोगट व्यक्तींनी जन्माला घातलेल्या मुलांमध्ये रोगट प्रजा निर्माण होते. त्यामुळे यासंदर्भात बाबासाहेबांनी एक महत्त्वाचा विचार मांडला आहे.

बाबासाहेब म्हणतात, ''कोणत्याही कारणासाठी का होईना, ज्यावेळी एखाद्या स्त्रीची मूल होऊ देण्याची इच्छा नसेल, त्यावेळी तिला ती गर्भधारणाच टाळता येण्याची शक्यता असली पाहिजे आणि संतती जन्माला घालणे, हे सर्वस्वी तिच्या इच्छेवर अवलंबून असले पाहिजे, गरोदरपणाचा, बाळंतपणाचा आणि 'मुलांच्या संगोपनाचा भार स्त्रीलाच होतो. तेव्हा मुले केव्हा आणि किती होऊ द्यावयाची, हा निर्णय तिचाच असला पाहिजे'' या अलीकडच्या स्त्रीमुक्ती चळवळीच्या विचाराशी बाबासाहेबांचा विचार सुसंगत आहे. बाबासाहेबांच्या विचारात स्त्रीमुक्तीची बीजे ठिकठिकाणी सापडतात. याचेच हे एक उदाहरण आहे. मुलांच्या जन्माच्या निवडीबाबतची संधी संततिनियमनामुळेच स्त्रियांना मिळू शकते, म्हणून त्यावर स्त्रियांच्या चळवळीत भर आहे. फक्त संततिनियमनाची साधने स्त्रीच्या आरोग्याच्या दृष्टीने सुरक्षित असावीत आणि पुरुष वापरु शकतील, अशा साधनांबाबतही अधिक संशोधन व्हावे, असा त्यांचा आग्रह आहे.

**आर्थिक दृष्ट्या मागासलेपणा बाबत बाबासाहेबांचा अनुभव:**

डॉ.बाबासाहेबांनी म्हटले आहे की, शारीरिक, मानसिक किंवा आर्थिकदृष्ट्या (दुर्बल) पंगू असलेल्या माणसांनी जन्माला घातलेल्या अपत्यांना खूप तोटा सहन करावा लागतो. आर्थिकदृष्ट्या मागासलेपणाबाबत बाबासाहेबांना स्वतःलाच अनुभव होता. त्यांच्या वडिलांना १४ मुले होती. ते चौदावे होते. मांजरपाटाचे शर्ट, फाटके कोट, वहाणांचा अभाव, खिशात पैसेच नसणे, अशी

एल्फिस्टन कॉलेजमध्ये शिकत असतानाची त्यांची अवस्था होती. त्यांच्या या हलाखीच्या अवस्थेला एवढी मुले होऊ देणारे त्यांचे वडीलच जबाबदार होते, असा त्यांचा सततचा ठाह होता. त्यांना स्वत: जास्त मुले झाली, त्याबद्दल त्यांना खंत वाटते. अस्पृश्य विद्यार्थ्यांच्या संमेलनप्रसंगी ते म्हणाले, ''मला पाच मुले झाली,त्यापैकी चार मेली,त्याबद्दल मला आता वाईट वाटत नाही. उलट मला एकप्रकारे आनंदच वाटतो आहे. पाचही मुले जगली असती तर आज त्या सर्वांचे खाणेपिणे व शिक्षण याचा बोजा माझ्यावर पडला असता; व ते मला फार त्रासाचे झाले असते.'' त्यांच्या म्हणण्याप्रमाणे दुर्बल माणसांनी जन्माला घातलेल्या संततीमुळे आई वडिलांना त्रास सहन करावा लागतोच, पण समाजालाही त्रास सहन करावा लागतो. कुटुंबातील मुलांच्या जादा संख्येमुळे त्यांच्या मुख्य आवश्यक गरजाही भागवता येत नाहीत. त्यामुळे ती रोगांना बळी पडतात. मुले चोऱ्या करु लागतात. दारिद्र्यामुळे अनैतिकता बळावते. दारिद्र्यामुळे वेळेवर लग्न करणे शक्य होत नाही. त्यामुळे अनेक रोगांना व अनिष्ट सवयींनी लोक बळी पडतात. मुली वेश्या व्यवसायाला लागतात. संततिनियमनाच्या साधनांचा वापर करुन नको असलेल्या मुलांचे जन्म टाळता येतील. त्यामुळे रोगिष्ट बनल्यामुळे मृत्यू पावणाऱ्या मातांच्या मृत्यूचे प्रमाणही कमी होईल. एकूण रोगराई कमी होऊ सार्वजनिक आरोग्य सुधारेल. दारिद्र्यामुळे कमालीच्या घडणाऱ्या गुन्ह्यांना आळा बसेल. माणसाच्या आध्यात्मिक उन्नतीला पूर्ण वाव मिळेल.

### दारिद्र्यनिवारणासाठी लोकसंख्या नियंत्रण

बाबासाहेबांना आपल्या देशातील दारिद्र्याबद्दल तीव्र चिंता वाटत होती. आपला देश हा हमाल आणि भिकाऱ्यांचा देश आहे, असे त्यांना वाटे. दारिद्र्यनिवारण हे सरकारचे प्राथमिक कर्तव्य आहे, असे ते मानत. दारिद्र्य निवारणासाठी लोकसंख्यानियंत्रण त्यांना आवश्यक वाटत होते. आधुनिक तंत्रज्ञानामुळे भरपूर अन्नपुरवठा होऊ शकतो आणि उत्पादनाचे न्याय्य वाटप केले असता अन्न समस्या उरणार नाही, अशा भ्रमात राहणे चुकीचे ठरेल, कारण अन्नधान्य उत्पादन वेगाने वाढण्याची फारशी शक्यता नाही; हे त्यांनी स्पष्ट केले. कुटुंब मर्यादित करुन लोकसंख्यावाढीवर नियंत्रण ठेवल्याशिवाय केवळ अन्नधान्याचे व उत्पादनाचे समान वाटप केल्याने टिकाऊ स्वरुपाची भौतिक उन्नती साधता येणार नाही, लोकसंख्येचा केवळ अन्न धान्य पुरवठ्यावर ताण पडतो असे नाही, तर शिक्षण किंवा इतर सुविधा यांचा पुरवठा कितीही वाढविला, तरी वाढत्या लोकसंख्येमुळे तो कमीच पडतो, असे प्रतिपादन त्यांनी केले.

### विरोधी आक्षेपांना उत्तर:

संततिनियमन व त्याद्वारे लोकसंख्या नियंत्रण याला विरोध करण्यांच्या आक्षेपांनाही त्यांनी उत्तरे दिली आहेत. सर्वप्रथम आपल्या देशातील लोकसंख्या वाढविण्याचा प्रयत्न करणाऱ्या फ्रान्स, जर्मनी, इटली यांसारखे देश व दारिद्र्य, बेकारी, उपासमार यांनी पछाडलेला भारत यांच्यामधील लोकसंख्या विषयक परिस्थितीतील फरकाकडे त्यांनी लक्ष वेधले. पाश्चात्य देशातील जननप्रमाण १९०० सालापासून वेगाने कमी होत गेले. आपल्या देशापेक्षा ते खूपच कमी झाले होते. आपल्या देशात मात्र ते उच्च पातळीवरच स्थिर राहिले होते. १९३६ मध्ये हिंदुस्थानातील जननप्रमाण दर हजारी ३५ होते; तर इटली, फ्रान्स, जर्मनी या देशांत ते अनुक्रमे दर हजारी २२.२, १५.००, १९.०० असे होते. इ.स. १९३८ मध्ये इंग्लंडमध्ये ते १५.३ होते. तेव्हा दुसऱ्या देशावर राज्य करण्याची अभिलाषा बाळगणाऱ्या व त्यासाठी लोकसंख्या वाढविण्याचा प्रयत्न करणाऱ्या या साम्राज्यवादी देशांचे, आपण अजिबात अनुकरण

करता कामा नये असा इशारा त्यांनी दिला. संततिनियमन केले तर आपल्या विशिष्ट वंशाची, धर्माची वा भूप्रदेशाची लोकसंख्या कमी होऊन आपले सामर्थ्य कमी होईन या भीतीने ठासलेल्या लोकांना, त्यांचा भ्रम कसा चुकीचा आहे हे बाबासाहेबांनी दाखवून दिले. कुटुंब मर्यादित केल्यामुळे संख्या कमी होईल हा भ्रमच प्रथम चुकीचा आहे. कारण लोकसंख्यावाढ जननवेगावर अवलंबून नसून संतती जगण्याच्या प्रमाणावर अवलंबून आहे. जननदर कमी होत जातो, तसा मृत्यूदरही कमी होत जातो आणि संतती जगण्याचे प्रमाण कमी न होता अनेक वेळा वाढलेलेच दिसते. शिवाय एखाद्या समाजगटाला लाभणारे ऐश्वर्य, संपत्ती, संस्कृती, प्रतिष्ठा या गोष्टी लोकांच्या संख्येवर अवलंबून नसून लोकांच्या गुणवत्तेवर अवलंबून असतात; हे आपल्याकडील पारशी समाजाच्या उदाहरणावरुन दिसते.

आधुनिक युध्दे ही सैनिकांच्या संख्येवर अवलंबून नसून अद्ययावत युध्दतंत्राच्या बळावर खेळली जातात. दारिद्र्य हेच वेगवेगळ्या वंशात, समाजात किंवा देशात शत्रुत्व निर्माण करणारे ठरत असल्यामुळे लोकसंख्या नियंत्रणाने त्याचे उच्चाटण झाले तर आपोआपच युध्दखोरी कमी होईल. संततिनियमनाचा प्रचार सर्वसामान्यांपर्यंत पोहोचू शकला नाही, तर निकृष्ट गुणवत्तेची प्रजा वाढून संततिनियमनामुळे मानवी समाजाची उन्नती न होता अधोगतीच होईल; ही भीती निराधार आहे. संततिनियमनाचे महत्त्व पटले तर सर्व समाजगट (मग ते कोणत्याही धर्माचे, वंशाचे व स्तराचे असोत) त्याचा स्वीकार करतात, असा पाश्चिमात्य राष्ट्रांचा अनुभव आहे हे नमूद करताना आपल्या देशबांधवांवर गाढ विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. ते म्हणतात, ''आपले हित कशात आहे हे आमच्या देशातील सर्वसामान्यांना, अगदी निरक्षरांनाही चांगले कळते. ते तेवढे निश्चितच बुध्दिमान आहेत. संततिनियमनाच्या साधनांच्या शोधाबद्दल व त्यांच्या उपलब्धतेबद्दल माहिती मिळताच ते त्याचा पुरेपूर वापर करतील यात मुळीच शंका नाही.'' अल्पसंख्यांक असलेल्या आपल्या दलित बांधवांनाही संततिनियमाचे महत्त्व पटवून देण्यात बाबासाहेब यशस्वी झाले होते, हे विशेष होय.

**बाबासाहेबांचे विचार काळाच्याही पुढे**

काळाच्या पुढे असलेल्या बाबासाहेबांचे विचार त्या काळातील धार्मिकता आणि अध्यातमवादाने पछाडलेल्या समाजाला पचले नाहीत. १९३८ साली बाबासाहेबांनी संततिनियमनविषयक ठराव मांडला, पण कुटुंब नियोजनाच्या वा संततिनियमनाला अधिकृत मान्यता मिळून त्याचा शासनाने अवलंब करायला १९५१ साल उजाडावे लागले. पहिल्या पंचवार्षिक योजनेत प्रथमत: जाणीवपूर्वक कुटुंबनियोजनाच्या धोरणाचा सरकारने अवलंब केला. त्यासाठी ७० लाख रुपये खर्चाची तरतूद केली. कुटुंबनियोजनाचा संदेश दूरवर पोहचविण्याच्या दृष्टिने ही रक्कम अपुरीच असली तरी संततिनियमनाचा शासनाने सक्रिय पुरस्कार करावा, हा बाबासाहेबांचा विचार आपल्या समाजाने स्वीकारल्याचे हे द्योतक आहे. ही रक्कम वाढत जाऊन सातव्या योजनेपर्यंत ती ३,२५६ कोटी रुपये झाली. यावरुन आपल्या देशाच्या भवितव्याच्या दृष्टीने संततिनियमन करुन राष्ट्रपातळीवर लोकसंख्या नियंत्रण कार्यक्रम निकडीने राबविण्याची आवश्यकता शासनाला पटलेली दिसते, हे स्पष्ट होते. स्वातंत्र्यपूर्वकाळात दरिद्री लोकांचे आणि स्त्रियांचे दु:ख व यातना कमी करण्यासाठी संततिनियमन आणि त्याद्वारे लोकसंख्यानियंत्रण करणे हा विचार व त्याचा प्रत्यक्षात अवलंब महत्त्वाचा होता. पण कालानुरुप आता विचारातही बदल होत आहे.

दरिद्री लोकांमध्येच मुलांच्या जन्माचे प्रमाण जास्त असते आणि त्यांचे दारिद्र्य हेच त्याला कारणीभूत असते, हा विचार आता मान्यता पावत आहे. अन्नाबाबतच्या शारीरिक उपासमारीमुळे लैंगिक भूक वाढते, मुले हाच म्हातारपणाचा आधार असणे, अनारोग्यकारक परिस्थितीमुळे बालमृत्यूचे प्रमाण जास्त असणे, अर्थार्जन व इतर कामांत मुलांचा हातभार लागणे यासारख्या विविध कारणांनी दरिद्री लोकांमध्ये मुले जन्माला येण्याचे प्रमाण जास्त असते. तेव्हा देशाच्या आर्थिक प्रगतीसाठी केवळ संततिनियमनाद्वारे लोकसंख्या नियंत्रणावर एकांगी भर न देता दारिद्र्यनिवारण हेच उद्दिष्ट मानून आर्थिक विकास घडवून आणणे, यावर भर देण्याची आवश्यकता आहे. आर्थिक विकासाचे फायदे दरिद्री जनतेपर्यंत पोहचून त्यांचे राहणीमान उंचावेल तर ही जनता आपणहून संततिनियमनाचा स्वीकार करेल, यात शंका नाही. याच दृष्टीने सहाव्या योजनेपासूनच आर्थिक नियोजनात दारिद्र्य निवारणावर भर देण्यात आला आहे. परंतु योजना फक्त कागदावरच चांगल्या असून, भागत नाहीत. त्यांची परिणामकारक अंमलबजावणी महत्त्वाची आहे. शासनाकडे तशी राजकीय इच्छाशक्ती असेल, तरच या योजना प्रत्यक्षात उतरु शकतात. शासनाने हे आव्हान स्वीकारुन या योजनांची प्रामाणिक अंमलबजावणी केली, तरच संततिनियमन करण्यामागचे बेकारी आणि दारिद्र्यनिवारण करण्याचे बाबासाहेबांना अपेक्षित उद्दिष्ट साध्य होऊ शकेल.

सध्या देशात दरवर्षी सुमारे सव्वादोन कोटींनी लोकसंख्या वाढत आहे. म्हणजेच दरवर्षी आपल्या देशात एक नवा ऑस्ट्रेलिया किंवा नवा कॅनडा तयार होत आहे. अशा वाढत्या लोकसंख्येमुळे पुढील काही वर्षात अन्नधान्याचा प्रश्न तर तीव्र होणार आहेच, परंतु गरिबीदेखील वाढत जाणार आहे. आता देशात लोकसंख्या वाढीचा वेग शून्य असला पाहिजे. म्हणजे जेवढे लोक मृत्यू पावतात, तेवढेच जन्माला आले पाहिजेत, असा शून्यवाढीचा वेग जपान, जर्मनी, अमेरिका, इंग्लंड अशा सर्वच पुढारलेल्या देशात पाहावयास मिळतो. म्हणजे १९६० मध्ये त्यांची जेवढी लोकसंख्या होती. तेवढीच ती आता आहे. त्यामुळेच हे देश एवढी प्रगती करु शकले. दुर्दैवाने देशात १९७७ पासून या कार्यक्रमाची जी पीछेहाट झाली, ती अजूनही भरुन आलेली नाही.

कोणताही राजकीय पक्ष या प्रश्नांबाबत गांभीर्याने विचार करीत नाही. वास्तविक आपल्या अर्थसंकल्पात या कार्यक्रमाला उत्तेजन देण्यासाठी भरपूर तरतूद केली पाहिजे. कारण ती तर भांडवल गुंतवणूकच असेल. आगामी दशकात एक राष्ट्रीय प्रश्न समजून सर्वच पक्षांनी कुटुंबनियोजनाच्या प्रश्नाला सामोरे गेले पाहिजे. कुटुंबनियोजनाचा प्रसार आज उच्च व मध्यम वर्गात चांगल्या प्रकारे आहे, परंतु आर्थिकदृष्ट्या गरीब वर्गात तो जवळजवळ पोचलेलाच नाही. ज्या समाजात याची सर्वात जास्त गरज आहे, तेथे हा कार्यक्रम अजूनही पोहचलेला नाही. झोपडपट्टया, छोटा शेतकरी, शेतमजूर, दलित, आदिवासी समाज यांच्यापर्यंत हा कार्यक्रम कसा जाईल, याचा गंभीरपणे विचार केला पाहिजे. त्या दृष्टीने डॉ. आंबेडकरानी १९३८ मध्ये कुटुंबनियोजनाबद्दल मांडलेले विचार आजही दीपस्तंभासारखे मार्गदर्शक ठरतील.

**संदर्भ ग्रंथ:**


१. किर धनंजय: डॉ.बाबासाहेब आंबेडकराचे चरित्र,पॉप्युलर प्रकाशन मुंबई

२. निंबाळकर वामन: प्रज्ञासूर्य, दिलीपराज प्रकाशन,पुणे

३. लोकराज्य: डॉ. आंबेडकर विशेषांक,ऑक्टोबर २००६.

४. मंगुडकर मा प : डॉ.आंबेडकर अॅड फॅमिली प्लॅनिंग
५. मंगुडकर मा प : कुटूंबनियोजनाचा द्रष्टा पुरष्कर्ता दै सकाळ १४ एप्रिल १९९९
६. राउत नितीन : डॉ.आंबेडकर अॅड पॉप्युलेशन पॉलीसी शिप्रा पब्लिकेशन,दिल्ली
७. राव सौदामिनी : डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि लोकसंख्या, डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृत मंडळाद्वारे प्रकाशित, डॉ. आंबेडकर गौरव ग्रंथ १९९३
८. प्रधान ग प्र :संततीनियमनाचे आद्य प्रणेते दै लोकसत्ता,लोकरंग पुरवणी, ९ जानेवारी २००२
९. सहाय कल्याण भूषण : जनसंख्यावृध्दीदर मे तेजी, दै जनसत्ता १८ऑक्टोबर १९९६

❖ ❖ ❖

# महाराष्ट्रातील आदिवासींचे आर्थिक जीवन : समस्या आणि उपाययोजना

प्रा. वसंत मोरे
समाजशास्त्र विभाग,
मोहनराव पतंगराव पाटील महाविद्यालय, बोरगांव, जि. सांगली

### प्रस्तावना

१९ व्या शतकात मानवशास्त्रज्ञानी आदिवासी ही संज्ञा विकसित केली. या संज्ञेनुसार एकाच भूभागावर वास्तव्य करणाऱ्या, एकच नाव धारण करणाऱ्या, एकच बोलीभाषा बोलणाऱ्या, विवाह आणि व्यवसायाच्या बाबतीत समान नियमांचे पालन करणाऱ्या आणि विशिष्ट मूल्ये व विचारप्रणाली यांची जपणूक करणाऱ्या कुटूंबाच्या समुदायाला आदिवासी समाज म्हणतात. आदिवासी या संज्ञेचा अर्थ मूळ रहिवासी असाही होतो. नागरी संस्कृती आणि वस्तीपासून दूर राहणारे ते आदिवासी. बरेचसे आदिवासी डोंगरदऱ्या आणि जंगलात रहात असल्यामुळे त्यांचा उल्लेख गिरीजन, वनवासी असाही केला जातो. ते सतत निसर्गाच्या सानिध्यात रहात असल्यामुळे त्यांच्या प्राथमिक गरजांची पुर्तता ते निसर्गातूनच करतात. भारतात आदिवासी म्हणून गणल्या गेलेल्या समूहांना अनुसूचित जमातीचा दर्जा देण्यात आला आहे. यामध्ये आदिम जाती, वनवासी, गिरीजन या संज्ञा ही अंतर्भूत आहेत. भारतीय घटनेच्या ३४२ व्या कलमातील मार्गदर्शक तत्वानुसार हा दर्जा देण्यात आला आहे. भौगोलिकदृष्ट्या आदिवासी समाज इतर समाजापासून दूर राहिल्यामुळे त्याने आपली स्वतंत्र अशी सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक ओळख जतन केलेली आहे.

### अभ्यासाची उद्दिष्टे

१. आदिवासींच्या आर्थिक जीवनाचे स्वरुप जाणून घेणे.
२. आदिवासी जीवनाशी संबंधित विविध समस्या जाणून घेवून त्यावर उपाययोजना सुचविणे.

### संशोधन अभ्यास पध्दती

प्रस्तुत शोधनिबंध हा महाराष्ट्रातील आदिवासींच्या आर्थिक जीवनाशी निगडीत आहे. महाराष्ट्रातील आदिवासींच्या आर्थिक जीवनाशी संबंधित विविध घटक व त्यांचे स्वरुप जाणून घेण्याचा प्रयत्न या अभ्यासातून केला आहे. हा अभ्यास दुय्यम स्वरुपाच्या माहितीवर आधारित असून सदर माहिती विविध संदर्भ पुस्तके, मासिके, लेख, अहवाल यामधून घेण्यात आली आहे.

### महाराष्ट्रातील आदिवासी

भारतामध्ये ४६१ आदिवासी जमातींचा उल्लेख असून त्यापैकी ४७ जमाती महाराष्ट्रात आहेत. आदिवासी लोकसंख्येच्या प्रमाणात भारतात महाराष्ट्र सहाव्या क्रमांकावर असून राज्याच्या लोकसंख्येत हे प्रमाण ९.४ टक्के इतके आहे. २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील १५ जिल्ह्यात १.०२ कोटी इतकी लोकसंख्या आहे. महाराष्ट्रातील ४७ जमाती पैकी कातकरी, कोलम आणि माडिया गोंड या तीन जमाती अतिमागास जमाती म्हणून गणल्या गेल्या आहे. त्यांची लोकसंख्या ४.८५ लाख इतकी आहे. माडिया गोंड ही गोंडाची उपजमात असून त्या स्वतःची शेती कसणाऱ्या नाहीत. गरजेनुसार व उपलब्धतेनुसार असणारे व्यवसाय करून उपजिविका करणाऱ्या या जमाती असल्यामुळे त्यांना अतिमागास म्हटले आहे. कोलाम व कातकरी हे स्थलांतर करणारे आहेत. त्यामुळे शेतमजूरी आणि भटकी अर्थव्यवस्था त्यांच्यात

टिकून आहे. त्यांच्या समस्या या इतर आदिवासी समुदायापेक्षा गंभीर आहेत. महाराष्ट्रातील आदिवासींचे भौगोलिकदृष्टया तीन गटात वर्गीकरण केले आहे.

**सह्याद्री विभागः** सहयाद्री पर्वतरागांत महादेव कोळी, वारली, कोकणा, ठाकर, कातकरी या जमातींची वस्ती आहे.

**सातपूडा विभागः** या विभागात भिल, कोकणा, गावित, दुबळा, धनका या जमातींची वस्ती आहे.

**गोंडवन विभागः** यामध्ये चंद्रपुर, गडचिरोली, यवतमाळ, अमरावतीचा मेळघाट यांचा समावेश होतो. तेथे गोंड, मालिआ, बडा माडिआ, मुरिआ, परधान, कोरकू, कोलाम, आंध, हलवा या जमातींची वस्ती आहे.

**आदिवासींच्या आर्थिक जीवनाचे स्वरुप :**

अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजा भागविण्यासाठी मानवाला नेहमी झगडावे लागते. यासाठी तो उपलब्ध साधनांचा वापर करतो. समाज कोणताही असो, त्याला आर्थिक संघटन हे असतेच. आदिवासी समाजामध्ये ते अत्यंत साधे आणि मूलभूत स्वरूपाचे असते. आदिवासींना आपल्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी खूप झगडावे लागते, संघर्ष करावा लागतो, तेव्हाच त्या पूर्ण होतात. म्हणजेच त्यांची अर्थव्यवस्था निर्वाहप्रधान आहे. ते निसर्गातून उपलब्ध होणाऱ्या घटकांवर आपली गुजराण करत असतात. कारण कोणतीही तांत्रिक साधने आणि त्याविषयीचे तांत्रिक ज्ञान त्यांच्याकडे अत्यंत जुजबी स्वरूपाचे असते. त्यामुळे मर्यादित गरजांसाठीही प्रचंड कष्ट उपसावे लागतात.

बहुतांशी आदिवासी शेती करतात. पण कोणत्याही आधूनिक तंत्रांचा वापर न करता पारंपारिक पध्दतीने शेती केली जाते. नांगरट, मळणी ही साधी कामे ही हाताने केली जातात. त्यामुळे उत्पादन फारच कमी प्रमाणात मिळते. आदिवासींच्या अर्थव्यवस्थेत पैशाला फारसे महत्व नव्हते. त्यामुळे गरजा भागवून साठवून ठेवण्यासारखे त्यांच्या जीवनात काहीच नसते. वस्तूंची देवाण–घेवाणही मर्यादित स्वरूपात असते. शारीरिक कष्टाचा मोबदलाही धान्य अगर वस्तुरूपात दिला जातो. एका वस्तूची गरज पूर्ण करण्यासाठी दुसरी वस्तू दिली जाते. या प्रथेचे प्रमाण आता कमी झाले असून आता पैशाने तिची जागा घेतली आहे.

आदिवासी अर्थव्यवस्थेत गरजा भागविणे हा एकमेव उद्देश असतो. नफा मिळविण्याच्या उद्देशाने उत्पादन घेतले जात नाही. मात्र बहुतेक वेळा याचे स्वरूप सामूहिक असल्यामुळे उत्पादनही वाटून जाते. तसेच आदिवासींमध्ये विशेषीकरण आढळून येत नाही. आदिवासींच्या मधील श्रमविभागणी स्त्री–पुरूष लिंग भेदावर, फार तर वयानूसार आढळून येते. परंतु विशेषीकरणाला कोणताही वाव नाही.

**६. आदिवासींच्या आर्थिक क्रिया :**

प्रसिध्द मानवशास्त्रज्ञ हरस्कोव्हिट्झ यांनी आदिवासींच्या विविध आर्थिक क्रिया सांगितल्या आहेत. त्यानुसार अन्नसंकलन, शिकार आणि मासेमारी, पशुपालन, शेती आणि हस्तकला या अर्थव्यवस्थेशी निगडीत काही आर्थिक क्रिया आहेत. परंतू अलिकडच्या काळात मोलमजूरी ही एक महत्वाची आर्थिक क्रिया निर्माण झाली असून त्यातून आदिवासींच्या अर्थव्यवस्थेत प्रत्यक्ष पैसा आलेला आहे.

**१ अन्नसंकलन :**

ही आर्थिक क्रिया अत्यंत प्राथमिक स्वरूपाची आहे. यामध्ये निसर्गात मिळणारी फळे, फुले, कंदमूळे, शेंगा, मध गोळा करणे, लहान प्राणी– पक्षी पकडणे, त्यांची शिकार करणे, खेकडे पकडणे, कालव पकडणे आणि त्यावर गुजराण करणे असे या आर्थिक क्रियेचे स्वरूप आहे. पण सद्य परिस्थितीत ही अवस्था आदिवासी समाजात फारशी दिसून येत नाही.

## २. शिकार आणि मासेमारी :

जंगलांचे प्रमाण आणि त्यातील प्राण्यांची संख्या विचारात घेता आदिवासी समाजात ही अवस्थाही फारशी नाही. शिकारीवर घालण्यात आलेल्या बंदीमुळे आज काल शिकार ही केली जात नाही. क्वचित प्रसंगी सणाच्या वेळी प्रतिकात्मक स्वरूपाची शिकार केली जाते. त्यामुळे ते उदरनिर्वाहाचे मुख्य साधन होऊ शकत नाही. मात्र मासेमारी मोठया प्रमाणावर होते. शासनाने निर्माण केलेल्या पाणलोट क्षेत्र व जलसिंचन प्रकल्पामुळे मत्स्यबीज व मत्स्यपालन केले जाते. मासेमारीतून उदरनिर्वाहा बरोबरच त्याच्या विक्रीतून प्रत्यक्ष चलन पुरवठा असा दुहेरी हेतू साध्य होतो.

मासेमारी हा जुनाच व्यवसाय असून पारंपारिक पध्दतीने केला जातो. पण केवळ मासेमारीवर उपजिविका होत नसल्यामुळे तो दुय्यम व्यवसाय आहे. मच्छीमारीसाठी गळ, जाळी या बरोबरच बांबूपासून तयार केलेले पिंजरे, जाळी वापरली जाते. तसेच भाले व धनुष्यबाणानेही मासेमारी केली जाते. तसेच काही विशिष्ट झाडाची पाने, फांद्या पाण्यात टाकल्याने त्यातील द्रव्यामुळे मासे बेशुध्द होतात व त्यांच्या हालचाली मंदावतात. हे असे मासे पकडणे सोपे जाते.

## ३ पशुपालन :

अन्नसंकलन, शिकारी आणि मासेमारी ही पूर्ण अशी उपजिविकेची साधने नाहीत. अन्न उत्पादन करणे शक्य आहे हे जसे माणसाला समजले तसे मानवी जीवनाचे चित्र बदलून त्यांच्या जीवनाला स्थैर्य मिळत गेले. त्याने प्राण्याना माणसाळून त्यांचे पालन सुरू केले. अन्न उत्पादनाच्या प्रक्रियेमध्ये तो प्राण्यांचा वापर करू लागला. या प्राण्यापासून त्याला दुध–दुभते, मांस, कातडी, केस, हाडे मिळविणे शक्य झाले. शिकारीसाठी सोबत म्हणून माणसाने प्रथम कुत्रा पाळला. त्यानंतर गाय, म्हैस, घोडा, गाढव, उंट, शेळ्या–मेंढया, कोंबड्या, बदक यांचे पालन माणूस करू लागला.

## ४ शेतीः

नवाश्म युगामधून सुरू झालेली शेती परंपरा हे उपजिविकेचे प्रमुख साधन आहे. आज बहुतेक सर्व आदिवासींमध्ये ही क्रिया अवलंबिली जाते. परंतु जमातीनुसार शेती कसण्याच्या पध्दती वेगवेगळ्या आहेत. काही आदिवासी 'स्थलांतरित शेती' करतात. ईशान्य भारतात याला 'झूम शेती' असे म्हणतात. जंगलातील काही भागावरील झाडे तोडून तो भूभाग साफ केला जातो व त्यावर गवत पालापाचोळा जाळून त्याची राख तयार केली जाते. काही काळ त्या ठिकाणी शेती केल्यावर ती जागा सोडून दुसऱ्या ठिकाणी जावून याच पध्दतीने नव्याने जमिन शेतीसाठी तयार केली जाते. यालाच 'स्थलांतरित' शेती म्हणतात. यामुळे जंगल संपत्तीची मोठया प्रमाणात हानी होते. महाराष्ट्रातील आदिवासींत ही प्रथा राहिलेली नसून बहुतेक जमाती स्थिर स्वरूपाची शेती करतात. तरीही आधूनिक तंत्रांचा अभाव, पाणी आणि जलसिंचनाची कमतरता, डोंगराळ जमिन यामूळे शेतीतून मिळणारे उत्पन्न कमी प्रमाणात व निकृष्ट दर्जाचे असते.

## ५ हस्तव्यवसाय :

हस्तव्यवसाय हे काही आदिवासींच्या उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन नाही. त्यांच्या कला, त्यांची कौशल्ये आणि त्यांचे हस्तव्यवसाय यांचा वापर ते आपल्या गरजा भागविण्यासाठी करत असतात. टोपल्या, परडया, मडकी या सारख्या दैनंदिन वापराच्या वस्तू ते बनवितात. त्यांच्या चित्रकलेला सांस्कृतिक महत्व आहे. महाराष्ट्रातील वारली जमात त्यांच्या चित्रकलेसाठी प्रसिध्द आहे. तसेच मुखवट्यांना धार्मिक व सांस्कृतिक महत्व आहे. या वस्तूंना जस जशी बाजारपेठ मिळू लागली तसतसे त्यातून उत्पन्न मिळू लागले. याचा परिणाम त्यांच्या अर्थव्यवस्थेवर होत आहे. परंतु प्रत्येक जमातींत

असा हस्तव्यवसाय असेलच आणि त्यात प्रत्येक कुटूंब वाकबगार असेल आणि त्यातून पैसा कमावेलच असे नाही.

६ मजूरी :

शहरी समुदायाबरोबरच आज ग्रामीण आणि आदिवासी क्षेत्रालगत औद्योगिकरण घडून येत आहे. या उद्योगांमध्ये कुशल आणि अकुशल कामगारांची गरज निर्माण झाली. त्यामुळे शहरी आणि ग्रामीण लोकांबरोबर आदिवासींनाही रोजगार उपलब्ध होऊ लागला आहे. कातकरी, ठाकर, कोलाम, वारली यांच्यामध्ये मजूरीचे प्रमाण अधिक आहे. साखर कारखाने, वीटभट्टी, रस्ते दुरूस्ती, ऊस तोडणी, कापड गिरणी या आणि अशा व्यवसायात मोठया प्रमाणावर आदिवासी मुनष्यबळ कार्यरत आहे.

**आदिवासी समाजातील समस्या :**

आदिवासींची जीवनपध्दती आणि त्यांच्या इतर समाजाशी आलेल्या संपर्कातून घडून आलेले परिवर्तन यातून काही समस्या निर्माण झालेल्या आहेत. या समस्या पुढील प्रमाणे–

**१ शेती संबंधी समस्या :**

काही आदिवासीमध्ये स्थलांतरित शेती केली जात असे. पण ही पध्दत फारशी अस्तित्वात नाही. कारण ती शेती करण्याची अतिमागास पध्दत आहे. यातून जंगल संपत्तीही मोठया प्रमाणात नष्ट होते व उत्पन्न ही फार कमी मिळते. त्यामुळे जंगलात शेती करण्यावर निर्बंध आले. बहुतांशी जमाती आज स्थिर स्वरुपाची शेती करत असल्या तरी आधूनिक तंत्रांच्या अभावामुळे आणि जलसिंचन व खतांचा वापर न केल्यामुळे त्यातून मिळणारे उत्पन्न हे अपुरेच असते.

**२ अनिष्ट प्रथांचा शिरकाव :**

आदिवासींचा बाह्य जगाशी संबंध आल्यामुळे नविन गोष्टींचा अवलंब होवून मूळ गोष्टी मागे पडल्या. आदिवासीत बालविवाह होत नसत. वधुवरांची निवड ते स्वतःच करतात. या पध्दतीत फरक पडला. लैंगिक शिक्षण देणाऱ्या युवागृहासारख्या संस्था बंद पडू लागल्या. सांस्कृतिक शिक्षण देणाऱ्या संस्थांच्या ऱ्हासामुळे सांस्कृतिक मूल्यांना तडे जावू लागले.

**३ वेठबिगारी :**

वेठबिगारी हा आर्थिक शोषणाचा एक प्रकार आहे. जमीन खंडाने घेवून त्यात राबणे किंवा उसनवारीचे पैसे देणे आणि त्याची फेड होईपर्यंत मजूरी करत राहणे ही दीर्घकालीन समस्या आहे. आदिवासींच्या अज्ञानामुळे व अडाणीपणामुळे त्यांची पिळवणूक होते. त्याचबरोबर विविध उद्योग, जंगल कंत्राटदार, जंगल उत्पादने गोळा करणे यातून रोजगार निर्माण झाला आहे. पण यातून केल्या जाणाऱ्या कष्टाचे, श्रमाचे योग्य दाम आदिवासींना दिले जात नाही.

**४ धर्मांतराची समस्या :**

आदिवासी क्षेत्रात विकासकामांच्या नावाखाली शिक्षण, व्यवसाय विषयक छोटी –मोठी कामे केली जातात. त्यांची अंमलबजावणी करताना लोकांना प्रार्थनास्थळात जावे लागते, इग्रजी शिक्षण घ्यावे लागते. यातून त्यांच्या धर्मांतराची प्रक्रिया सुरू होते. याच धोरणातून नैर्ऋत्य भारतात आदिवासी जमातींनी ख्रिश्चन धर्म स्विकारला आहे. हा धोका भारताच्या इतर राज्यातही वाढत आहे.

**५ व्यसनाधिनता :**

मद्यपान हा आदिवासी समाजाचा महत्वपूर्ण घटक आहे. आदिवासी समाजात कोणत्याही वयोगटातील स्त्री–पुरूष विविध कार्यक्रमाच्यावेळी गावातच तयार केली जाणारी मोहाची, गुळाची, तांदळाची ताडी, माडी अथवा कोणत्याही प्रकारची दारू घेतात. परंतु बऱ्याचवेळा या दारू सेवनाचा अतिरेक होवून त्याचे रुपांतर व्यसनात होताना दिसते.

**६ शिक्षण विषयक समस्या**

आदिवासींच्या शिक्षणासाठी शासनाने अनेक योजना सुरु केलेल्या आहेत. काही ठिकाणी निवासी

आश्रमशाळा सुरु करुन मुलांना सर्व साहित्य पुरविले जाते. यातील बरीच कामे शिक्षकांना करावी लागत असल्यामुळे शिक्षकांच्या समस्येत भर पडली आहे. तसेच आदिवासी मुलांसाठीची पुस्तके शहरी भागातील अभ्यासकाकडून तयार होत असल्याने त्यातील घटक, दाखले, उदाहरणाबाबत ही मुले अनभिज्ञ असतात. तसेच राष्ट्रभाषेचा आग्रह, इंग्रजीतून शिक्षण, पुस्तकी भाषा, मुलांची भाषा व संस्कृती, पायाभूत सुविधांचा अभाव यामुळे शैक्षणिक क्षेत्रात अपेक्षित यश दिसत नाही.

७ द्विभाषिकता :

आदिवासींचा बाह्य संस्कृती बरोबर संपर्क आल्यामुळे त्यांनी सुधारित भाषांच्या स्विकारास सुरुवात केली. त्यामुळे त्यांच्या बोलीभाषा नष्ट होत असल्याचे दिसते. आदिवासींच्या संस्कृतीचा भाषा हा एक महत्वाचा घटक नष्ट होवून त्यांच्या सामाजिक जीवनात पोकळी निर्माण होते. नैर्ऋत्य भारतातील बहुतांशी आदिवासींनी ख्रिश्चन धर्म व इंग्रजी भाषा स्विकारली आहे. त्यामुळे त्यांच्या संस्कृतीत फार मोठा फरक पडला आहे.

८ आरोग्यविषयक समस्या :

आदिवासी समाज निसर्गाधीन जीवन जगत असल्यामुळे तेथे मूलभूत सुविधांची वाणवा असते. आधूनिक वैद्यकिय उपचारांची कमतरता, दूषित पाणी यामूळे साथींचे आजार फैलावतात. बाह्य लोकांशी आलेल्या संपर्कामुळे पैशाची लालूच, शरीरविक्री, वेश्याव्यवसाय यातून गुप्तरोगाच्या प्रमाणात वाढ, एड्स सारख्या आजारांची लागण अशा समस्या निर्माण झाल्या आहेत.

९ कुपोषण समस्या :

आदिवासी समाजात कुपोषण ही एक गंभीर समस्या आहे. त्यासाठी अनेक कारणे जबाबदार आहेत. आदिवासी समाजात गवताचे छप्पर व कुडाच्या भिंतीपासून घर तयार केले जाते. या घरात माणसे आणि गुरे शेजारीच रहातात. त्यामुळे त्यांच्या मलमूत्रातून रोग फैलावण्यास मदत होते. आदिवासी क्षेत्रातील दळणवळण व्यवस्थाही कुपोषणास जबाबदार आहे. पावसाळ्यात तर नदी–नाल्यांना पुर आल्यावर जनसंपर्कच तुटतो. अशावेळी आजारी माणसाला वेळेत वैद्यकिय सेवा न मिळाल्यामुळे मृत्यु येतो. आदिवासी मधील अंधश्रध्दा ही कुपोषणाचे महत्वाचे कारण आहे. देव कोपल्यामुळे वा चेटूक लागल्यामुळे माणसाला रोग होतो अशी त्यांची समजूत असते. त्यामुळे ते प्रथम भगताकडे जातात. दवाखाना व डॉक्टर यांच्यावर त्यांचा प्रथम विश्वासच नसतो. भगताचे अंगारे–धुपारे करुन रोगी बरा न झाल्यास शेवटी त्याला दवाखान्यात नेले जाते. तोपर्यंत बराच वेळ गेलेला असतो. याशिवाय योग्य, पुरेसे व कसदार अन्न न मिळणे, खाण्या–पिण्याच्या सवयी, पोटात जंत होणे ही कारणेही कुपोषणाला जबाबदार आहेत.

१० राजकीय समस्या :

आदिवासी जमातीत एक प्रकारचे राजनैतिक संघटन असून प्रत्येक जमातीत जात पंचायत असते. या जात पंचायतीकडून लोकांवर नियंत्रण ठेवून छोट्या–मोठ्या संघर्षाचे निराकरण केले जाते. पंचायतीच्या तोडग्याचे स्वरुप सर्वसंमत असे. परंतू सद्या अस्तित्वात आलेले कायदे, पोलिस, स्थानिक स्वराज्य संस्था यामुळे जातपंचायतीचे महत्व कमी झाले. हे महत्व आधूनिक न्यायमंडळाना नाही. परंतू त्याला स्विकारण्यावाचून पर्याय नाही.

समारोप :

महाराष्ट्र राज्यात एकूण ४७ आदिवासी जमातींचा आधिवास असून कातकरी, कोलाम आणि माडिया गोंड या तीन जमाती अतिमागास जमाती म्हणून गणल्या गेल्या आहेत. भारतात या आदिवासींच्या लोकसंख्येच्या प्रमाणात महाराष्ट्राचा सहावा क्रमांक लागतो. आदिवासी समाजात अत्यंत साधे आणि मूलभूत स्वरुपाचे आर्थिक संघटन

आढळते. आदिवासींची अर्थव्यवस्था निर्वाहप्रधान असून गरजा भागविण्यापुरतेच वस्तुंचे उत्पादन केले जाते. आधूनिक तंत्रविद्येच्या अभावामुळे एका वस्तुची गरज पूर्ण करण्यासाठी दुसरी वस्तू दिली जाते. ही वस्तूंची देवाण-घेवाण मर्यादित स्वरूपात असते. आदिवासींच्या अर्थव्यवस्थेत विविध आर्थिक क्रिया केल्या जातात. पण सद्य परिस्थितीत शेती आणि मोलमजूरी या दोन क्रिया बहुतांशी आदिवासींकडून केल्या जातात. पण आदिवासी समाजाची जीवनशैली, त्यांचा इतर समाजाशी आलेला संपर्क यामूळे त्यांच्या जीवनात अनेक गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत.

**उपाययोजना :**

१. आदिवासी समाजाचे स्वतंत्र अस्तित्व अबाधित रहाण्याच्यादृष्टीने त्यांच्यासाठी स्वतंत्र अधिवासाची निर्मिती करण्यात यावी.

२. दोन भिन्न संस्कृतींच्या समाजाचे विलिणीकरण होणे ही अवघड गोष्ट असल्यामुळे आदिवासींच्या मूळ संस्कृतीला धक्का न लागता ते इतर समाजाबरोबर राहण्यासाठी समसंस्कृतीकरणाच्या दृष्टिकोणाचा वापर करावा.

३. आदिवासींचे सक्तीने सामिलीकरण घडवून आणण्याऐवजी इतर समाजाबरोबर एकीकरण घडवून आणण्यात यावे. हे करत असताना त्यांची भाषा, संस्कृती, जीवनमूल्ये जतन करण्यावर व विकासावर भर देण्यात यावा.

४. मोलमजूरी करणाऱ्या आदिवासीसाठी किमान मजूरी धोरण (Minimum wage policy) तयार करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी.

५. भूमिहीन आदिवासीना त्यांच्याच क्षेत्रात शेतीयोग्य जमिनीचे वाटप करावे. तसेच शेती कसण्यासाठी आवश्यक आधुनिक तंत्रे त्यांच्यात विकसित करण्यासाठी कृषी प्रशिक्षण केंद्रे निर्माण करून त्यांना प्रशिक्षण देणेत यावे.

६. शेती हा उदरनिर्वाहाचा आणि स्थिर जीवनाचा महत्वाचा घटक असल्यामुळे शेतीसाठी लागणारी साधने, अवजारे, हत्यारे प्राधान्याने आदिवासी क्षेत्रात उपलब्ध करून ती अनुदानावर देणेत यावी.

**संदर्भ ग्रंथः**


१. डॉ.शैानक कुलकर्णी – 'महाराष्ट्रातील आदिवासी', डायमंड प्रकाशन, पुणे-२००९.

२. डॉ.शैानक कुलकर्णी – 'संस्कृतीः निसर्ग आणि जीवनशैली', डायमंड प्रकाशन, पुणे-२००७.

३. गोविंद गारे – 'भारतीय आदिवासी : समाज आणि संस्कृती', अमृत प्रकाशन, औरंगाबाद,-२०००.

४. गोविंद गारे – 'वारली चित्रकला', श्री विद्या प्रकाशन, पुणे २००६.

५. गुरुनाथ नाडगोंडे – 'भारतीय आदिवासी ', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे -२००३.

६. जनगणना अहवाल २०११.


❖ ❖ ❖

# केसापूर गावातील प्रकल्पग्रस्तांच्या सामाजिक, आर्थिक स्थितीचा अभ्यास

**प्रा. नंदकुमार कुकलारे**
समाजशास्त्र विभाग प्रमुख,
श्री.आसारामजी भांडवलदार महाविद्यालय, देवगांव (र)

प्रस्तावना :-

देशाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी विकासाचे तत्व स्वीकारण्यात आले. या नियोजनामध्ये शेतीच्या विकासाला महत्त्वाचे स्थान देण्यात आले. शेतीचा विकास हा प्रामुख्याने सिंचनावर अवलंबून असतो म्हणून शेतीच्या विकासाशिवाय देशाचा विकास होणार नाही. आणि देशाचा विकास करण्यासाठी शेतीचा विकास करणे अत्यावश्यक आहे. त्या अनुषंगाने स्वातंत्र्यानंतरच्या काळात भारतात वेगवेगळ्या पंचवार्षिक योजनातून जलसिंचनाचा विकास झाला असला तरी अद्यापही बहुतांशी शेती पर्जन्यावर अवलंबून आहे. सरचार्ज त्रिवलेयन म्हणतात की, भारतात पाण्याचे मुल्ये जमिनीच्या मूल्यापेक्षा जात आहे हे विधान शेतीसाठी जलसिंचनाचे महत्व स्पष्ट करण्यास उपयुक्त ठरते. शेतीसाठी पाणी असेल तर जमीन खरबाड, पडीक व मुरमाड असली तरी त्यामध्ये चांगले उत्पन्न काढता येते. पाण्याच्या सहायाने मुरमाड जमिनीवर फळे आणि धान्ये तो हंगाम नसतांना उत्पन्न करता येतात. महात्मा फुलेंनी शेतीचा कस वाढविण्यासाठी सिंचनाच्या सोयी करिता सूचना केलेल्या आहेत. सिंचनाचे महत्व सांगतांना फुले म्हणतात, ज्या ज्या देशात शेतीला पाणी देण्या- करिता धरणे नाहीत. त्या देशात धरणे व कालवा होई पर्यंत शेतकऱ्यांची दारिद्रयावस्थेतून मुक्तता होण्यास दुसरा मार्ग नाही. देशाला दारिद्रयातून मुक्त करण्यासाठी महात्मा फुल्यांनी सिंचनावर भर दिलेला होता. आपला देश कृषीप्रधान असल्यामुळे शेतीचे उत्पन्न वाढल्याखेरीज देशाचा विकास होऊ शकणार नाही. हे लक्षात घेऊन जनतेकडून होणाऱ्या मागण्यांना चांगला प्रतिसाद देऊन सिंचन सुविधा निर्माण करण्याचा एक फार मोठा कार्यक्रम देश राज्य आणि जिल्हा पातळीवर कार्यरत करण्यात आला.

याचा परिणाम म्हणून देशात अनेक छोटे-मोठे धरणे किंवा बंधारे बांधले गेले आहेत. अद्यापही हे कार्य सातत्याने चालूच आहे. परंतु त्याच बरोबर जनतेची पाण्याची मागणी वाढत आहे. शेतीसाठी अधिकाधिक पाण्याचा उपयोग होत आहे आणि अधिकाधिक जमीन पाण्याखाली आणली जात आहे. तसेच उद्योगधंद्यासाठी पाण्याची मागणी वाढत आहे. लोकसंख्यावाढीमुळे पिण्याच्या व घरगुती वापराच्या पाण्याची गरज किती तरी पतीने वाढली आहे.

पाण्याची गरज पूर्ण करण्यासाठी व देशाचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी लहान मोठे प्रकल्प सुरु केले गेले. शेतीसाठी मुबलक पाणी मिळावे म्हणून मोठ मोठे जलसिंचन प्रकल्प बांधण्यात आले. परंतु त्या द्वारा विस्थापनाच्या समस्येने जन्म घेतला. प्रकल्पग्रस्तांच्या विस्थापनामुळे त्यांच्या पुनर्वसनाच्या समस्या निर्माण झाल्या. सिंचन प्रकल्पामुळे आणि औद्योगिक प्रकल्पामुळे विस्थापित होणाऱ्या लोकांच्या पुनर्वसनाची प्रकिया ही नैसर्गिक आपत्तीपेक्षा वेगळे आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे जे लोक विस्थापित होतात त्याचे कायमचे पुनर्वसन करण्यापूर्वी प्रथम

घाईघाईने तात्पुरते निवास उभारून किंवा तात्पुरती निवासाची व्यवस्था करून त्याच्या समस्या सोडविल्या जातात. सिंचन प्रकल्पामुळे विस्थापित होणाऱ्या लोकांच्या पुनर्वसनासाठी अशा प्रयत्नाची गरज नसते. त्यांच्या पुनर्वसनासाठी पुरेसात कालावधी असतो. त्यांच्या होणाऱ्या नुकसानीचे मोजपात करून भरपाई करता येते. तसेच विचारपूर्वक केलेल्या धोरणाच्या आधारे नियोजनबद्ध असलेल्या आरखडयानुसार पुनवर्सन करता येते. हे शक्य असले तरी मध्यम व मोठ्या जलसिंचन प्रकल्पामुळे विस्थापित होणाऱ्या प्रकल्पग्रस्तांच्या समस्या समाधानकारक सोडविल्या गेल्याचे दिसुन येत नाही. जे लोक वर्षानुवर्षे ज्या गावात राहिलेत ते गाव त्यांना सोडून देण्यास भाग पाडले जाते. त्यामुळे लोक आपल्या मूळगावातून विस्थापित होतात. त्यांना आपले मुळगाव सोडून इतरत्र राहायला जावे लागते. म्हणून या विस्थापित झालेल्या लोकांचे विविध प्रश्न निर्माण झालेले आहेत.

नवी दिल्ली येथील भारतीय सामाजिक संस्थेने दिलेल्या माहितीप्रमाणे स्वतंत्र्यानंतरच्या काळातल्या निरनिराळ्या मोठ्या प्रकल्पांनी एक कोटी चाळीस लाख लोकांना विस्थापित केले. टाटा सामाजिक विज्ञान संस्थेचे डॉ.परशुरामन म्हणतात, विस्थापिताच्या आजच्या परिस्थितीची चौकशी करताना पहिला अडसर येतो तो असा की, हे विस्थापित कुठे सापडत नाही.

औरंगाबाद जिल्ह्यातील वैजापूर, गंगापूर व कन्नड हे तीन तालुके अवर्षण प्रणव म्हणून ओळखले जातात. वैजापूर तालुक्याचा विकास करण्यासाठी नांदूर-मधमेश्वर प्रकल्प व बोर दहेगाव प्रकल्प, गंगापूर तालुक्यासाठी टेंभापुरी प्रकल्प, शिल्लेगाव बृहत लघु सिंचन प्रकल्प आणि कन्नड तालुक्यासाठी अंबाडी मध्यम प्रकल्प, शिवना टाकळी मध्यम प्रकल्प इत्यादी प्रकल्प उभारण्यात आले आहे.

शिवना टाकळी मध्यम प्रकल्पाचा एकूण उपयुक्त जलसाठा . द.ल. घनमीटर असून त्या पासून वैजापूर व कन्नड तालुक्यातील हेक्टर जमिनीला सिंचनाचा लाभ होतो. या प्रकल्पात एकूण हेक्टर जमीन संपादित केली असून त्यात अंतापूर, अलापूर, केसापूर, जैतापूर व वैसपूर या पाच गांवातील लोक विस्थापित झालेले आहे. त्यांचे मध्ये पुनर्वसन करण्यात आले. परंतु या प्रकल्पग्रस्तांच्या समस्या सूटलेल्या नाही. विकास प्रकल्पामुळे विस्थापिताचे नियोजनबद्ध व व्यवस्थित पुनर्वसन करणे ही शासनाची जबाबदारी आहे. परंतु या प्रकल्पग्रस्तांना त्यांच्या संपादित जमिनीचा, घराचा व अन्य मालमत्तेचा योग्य मोबदला मिळालेला नाही. तसेच सुनियोजित सर्व सुख सुविधा युक्त असे आदर्श पुनर्वसन झालेले नाही. या प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या पाच गांवापैकी केसापूर गांवातील प्रकल्पग्रस्तांच्या समस्याचा शास्त्रीय पद्धतीने आभ्यास करण्यासाठी केसापूर गावाची निवड केली आहे.

औरंगाबाद जिल्ह्यातील कन्नड तालुक्यात शिवना नदीच्या जवळ वसलेले केसापूर हे गांव. २०११ च्या जनगणनेनुसार या गावाची लोकसंख्या ७३४ असून या गावातील बहुतांशी लोक शेती व्यवसाय करतात. तर काही मजुरी व शेतीपुरक व्यवसाय करतात. नदीकाठी जमीन असल्याने सुपीक काळीभोर आणि काही मध्यम भारी स्वरुपाची जमीन होती ही जमीन व गावठाण शिवना टाकळी मध्यम सिंचन प्रकल्पासाठी संपादित केली.त्यामुळे या गावाचे राष्ट्रीय महामार्ग क्रमांकच्या गल्लेबोरगांव पासून पश्चिमेस कि.मी. अंतरावर पुनर्वसन केलेले आहे. शासनाचे सिंचन प्रकल्पासाठी जमीन व घर संपादित केल्याने केसापुरचे आदर्श पुनर्वसन करून सर्व

भौतिक सुविधा व नागरी सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक होते परंतू तसे झाले नाही. अद्याप सर्व नागरी सुविधा दिल्या नाहीत तर काही अपूर्ण स्थितीत आहे.

संपादित मालमत्तेचा मावेजाही बाजार भावा प्रमाणे मिळालेला नाही. तर काही प्रकल्पग्रस्तांना तांत्रिक अडचणीमुळे मावेजा सुद्धा मिळालेला नाही. प्रकल्पापुर्वी स्वत:चे हकाचे घर असणारे लोक आज बेघर आहेत तर जमिनीदार असणारे शेतकरी मोलमजुरी करून आपली उपजीविका भागवत आहे. सार्वजनिक हितासाठी त्याग करणाऱ्यांच्या समोर अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत या प्रकल्पग्रस्तांच्या सामाजिक, आर्थिक स्थितीचा अभ्यास करण्यासाठी केसापूर गावाची निवड केलेली आहे.

**उद्देश :-**

१. प्रकल्पग्रस्तांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.
२. प्रकल्पामुळे निर्माण झालेल्या स्थित्यंराचा अभ्यास करणे.

**गृहीत कृत्ये :-**

१. प्रकल्पग्रस्तांच्या सामाजिक आर्थिक स्थितीत बदल झाला.
२. प्रकल्पामुळे प्रकल्पग्रस्तांच्या समस्यात वाढ झाली.

**तथ्य संकलन :-**

प्रस्तुत शोध निबंधासाठी केसापूर गावातील एकूण १०० विस्तापित कुटुंबापैकी ५० कुटुंबाची शास्त्रीय पद्धतीने नमुना निवड करून प्राथमिक स्रोत म्हणून निरीक्षण व मुलाखत अनुसूचीचा वापर करून नमुन्यात समाविष्ट असलेल्या उत्तरदात्याकडून वस्तुनिष्ठ तथ्ये संकलन करण्यात आले.

त्याच बरोबर दुय्यम स्रोत अंतर्गत संदर्भ ग्रंथ, सिंचन आयोग अहवाल, पाटबंधारे विभागाची टिपणी, शासनाचे परिपत्रक, नियम व मार्गदर्शक तत्वे तसेच प्रकाशीत व अप्रकाशित प्रबंध, नियतकालिके, मासिके वर्तमान पत्रे, साप्ताहिके, इत्यादीचा तथ्य संकलनासाठी आधार घेतला आहे.

केसापूर गावातील पिढ्यानपिढ्या शेती करून आपली चरितार्थ चालविणारी जमीन व ज्या अंगणात खेळत बागडत लहानचे मोठे झाले ते घर प्रकल्पात गेल्यामुळे प्रकल्पग्रस्तांना दु:ख झाले की नाही असा प्रश्न विचारला असता खालील माहिती मिळाली.

**प्रकल्पात घर/जमीन गेल्याबाबतची दु:ख झाल्याची भावना**

| अ.क्र. | घर/जमीन गेल्याबाबत दु:ख | वारंवारीता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ४२ | ८४% |
| २ | नाही | ०८ | १६% |
| | एकूण | ५० | १००% |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, प्रकल्पामध्ये घर/जमीन गेल्यामुळे ८४% उत्तरदात्यांना दु:ख वाटते तर १६% उत्तरदात्यांना घर/जमीन गेल्यामुळे दु:ख वाटत नाही.

केसापूर मधील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती असून इतर लोक शेत मजूर व शेतीशी संबधित कामे करतात. प्रकल्पामध्ये घर/जमीन गेल्यामुळे शेतकरी व शेत मजूर व बलुतेदार या सगळ्यांना दु:ख होते. कारण कोणत्याही व्यक्तीला आपल्या उदरनिर्वाहाच्या साधनावर संकट आल्यामुळे दु:ख वाटणे साहजिक आहे. म्हणून घर/जमीन प्रकल्पात गेल्यामुळे ८४% उत्तरदात्यांना दु:ख झाले तर १६% उत्तरदात्यांना प्रकल्पाचा फायदा होणार असे वाटत असल्याने त्यांना घर/जमीन गेल्यामुळे दु:ख होत नाही.

केसापूर गावातील जवळपास ७०% लोक शेती व्यवसाय करत होते. बहुतांशी शेतकऱ्यांना

स्वत:च्या मालकीची जमीन होती. तर काही लोक शेतीशी संबधित कामे करत होते. केसापूर मधील प्रत्येक कुटुंबाला स्वत:च्या मालकीचे घर होते. शिवना टाकळी मध्यम प्रकल्पासाठी गांवातील संपादित मालमत्तेचे स्वरूप अभ्यासले असता खालील माहिती दिसून आली.

**संपादित मालमत्तेचा तपशील दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | संपादित मालमत्ता | वारंवारीता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | घर | १६ | ३२% |
| २ | घर व जमीन | ३४ | ६८% |
| | एकूण | ५० | १००% |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की ३२% उत्तरदात्यांचे फक्त राहण्याचे घर संपादित झालेले आहेत. तर ६८% उत्तरदात्यांचे राहते घर व जमीन अशा दोन्हीही मालमत्ता प्रकल्पासाठी संपादित झालेली आहे.

केसापूर गावातील फक्त ६८% उत्तरदात्याकडेच स्वत:च्या मालकीची जमीन होती व सर्व म्हणजे १००% उत्तरदात्याकडे स्वत:चे घर होते. ही सर्व मालमत्ता प्रकल्पासाठी संपादित झालेली आहे.

आपल्या दैनंदिन गरजा पूर्ण करण्यासाठी व्यक्तीला कुठलातरी व्यवसाय करावा लागतो. केसापूर गावातील प्रकल्पग्रस्तांचा प्रकल्पापूर्वी व प्रकल्पानंतर कोणता व्यवसाय करतात. असा प्रश्न केला असता पुढील माहिती मिळाली.

**प्रकल्पापूर्वी व प्रकल्पानंतरचा व्यवसाय दर्शक तक्ता**

| अ.क्र | व्यवसाय | वारंवारीता | शेकडा प्रमाण | वारंवारीता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | शेती | ३२ | ६६% | २२ | ४४% |
| २ | व्यापार | २ | ४% | ४ | ८% |
| ३ | स्वंय रोजगार | ३ | ६% | ६ | १२% |
| ४ | मजुरी | ७ | १४% | ११ | २२% |
| ५ | नोकरी | २ | ४% | २ | ४% |
| ६ | अन्य | ३ | ६% | ५ | १०% |
| | एकूण | ५० | १०० % | ५० | १००% |

उपरोक्त तक्त्यावरून असे दिसून येते की, प्रकल्पापुर्वी एकूण उत्तरदात्यांपैकी ६६% उत्तरदाते शेती व्यवसाय करीत होते. तर प्रकल्पानंतर ४४% उत्तरदाते शेती व्यवसाय करतात. म्हणजे २२% उत्तरदात्यांनी प्रकल्पात जमीन गेल्यामुळे शेती सोडून इतर व्यावसायाकडे वळले आहेत. प्रकल्पापूर्वी ४% उत्तरदाते व्यापार करत होते. प्रकल्पानंतर ८% उत्तरदाते व्यापार करू लागले. संपादित मालमत्तेचा मोबदला म्हणून आलेल्या पैशातून ४% उत्तरदात्यांची वाढ झालेली आहे.

प्रकल्पापूर्वी ६% उत्तरदाते स्वंयरोजगार करत होते. प्रकल्पानंतर त्यामध्ये ६% ची वाढ होऊन १२% उत्तरदाते स्वंयरोजगार हा व्यवसाय करत आहे. या मध्ये पिठाची गिरणी, टेलरिंग, फेब्रीकेशन, मोटार रिवायडिंग इत्यादी प्रकारचे स्वंयरोजगार करतात.

केसापूर गावामधील प्रकल्पापूर्वी मजुरी हा व्यवसाय १४% उत्तरदाते करत होते. प्रकल्पानंतर त्यात ८% उत्तरदात्यांची वाढ होऊन सध्या स्थितीत २२% टक्के उत्तरदाते मजुरी करतात. प्रकल्पापूर्वी व प्रकल्पानंतर ही ४% उत्तरदाते नोकरी हा व्यवसाय करताहेत. त्यामध्ये कोणत्याही प्रकारची वाढ किंवा घट झालेली नाही.

प्रकल्पापूर्वी इतर व्यवसाय करणारे ६% उत्तरदाते होते त्यात ४% उत्तरदात्यांची वाढ होऊन १०% उत्तरदाते इतर व्यवसाय करत आहे. शिवना टाकळी प्रकल्पामध्ये जमिनी गेल्यामुळे पुन्हा जमीन खरेदी न करता आल्याने शेती व्यवसाय करणाऱ्यांचे २२% प्रमाण कमी झाले. स्वंयरोजगार, व्यापार, मजुरी व इतर व्यवसाय करणाऱ्याचे प्रमाण प्रकल्पानंतर वाढलेले आहेत. एकूणच उत्तरदात्याच्या प्रकल्पापूर्वीच्या व प्रकल्पानंतरच्या व्यवसायामध्ये स्थित्यंतर झालेले दिसून येते.

मानवाच्या अन्न, वस्त्र आणि निवारा या मुलभूत स्वरूपाच्या गरजा आहेत. व्यक्तीस ऊन, वारा, पाऊस यांच्यापासून संरक्षण करण्यासाठी निवाऱ्याची गरज असते परंतु हा निवारा सगळ्यांचा एक सारखा स्वरूपाचा असत नाही. व्यवसाय आणि आर्थिक स्थिती या नुसार घराचे स्वरूप बदलत असते. केसापूर खेड्यातील प्रकल्पग्रस्तांचे संपादित घराचे स्वरूप अभ्यासतांना पुढील प्रमाणे घराचे स्वरूप दिसून येते.

**प्रकल्पग्रस्तांचे संपादित घराचे स्वरुप दर्शक तक्ता**

| अ. क्र. | संपादित घराचे स्वरूप | वारंवारीता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | लाकडी मकान | २८ | ५६% |
| २ | सिमेंट बांधकामातील पत्रे | ८ | १६% |
| ३ | माती बांधकामातील पत्रे | ९ | १८% |
| ४ | झोपडी/छप्पर | ५ | १०% |
| ५ | सिमेंट कॉक्रीट (आरसीसी) | ० | ०% |
| | एकूण | ५० | १००% |

वरील तक्त्यावरून असे स्पष्ट होते की, केसापूर मधील ५६% उत्तरदात्यांचे लाकडी मकानाचे घर होते. तर १६% उत्तरदात्यांचे सिमेंट मध्ये बांधकाम केलेल्या पत्र्यांचे घर होते. १८% उत्तरदात्यांची माती बांधकामातील पत्र्याचे घर होते. आणि १०% उत्तरदात्यांचे साधी झोपडी किंवा छप्पर होते. जुन्या काळात ग्रामीण भागात झाडाची संख्या मुबलक प्रमाणात असल्याने केसापूर मधील सर्वात जास्त घरे ही लाकडाची होती.

संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानापासून ते स्वच्छ भारत अभियान पर्यंत भारत देश स्वच्छ करण्यासाठी शासन विविध प्रकाचे उपक्रम राबवीत आहे. त्या अनुषंगाने केसापूर गावातील प्रकल्पग्रस्तांना प्रकल्पापूर्वी व प्रकल्पानंतर आपल्या कडे स्वच्छालयाची व्यवस्था आहे का ? असा प्रश्न केला असता पुढील माहिती मिळाली.

**प्रकल्पापूर्वी स्वच्छालयाची व्यवस्था प्रकल्पा नंतर स्वच्छालयाची व्यवस्था**

| अ. क्र. | स्वच्छालयाची व्यवस्था | वारं वारीता | शेकडा प्रमाण | वारं वारीता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | होय | ० | ० | ३१ | ६२% |
| २ | नाही | ५० | १००% | १९ | ३८% |
| | एकूण | ५० | १००% | ५० | १००% |

वरील तक्त्यावरून असे स्पष्ट होते की, प्रकल्पापूर्वी एकाही उत्तरदात्याकडे स्वच्छालयाची व्यवस्था नव्हती शासनाने राबविलेल्या उपक्रमातून प्रेरणा घेऊन प्रकल्पानंतर ६२% उत्तरदात्याकडे स्वच्छालयाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. तर अजून ही ३८% उत्तरदात्याकडे स्वच्छालयाची व्यवस्था नाही.

कोणताही विकास प्रकल्प हा समाजाच्या प्रगतीसाठी बांधला जातो. शिवना टाकळी प्रकल्पामुळे केसापूर गावातील प्रकल्पग्रस्तांच्या आर्थिक स्थितीत काही स्थित्यंतर घडून आले का नाही हे अभ्यासतांना पुढील प्रमाणे स्थित्यंतर झाल्याचे दिसते.

**प्रकल्पामुळे आर्थिक स्थित्यंतर दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | आर्थिक स्थिती | वारंवारीता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | आर्थिक प्रगती | १० | २०% |
| २ | आर्थिक अधोगती | २८ | ५६% |
| ३ | आर्थिक स्थिती स्थिर | १२ | २४% |
| | एकूण | ५० | १००% |

वरील तक्त्यावरून असे स्पष्ट होते की, प्रकल्प झाल्यानंतर २०% उत्तरदात्याच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होऊन त्याची प्रगती केलेली आहे. तर ५६% उत्तरदात्यांची पूर्वीपेक्षा आर्थिक अधोगती झालेली आहे. आणि २४% उत्तरदात्यांच्या प्रकल्पापूर्वीच्या व प्रकल्पानंतरच्या आर्थिक स्थितीत कोणत्याही प्रकारचा बदल झालेला नाही. या प्रकल्पाचा भविष्यात कुणालाही फायदा होईल किंवा

नाही मात्र केसापुरच्या ५६% प्रकल्पग्रस्तांची आर्थिक अधोगती झालेली आहे.

**निष्कर्ष :-**

स्वातंत्र्यानंतर तर जन कल्याण व आर्थिक विकासास गती देण्याची जबाबदारी वाढल्यामुळे सार्वजनिक योजनासाठी औद्योगिक प्रकल्पासाठी तसेच सिंचन प्रकल्पासाठी जमीन संपादन करण्याच्या कामामध्ये दिवसेंदिवस वाढ झालेली आहे. सार्वजनिक योजनाच्या वाढीबरोबरच ज्यांच्या जमिनीचे संपादन करण्यात येते. अशा व्यक्तींच्या हिताची जपणूक करणे. या दोन्ही बाबी मध्ये समतोल साधने आवश्यक आहे कारण घर/जमीन संपादनामुळे अशा व्यक्तीचे निर्वाहाचे साधनच नष्ट होते. त्याचप्रमाणे ज्या व्यक्तींना अशा संपादनामुळे त्यांच्या जमिनीपासून वंचित व्हावे लागले अशा व्यक्तींनी समाजाचे हित डोळ्यापुढे ठेऊन केलेल्या त्यागाचा त्यांना नुकसान भरपाई देतांना विसर पडू नये. विस्थापित झालेल्या लोकांना अनेक हाल अपेष्टांना सामोरे जावे लागते.

केसापूर प्रकल्पग्रस्तांच्या जीवनातही अशाच हाल अपेष्टा आलेल्या आहेत. अनेक पिढ्या पासून कुटुंबाचे उपजीविकेचे साधन असणारी जमीन आणि घर प्रकल्पात गेल्याने बहुतांशी प्रकल्पग्रस्तांना दुःख झाले आहे. नव्या पुनर्वसीत गावात प्रकल्पग्रस्तांना लहान जागा देण्यात आलेली असून तेथे काहींनी आपल्या आर्थिक स्थितीनुसार घर बांधलेले आहे.

सर्वच प्रकल्पग्रस्तांच्या स्थावर मालमत्तेच्या योग्य व चालू बाजार भावा प्रमाणे आर्थिक मोबदला मिळालेला नाही. त्यामुळे % प्रकल्पग्रस्तांना संपादित मालमत्तेचा योग्य मोबदला मिळालेला नाही असे वाटते. योग्य मोबदला मिळाला नसल्याने काही प्रकल्पग्रस्तांनी न्यायालयात दाद मागितली परंतू अद्याप पर्यंत त्यांना न्याय मिळालेला नाही.

योग्य मोबदला न मिळाल्याने कमी जमीन असण्याऱ्या प्रकल्पग्रस्तांना नवीन जमीन खरेदी करता आली नाही. ज्यांची जास्त जमीन होती अशांनी थोडीफार जमीन खरेदी करता आली. बहुतांशी प्रकल्पग्रस्तांचा पैसा नवीन घर बांधण्यातच खर्च झाला तर काहींचा जुने कर्ज, लग्न समारंभ, मौजमजा इत्यादीवर खर्च झाला. त्यामुळे प्रकल्पापुर्वी जमीनदार असलेले लोक प्रकल्पानंतर भूमिहीन झालेले आहेत व त्यांच्यासमोर नवीन व्यवसायाचे आणि नवीन परिस्थितीला सामोरे जाण्याचे आव्हान उभे राहिले आहे. प्रकल्पग्रस्तांची मानसिक अवस्था अस्थिर झालेली असून नव्या जागेत अनुकूलन साधने अवघड जात आहे. दिवसेंदिवस प्रकल्पग्रस्तांच्या समस्या गंभीर बनत असून, त्यामुळे सामाजिक रोष निर्माण होत आहे. संपादित मालमत्तेचा योग्य मोबदला देऊन पुनर्वसनाशी सर्व समस्या सोडविणे हा या वरचा उपाय आहे.

**संदर्भग्रंथ :-**


१. अभ्यंकर जगदीश (२००२) - धरणग्रस्त, रजत प्रकाशन, औरंगाबाद.
२. डॉ.आगलावे प्रदीप (२०००) - संशोधन पद्धतीशास्त्र आणि तंत्र, विद्या प्रकाशन, नागपूर.
३. डॉ.खैरनार दिलीप (२००९) - प्रगत सामाजिक संशोधन पद्धती व सांख्यिकी, डायमंड प्रकाशन, पुणे.
४. डॉ.ढमढेरे एस.सी. (२००९) - महाराष्ट्रातील जलसंपदा, डायमंड प्रकाशन, पुणे.
५. दामले अशा (२००४) - पुनर्वसनाचे प्रश्न, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई.
६. दुबे श्यामचरण (२००४) - एक भारतीय ग्राम, नॅशनल पब्लिसिंग हाउस, दिल्ली.
७. कुलकर्णी (२००२) - जलआशय, ओम पब्लिकेशन, ठाणे.
८. सिंचन विकास (२०११) - पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय, पुणे

# आदिवासींचे मानवी हक्क आणि वास्तवता

डॉ. जयश्री महाजन
समाजशास्त्र विभागप्रमुख,
मूळजी जेठा महाविद्यालय, जळगाव

**प्रस्तावना :**

मानवाला व्यक्तिमत्त्व विकास साधण्यासाठी हक्कांची आवश्यकता असते. त्यामुळेच लोकशाही समाजव्यवस्थेत हक्कांना महत्त्वाचे स्थान देण्यात आले आहे. आधुनिक काळात जगातील अनेक देशाच्या राज्यघटनेत मुलभूत हक्कांचा समावेश करण्यात आला असल्याचे पहावयास मिळते. आपल्या घटनाकारांनी मुलभूत हक्कांना घटनेत स्थान दिले आहे त्यामुळेच मुलभूत हक्कांना घटनात्मक संरक्षण मिळाले आहे.[१] भारतीय राज्यघटनेतील तिसऱ्या भागात कलम १२ ते ३५ मध्ये मुलभूत हक्कांची चर्चा करण्यात आली आहे. यामध्ये समतेचा हक्क, पिळवणुकीविरूध्दचा हक्क व घटनात्मक उपाययोजनाचा हक्क यांना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे.[२]

लोकशाही शासनव्यवस्थेत काही राज्यकर्ते आपल्या व्यक्तिगत स्वार्थासाठी नागरिकांच्या मुलभूत हक्कांची पायमल्ली करतात. त्यामुळे त्याच्या हक्कांना संरक्षण देण्याची व्यवस्था करणे आवश्यक ठरते. आदिवासी समाज हा भारतीय समाजव्यवस्थेतील उपेक्षीत घटक आहे. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात आदिवासी समाज अप्रगत दिसून येतो. स्वातंत्र्योत्तर काळात आदिवासींना मुलभूत हक्क देऊन राष्ट्रीय प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला जातो. परंतु अनेक कारणामुळे त्याच्या मुलभूत हक्काची पायमल्ली होते. गरिबी, निरक्षरता, भ्रष्टाचार, हिंसाचार, दहशतवाद व विस्थापित होण्याचा प्रश्न यासारख्या कारणामुळे आदिवासी समाज मुलभूत हक्कांपासून वंचित राहतो व राष्ट्रविकासात अडथळा निर्माण होते.[३]

**संशोधनाचा उद्देश :**

१. आदिवासीच्या मुलभूत हक्काच्या अडथळ्यावर प्रकाश टाकणे.
२. आदिवासीच्या स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर परिस्थितीवर भाष्य करणे.
३. आदिवासीच्या घटनात्मक हक्कावर प्रकाश टाकणे.

**संशोधनाचे महत्त्व :**

१. आदिवासीचे मुलभूत हक्क व त्याचे सामाजिक वास्तव जाणणे.
२. आदिवासीच्या मुलभूत हक्कांच्या पायमल्लीवर प्रकाश टाकणे.
३. आदिवासीचे मागासलेपणा व राष्ट्रविकासातील बाधा याची नोंद घेणे.
४. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील आदिवासींच्या समस्येवर चर्चा करणे व समस्या जाणून घेणे.

**आदिवासीची स्थिती व स्वातंत्र्यपूर्व काळ :**

भारतीय लोकसंख्येमध्ये आदिवासीचे प्रमाण ८% आहे. ग्रामीण व शहरी समाजापेक्षा अगदी वेगळे जीवन जगणाऱ्या आदिवासीची वस्ती भारतभर आढळते. प्रगत समाजापासून दूर डोंगराळ, दऱ्याखोऱ्यातून राहतात म्हणूनच त्यांना वनवासी, गिरीजन म्हटले जाते. डॉ.घुर्ये यांनी आदिवासींना मुळचे रहिवासी आणि मागासलेले हिंदू म्हटले आहे. तर भारतीय राज्यघटनेने त्याना अनुसूचित जमाती म्हटले आहे. आदिवासी आपल्या प्राथमिक गरजा

भागविण्यासाठी शिकार, मासेमारी, शेती, पशुपालन व हस्तव्यवसाय सारखे लहान-मोठे व्यवसाय करून आपला अर्थाजन चालवितो.[४] इंग्रजांची राजवट भारतामध्ये स्थिरावल्यानंतर इंग्रज राज्यकर्त्यांनी जंगलाचे आरक्षण धोरण जाहीर केले. त्यामुळे अनेक शतके जंगलावर अवलंबून राहणाऱ्या आदिवासीसमोर मोठे संकट उभे राहिले. इंग्रजांच्या अन्यायी धोरणाविरूध्द आदिवासींनी बंडाचे निशान उभे केले. कोल, नागा, मुंडा, संथाळ, मिझो, लुशाई व महाराष्ट्रातील वारली व भिल्ल या आदिवासींनी केलेली बंडे आपली अस्मिता राखण्यासाठी प्रसिध्द ठरली आहेत. महाराष्ट्रातील वारली आदिवासींचा उठाव अनेक अर्थाने महत्त्वपूर्ण आहे. आत्यंतिक दारिद्रय, जुलूमी जमीनदारी, जंगल कंत्राटदारांचे अत्याचार यामुळे उठाव घडून आला. वेठबिगारी, लग्नगडी प्रथा, गुलामगिरी, अमानुष शोषण याविरूध्द लढा दिला. आपला मुलभूत हक्क, अधिकर मिळविण्याच्या लढयामध्ये त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे.[५]

जमीनदार, सावकार व सरकारकडून मोठा विरोध सहन करून सुध्दा वारली व भिल्ल चळवळीना फार मोठी प्रसिध्दी मिळाली. राजकीय पक्ष व सामाजिक कार्यकर्त्यांचा पाठिंबा मिळाला. बऱ्याच प्रमाणात जमीनदार, सावकार व जंगल कंत्राटदार यांचे आदिवासीवर होणारे अन्याय-अत्याचार संपविण्यात यश आले. लढयाचा परिणाम म्हणून आदिवासींना त्यांची मुळ जमीन परत मिळाली. जंगल-जमिनीविषयक कायदे, गवतकापणी व वृक्षतोड याला योग्य मजुरी, शोषण व वेठबिगारापासून मुक्ती मिळाली व मुलभूत हक्क मिळविण्यात ते यशस्वी झाले. आपल्या मुलभूत हक्कासाठी त्यांनी लढा दिला. शोषणाविरूध्द लढा देऊन निर्भय जगण्याचा हक्क मिळविला परंतु आदिवासीच्या परिस्थितीमध्ये पूर्णतः बदल घडून आला नाही.[६]

**आदिवासीची स्थिती व स्वातंत्र्योत्तर काळ :**

स्वातंत्र्योत्तर काळात आधुनिक समाजाच्या संपर्काने आदिवासी समाज ढवळून निघाला. औद्योगिकीकरण, दळणवळण साधनांची उपलब्धता व विविध प्रकल्पाचा विकास योजनामुळे आदिवासी समाज प्रगत समाजाशी संपर्क टाळू शकला नाही. भारतीय राज्यघटनेतही आदिवासी समाजाच्या कल्याणासाठी काही खास उपाययोजना करण्यात आल्या आहेत. घटनाकारांनी सर्व भारतीय नागरिकांना सामाजिक, आर्थिक व राजकीय न्यायाची हमी दिली आहे. भारतीय राज्यघटनेत आदिवासींना 'अनुसूचित जमाती' असे संबोधण्यात आले आहे.[७]

**आदिवासीच्यासाठी घटनात्मक तरतुदी :**

भारतीय समाजातील दुर्बल व मागासलेल्या घटकांच्या कल्याणासाठी काही खास तरतुदी करून ठेवल्या आहेत. समतेचा हक्क, स्वातंत्र्याचा हक्क, शोषणाविरूध्दचा हक्क दिला आहेच पण त्याचबरोबर राज्यघटनेतील २४४ व्या कलमात आदिवासीच्या प्रशासनासंबंधी तरतुदी करण्यात आल्या आहेत. त्यानुसार आदिवासी जमातीचे वास्तव्य असलेल्या प्रदेशांना राष्ट्रपती अनुसूचित प्रदेश म्हणून घोषित करू शकतो. त्यानुसार जमीन हस्तांतर प्रतिबंध, सावकारी नियंत्रण व आदिवासी सल्लागार मंडळ स्थापन करून आदिवासीच्या विकास प्रश्नावर लक्ष केंद्रीत केले जाते. राज्यघटनेतील कलम २७५(१) प्रमाणे आदिवासी कार्य मंत्रालयांतर्गत अर्थसहाय्य पुरविले जाते. राखीव जागा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. अशा प्रकारे आदिवासींचे मुलभूत हक्काचे संरक्षण व्हावे, त्याचा विकास व्हावा यासाठी शासनाने वेळोवेळी कल्याणकारी योजना त्याच्यासाठी राबविल्या आहेत. तरीसुध्दा आदिवासींना मुलभूत हक्क मिळण्यासाठी अनेक अडचणींना सामोरे जावे लागते.[८]

**आदिवासींच्या मुलभूत हक्कातील अडसर :**

मानवी हक्काचे महत्त्व व आवश्यकता याची जाणीव समाजातील सर्व घटकांना झाली असली तरी जगाच्या विविध भागातील बऱ्याच व्यक्तींना मानवी हक्कापासून वंचित रहावे लागते ही वस्तुस्थिती आहे. देशातील राज्यकर्ते मानवी हक्क पायदळी तुडविण्यात धन्यता मानतात. तसेच लोकशाही स्विकारलेल्या सर्वच राष्ट्रातील मानवी हक्कांसंदर्भात परिस्थिती समाधानकारक आहे असे म्हणता येणार नाही. भारतही त्याला अपवाद नाही. राष्ट्रातील नागरिक मानवी हक्कांपासून वंचित राहिल्यामुळे राष्ट्रविकासात अडसर निर्माण होते. तसेच व्यक्तिमत्त्व व समाज विकासासाठी अडसर निर्माण होते. त्यामुळे त्याची दखल घेणे आवश्यक आहे.[९]

आदिवासी हे आजही मुख्य प्रवाहापासून दूर आहेत. आदिवासी गरीब असल्यामुळे जीवनावश्यक नैसर्गिक साधनावर सरकारी वा अन्य ठेकेदारांनी ताबा मिळविला आहे. जगण्याचे मुलभूत हक्क पायदळी तुडविले आहेत. सरकारने विकासाच्या नावाखाली त्याच्या जमिनी जबरदस्तीने ताब्यात घेतल्या आणि मोठी धरणे बांधण्यात आली. उदा: नर्मदा धरण प्रकल्पामुळे नर्मदा खोऱ्यातील सुमारे १० लाख आदिवासींना त्यांच्या गावातून विस्थापित व्हावे लागले. झारखंड प्रांतात देखील आदिवासी त्याच्या स्वायत्तेसाठी संघर्ष करीत आहेत. प्रादेशिक एकात्मता व स्वायत्तता हे आदिवासीचे हक्क असूनही ते त्यांना नाकारले जात आहेत. आदिवासी ज्या प्रदेशात राहतात तेथून त्यांना विस्थापित करणे हे आदिवासींच्या मुलभूत हक्काचे उल्लंघन होय. सन १९५१ ते १९९० पर्यंत २१३ लाख आदिवासी विस्थापित झाले आहेत. आदिवासांना त्याच्या कामाचे किमान वेतन मिळत नाही, स्त्रियांचे शारीरिक शोषण केले जाते. आज आदिवासींना सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक संकटांना सामना करावा लागत आहे. एकूणच आदिवासीचा इतिहास म्हणजे पूर्ण दमनाचा, शोषणांचा, विस्थापनाचा इतिहास होय. आर.जे.के. कुटूम (R.J.K. Kootoom) म्हणतात की, ''अनेक आदिवासींना जगातून निरोप देण्यात आला. त्याच्या संस्कृतीला चिरडून टाकण्यात आले. उर्वरित आदिवासी जमाती एक तर नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत किंवा त्यांच्यावर गुलामगिरी लादली जात आहे.''

लोकशाही शासन प्रणालीत जरी आदिवासींना जगण्यासाठी मुलभूत हक्क प्रदान केले असले तरी दडपशाहीच्या जोरावर त्यांना नमविले जाते. पाशवी दडपण आणले जाते. हीन वागणूक देऊन त्यांच्यावर अत्याचार केले जातात. गरिबी, दारिद्र्य, बेरोजगारी व हिंसाचार यामुळे नागरिक म्हणून मुलभूत हक्कांचा उपभोग त्यांना घेता येत नाही. त्यामुळे सरकार व स्वयंसेवी संस्थांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे.[१०]

**निष्कर्ष :**

१. आदिवासींना राष्ट्रीय प्रवाहात आणण्यासाठी त्याना खरी स्वायत्तता व समता प्रदान करणे आवश्यक आहे.
२. सामुहिक नेतृत्त्व, निर्णय प्रक्रियेतील मतैक्याचे तत्त्व व स्व-निर्धारणचा हक्क त्याना देणे आवश्यक आहे.
३. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात आदिवासीचे मुलभूत हक्क पायदळी तुडविल्यामुळे त्यांना त्यांच्याच जमिनीवरून विस्थापित करणे थांबविणे व त्यांची गरिबी, निरक्षरता व बेकारी दूर करणे आवश्यक आहे.
४. आदिवासींना राजकीय संरचनेत महत्त्वाचे स्थान मिळणे गरजेचे असून केवळ मतदान-पेढी (Vote-Bank) म्हणून पहाणे योग्य होणार नाही.
५. आदिवासींच्या जमिनी सरकार परवानगीशिवाय बिगर आदिवासींना हस्तांतर होणार नाही अशा स्वरूपाचा कायदा होणे आवश्यक आहे.

६. आदिवासीच्या मुलभूत हक्कांचे उल्लंघन होणे हे नैसर्गिक व सामाजिक न्यायाला धरून नाही तसेच एकविसाव्या शतकातील महासत्ता भारताला भूषावह नाही त्यामुळे आदिवासीना घटनेने दिलेले मुलभूत हक्क मिळणे हा त्यांचा मुलभूत अधिकार आहे.

**संदर्भ ग्रंथः**


१. भोळे भास्कर लक्ष्मण राजकीय सिध्दांत आणि विश्लेषण, पिंपळापूरे बुक डिस्ट्रीब्युटर्स, नागपूर, जाने.२००६ पान नं. १३४-१३५

२. पाटील बी.बी., राजकीय संकल्पना, फडके प्रकाशन, कोल्हापूर, जून २००० पान नं. १११.

३. येच्युरी सिताराम अटलुरी मुरली, द रम्पा ट्रायबल रिव्हॉल्ट १९२२, पिपल्स डायरी ऑफ फ्रिडम स्ट्रगल, पिपल्स, डेमॉक्रिसी पब्लिकेशन्स, नवी दिल्ली २००८ पान नं. ८६-८७

४. कोडेकर ए. वाय., मंगला पाटील आदिवासीचे समाजशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, नोव्हे. २००५ पान नं. १२०-१२१

५. चौधरी प्रकाश, आदिवासींचा उठाव, भारताचा कम्युनिस्ट पक्ष ठाणे जिल्हा कमिटी, ठाणे १९९७ पान नं. ३-४

६. परूळेकर गोदावरी, रिव्हॉल्ट ऑफ वारलीज, ऑल इंडिया किसान सभा पब्लिकेशन, नवी दिल्ली, १९८६ पान नं. १६.

७. वराडकर र. घ., राजकीय सिध्दांताची मुलतत्त्वे, निराली प्रकाशन, पुणे, २००३, पान नं. १६७-१६८

८. पाटील व्ही.बी., मानवी हक्क, के. सागर पब्लिकेशन्स, पुणे, दहावी आवृत्ती २०१४, पान नं. ४६

९. कुलकर्णी पी.के. मानवी हक्क आणि सामाजिक न्याय, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २०१५ पान नं. १०२-१०३

१०. पाटील व्ही.बी. समग्र राज्यशास्त्र के. सागर पब्लिकेशन्स, पुणे, प्रथम आवृत्ती २००६, पान नं. ९९.


❖ ❖ ❖

# महात्मा गांधी तंटामुक्त अभियान बनले लोकचळवळ

**प्रा. राजकुमार भगत,**
समाजशास्त्र विभाग प्रमुख,
राजीव गांधी महाविद्यालय, सडक, अर्जुनी, जि. गोंदिया.

## प्रस्तावना

महाराष्ट्र हे अतिशय पुरोगामी राज्य आहे. त्या पुरोगामीत्वाची मुहूर्तमेढ भक्ती संप्रदायाच्या रूपाने १३ व्या शतकात झाली. यात वारकरी व महानुभाव संप्रदायाचे योगदान महत्वपूर्ण आहे, प्रामुख्याने संत नामदेव, संत ज्ञानदेव, संत तुकाराम, संत गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अशा अनेक संतानी महाराष्ट्रातील जनतेला वैचारिक व मानसिक शिकवन दिली आहे. यातुनच समाजात आपआपसातील सलोखा, प्रेम, बंधुभाव, वाढवा आणि तो सदैव कायम राहावा याकरिता सर्व संतानी छान पेरणी करून ठेवली आहे, यातुनच एक समावेशक व्यापक सांप्रदायिक तंटामुक्तीची चळवळ संपूर्ण महाराष्ट्रातून निर्माण झाली, पूर्वापार चालत असलेली जातीय पंचायतीचे पुढील पाऊल म्हणजे महात्मा गांधी तंटामुक्त गाव समिती होय हीच तंटामुक्त गाव समिती पुढे चालून पाहता पाहता तंटामुक्त अभियान बनले. हे अभियान महाराष्ट्रा पुरतेच राहिले नाही तर युनो पर्यंत मझल मारली आहे.

महाराष्ट्र हे सजग क्रियाशिल व अनेक समाजाभिमुख आद्यप्रवर्तक असे राज्य आहे. महाराष्ट्रात अनेक धर्म, पंथ, जाती उपजाती, वंश, भाषा, संप्रदायाचे लोक राहतात. त्याच बरोबर शहरी, ग्रामीण, आदिवासी, अनुसूचित जाती, भटके व विमुक्त अशा ही संप्रदायाचे लोक राहत असून ते अनेक प्रकारचे व्यवसाय व्यापार व उद्योग करतात. या सर्व लोकांच्या विविध परंपरा, चालीरिती, सण, उत्सव, वेषभूषा आचार व विचार इत्यादीमधून राज्यात एक बहुविध समाज प्रतिबिंबीत होतो. राज्यात भौगोलिक विविधतेबरोबरच सामाजिक सांस्कृतिक विविधता असून, आर्थिक क्षेत्रातही कमी अधिक उत्पन्नाचे सामाजिक घटक आहेत. सामाजिक. आर्थिक मागासलेपणा, निरिक्षरता, अज्ञान, आर्थिक व सामाजिक विषमता बेरोजगारी यामुळे समाजात स्थिर शांती निर्माण होण्यास अडसर येतो त्यातूनच भांडण आणि तंटयाचे प्रमाणही मोठे असल्याचे निदर्शनात येते.

गाव पातळीवर छोटया-छोटया कारणावरून निर्माण होणाऱ्या तंटयाचे पर्यवसन मोठया तंटयात होऊ नये, वादामध्ये मालमत्ता अडकून पडून त्यातून आर्थिक नुकसान होवू नये, कुटूंबाची, समाजाची व गावाची शांतता धोक्यात येवू नये, या दृष्टिने सर्व समावेशक शासन निर्णय निर्गमित करणे आवश्यक होते. ही बाब विचारात घेवून अनुक्रमांक १ ते १७ शासन निर्णय निरस्त करण्यात आले. गावात तंटे निर्माण होणार नाहीत व अस्तित्वात असलेले तंटे लोकसहभागातून सामोपचाराने सोडविण्याची व्यवस्था निर्माण व्हावी याकरिता महाराष्ट्र शासनाने १५ ऑगष्ट २००७ पासुन महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिम सुरू करण्यात आली.

प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे दाखल झालेले तंटे मिटविणे व नव्याने निर्माण होणारे तंटे मिटविणे असे सदर मोहिमेचे तिन भाग आहेत या तिनही भागातील कार्यवाही व तंटे मिटविण्याची

मोहिम ही लोकचळवळ म्हणून राबविली जावी आणि त्या माध्यमातून गावे तंटामुक्त व्हावीत या भुमिकेतून तंटामुक्त होणाऱ्या गावांना समारंभपूर्वक पुरस्काराने सन्मानित करण्याच्या निर्णय शासनाचे घेतला. तंटामुक्त गाव मोहिम सुरू करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. महाराष्ट्रात एकूण ३६ जिल्हे असुन ४३ हजार ७१२ गावे आहेत. या ३६ जिल्हयापैकी ७ जिल्हे तंटामुक्त झाली असुन त्यामध्ये लातूर, अहमदनगर, पुणे ग्रामीण, बुलढाणा, रायगड, भंडारा आणि गोंदिया यांचा समावेश असून इतरही जिल्हे तंटामुक्त जिल्हे म्हणून वाटचाल करीत आहेत.

**तंटामुक्त गाव मोहिम म्हणजे काय :–**

भारतीय न्याय व्यवस्थेवरील खटल्यांचा भार कमी करणे ग्रामीण लोकांना शांतता आणि सुव्यवस्था निर्माण करून देण्यासाठी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देषानुसार सिव्हील प्रोसीजर कोड कलम ८९ मध्ये योग्य तो बदल करून (Alternative Dispuet Resolution (ADR) System) म्हणजे पर्यायी तंटा निवारण पध्दती स्थापन झाली तिचे महाराष्ट्रातील सुधारीत रूप म्हणजे मा. गांधी तंटामुक्त गाव मोहिम होय. गाव पातळीवर लहान लहान कारणांवरून निर्माण होणाऱ्या तंटयाचे पूणर्वसन मोठया तंटयात होवू नये तसेच वादग्रस्त व्यक्तीचे आर्थिक नुकसान होवू नये कुटूंब? समाज व गावाची शांतता धोक्यात येवू नये गावातील तंटे लोक सहभागाने सामंजस्याने नि:पक्ष पातीपणे प्रशानाची मदत घेवून सोडविण्यासाठी व्यवस्था म्हणजे महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिम होय. या मोहिमेत प्रतिबंधात्मक उपाय योजना? दाखल झालेले तंटे मिटविणे व नव्याने निर्माण होणारे तंटे सोडविणे या बाबीचा समावेश केला आहे.

**शांततेकडून समृध्दीकडे :–**

शांततेकडून समृध्दीकडे गावांना नेण्याचा मार्ग तंटामुक्त गाव समिती असून महाराष्ट्र राज्याचे दिवंगत गृहमंत्री आर. आर. पाटील यांनी महात्मा गांधी तंटामुक्त गावाचा यशस्वी वाटचाली संदर्भात महाराष्ट्र राज्याचा लोकराज्य मासिकात स्पष्ट केलेले मनोगत येणे प्रकारे आहे की, ऑगष्ट २००७ पासुन सुरू झालेल्या महात्मा गांधी तंटामुक्त गाव अभियानाला राज्यात उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला आहे या अभियानामुळे न्यायालय आणि पोलीसांवरील कामाचा ताण कमी तर झालाच शिवाय गावातील तंटे गावातच मिटून एकमेकांचे कट्टर विरोधक एकत्रत आलेत. जिल्हयातील गावांनी, पोलीसांनी, प्रशानाने दाखविलेल्या कर्तबगारीचे हे फळ आहे की, मोहिमेच्या पहिल्याच वर्षी राज्यातील २३२८ गावे आणि दुसऱ्या वर्षी २८९० गावे तंटामुक्त झाली आहेत. या गावांना कोटयावधी रूपयांचा बक्षिसांचा वाटप होणार आणि ते ही एका वेळी एवढया मोठया प्रमाणात मिळणे ही माझ्यासाठी अत्यंत आनंदाची गोष्ट आहे. या मोहिमेमध्ये राज्यातली गावे आणि ग्रामस्थांनी घेतलेला सहभाग उत्स्फुर्त आहे. ही मोहिम यशस्वी करण्यासाठी त्यांनी मेहतन घेवून गाव कुसाच देणं फेडलं आहे. असे मी मानतो ग्रामविकास पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचा मंत्री असतांना मी संत गाडगेबाबा स्वच्छता अभियानाची संकल्पना मांडली. पाहता पाहता ही चळवळ आज लोकसहभागाची व्यापक चळचळ झाली असून गावाचा चेहराच या अभियानामुळे बदलुन टाकला आहे. गाव स्वच्छ करण्याबरोबरच लोकांची मनस्वच्छ, निर्मळ करण्याचे काम या अभियानाने केला. स्वच्छतेकडून समृध्दीकडे नेणारे हे अभियान महत्वाचा कार्यक्रम म्हणून नावारूपास आले आहे. या अभियानाचा यशस्वीतेचा आत्मविश्वास घेवूनच तंटामुक्त मोहिमेची आम्ही सुरूवात केली. प्रारंभी मनात थोडी शांतता होती धर्मात आणि पक्षगटात विभागलेली गावे तंटामुक्त मोहिमेत सहभागी होतील की नाही हा प्रश्न होता मात्र गावाचा सहभागा वरून

या प्रश्नाचे उत्तर मिळाले लोकांचे सहभागातुन तंटामुक्त गावाची निर्मिती झाली पाहिजे हा विचार मनात ठेवून महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेची मुहूर्तमेढ रोवली. पुर्वी गावातील पाऱ्यांवर तंटाच्या भांडणांचा निवाळा व्हायचा, दिवस बदलले आधुनिकी करणाने सर्वच क्षेत्रात प्रवेश केला त्यामुळे पाऱ्यावरच्या तंटयाच्या न्याय निवडीची प्रथा संपुष्टात आली, मात्र हा निवाळा आणि त्याचे स्वरूप महत्व लक्षात घेवून पुन्हा मा.गांधी तंटामुक्त अभियानाच्या माध्यमातुन हा निवाळा सुरू केला. आणि आज राज्यात मा.गांधी तंटामुक्त गाव मोहिमेची यशस्वीपणे अंमलबजावणी होत आहे याचा मला मनापासुन आनंद होत आहे.

**महाराष्ट्रातील १७ हजार ७४५ गावे तंटामुक्त**

मागील सहा वर्षात राज्यातील १७ हजार ७४५ गावे तंटामुक्त झाली असुन ४२७ कोटी १९ लाख त्यांना बक्षिस देण्यात आले.

महाराष्ट्रात तंटामुक्त समित्यांची यशस्वी वाटचाल सुरू असून या तंटामुक्त समित्यांनी फौजदारी, दिवाणी, महसुली, तसेच सहकार क्षेत्रातील कामगार क्षेत्रातील औद्योगिक क्षेत्रातील आणि इतरही तंटे सोडविण्यात तंटामुक्त समितीला यश आले आहे आणि या तंटामुक्त गावांना मिळालेल्या पुरस्काराचा वापर आपल्या गावाचा ग्रामीण विकास घडवून आणण्यासाठी केला गेला आहे.

**युनोकडून तंटामुक्त मोहिमेची दखल :-**

पुरोगामी विचारांचा वारसा सांगणाऱ्या महाराष्ट्राचे नऊ वर्षापासून तंटामुक्तीची आदर्श लोक चळवळ राबविली ही चळवळ आता अधिक व्यापक करण्यासाठी प्रत्येक गावात तंटामुक्त मोहिम सक्षम करण्यावर भर दिला जाणार आहे. युनोने ही मोहिम आंतरराष्ट्रीय पातळीवर राबविण्यास प्रारंभ केला आहे. तर राज्य शासनाने ही मोहिम अधिक प्रभावशाली करण्यावर विशेष लक्ष दिले आहे. प्रत्येक गावात न्यायव्यवस्था स्थापन करण्याचा विचार शासनाच्या विचाराधिन आहे.

पुणे ग्रामीणचे पोलीस अधिक्षक प्रताप दिगावकर यांना तंटामुक्त मोहिमेची यशस्वी अंमलबजावणी केल्याबद्दल ९,१० व ११ ऑगष्ट २०१० रोजी सादरीकरणासाठी युनोने आमंत्रित केले होते. युनोने तंटामुक्तीची दखल घेणे म्हणजे जगाने दखल घेण्यासारखेच आहे. राष्ट्राराष्ट्रातील तंटे मिटविण्याचे काम युनो करते, अशा जागतीक संघटनेची मोहिमेची दखल घ्यावी व सनमानाने बोलवावे ही अखिल महाराष्ट्रासाठी व राज्य शासनासाठी भुशनावह आहे. १० ऑगष्ट २०१० ला पीस मॅनेजमेन्ट अॅन्ड कॉन सिलेक्ट झोनसाठी काम करणाऱ्या ४० अधिकाऱ्यांसमोर अडिच तास श्री. प्रताप दिगावकरांनी स्लाईड शोच्या माध्यमातून सादरीकरण केले. त्यानंतर एक तास सविस्तर चर्चा केली. याचा परिणाम म्हणजेच महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेची दखल युनोने घेवून आंतरराष्ट्रीय पातळीवर तंटामुक्त अभियान राबविणाचा निर्णय घेतला.

**तंटामुक्त झालेल्या गावाचे यशदा करणार मुल्यांकन :-**

महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेमुळे ग्रामीण भागात अमूलाग्रह परिवर्तन खरेच झाले? याची पाहणी आता शासन करणार आहे. त्यासाठी तंटामुक्त झालेल्या सात जिल्हयातील प्रत्येकी सात गावांचे मुल्यांकन पुण्याच्या 'यशदा' संस्थामार्फत जानेवारीत करण्यात येणार आहे. याकरिता शासनाने राज्यातील ४९ गावांची निवड केली आहे. त्यामुळे ज्या गावांनी तंटामुक्त अभियान आपल्या गावात राबवून आपल्या गावाच्या विकासाला हातभार लावला, परंतु तंटामुक्त गावाचे पुढे काय ? असा अनेक नागरिकांना प्रश्न पडला होता. त्यामुळे अशा

गावांची यशदा दखल घेत असेल तर आणि तंटामुक्त गावे चांगल्या विकासाच्या प्रवाहात आल्याशिवाय राहणार नाही.

महात्मा गांधी तंटामुक्त गाव अभियानामुळे महाराष्ट्राला एक वेगळी ओळख मिळाली असुन आजपर्यंत महाराष्ट्रात अनेक अभियान राबविण्यात आले. त्यापैकी तंटामुक्त गाव अभियान हे सर्वात यशस्वी ठरले असून या अभियानात नक्षलवादी गावे सुद्धा समाविष्ट झालीत. लोकांनी या अभियानाला डोक्यावर उचलून घेतले त्यामुळे गावातील जुणे तंटे तर मिटलेच परंतु नविन तंटे निर्माण होवू नये म्हणून गावातील तंटामुक्त समिती पुरूष, स्त्रिया, वृद्ध मंडळी, विद्यार्थी आणि अधिकारी हे अभियान राबवित आहेत. त्यामुळे या अभियानाला लोकचळवळीचे स्वरूप प्राप्त झाले आहे.

**संदर्भ ग्रंथ**


१) शासन परिपत्रक म. गांधी तंटामुक्त गाव मोहिम मंत्रालय मुंबई - २००८

२) दैनिक लोकमत : आवृत्ती नागपूर - २०१४

३) लोकराज्य मासिक : ऑक्टोंबर - २०१०

४) तरूण भारत : वृत्तपत्र गोंदिया - २०१६

५) देशोन्नती : वृत्तपत्र नागपूर - २०१६

६) www.tantamuktigaoabhiyan.com


❖ ❖ ❖

# जागतिकीकरणाचे परिणाम- एक समाजशास्त्रीय अभ्यास

**प्रा.प्रकाश कांबळे**
समाजशास्त्र विभाग प्रमुख,
भोगावती महाविद्यालय,कुरूकली, जि. कोल्हापूर.

**प्रस्तावना :**

जागतिकीकरण नवीन आर्थिक धोरणाचा एक मूलभूत पैलू आहे. या नवीन आर्थिक धोरणामध्ये उदारीकरण, खाजगीकरण या क्षेत्रांचा विस्तार करून सरकारचा आर्थिक क्षेत्रातील सहभाग कमी करण्याचा मुख्य हेतू दिसून येतो. जागतिकीकरणाच्या या प्रक्रियेतून सर्व राष्ट्रांचा सर्वांगिण विकास करण्यावर भर देण्यात आला आहे. म्हणूनच जगातील विकसित आणि अविकसित अशा सर्वच राष्ट्रांनी जागतिकीकरणाच्या या प्रक्रियेमध्ये सहभागी होऊन आपला विकास साधण्याचा प्रयत्न केला आहे. जगव्याप्त अशा या नव्या जागतिक धोरणाचे समाजावर नेमके कोणते परिणाम झाले आहेत, याचा शोध घेण्याच्या दृष्टीकोनातून 'जागतिकीकरणाचे परिणाम एक समाजशास्त्रीय अभ्यास ' हा शोध निबंधाचा विषय निश्चित करण्यात आला आहे.

**संकल्पना :**

१९८० नंतर इंग्लंड, फ्रान्स, रशिया, ऑस्ट्रेलिया इत्यादी राष्ट्रांमध्ये आर्थिक पुर्नरचनेची प्रक्रिया सुरू झाली. यातूनच जागतिकीकरणाची संकल्पना उदयाला आली. संपूर्ण जगाची एक बाजारपेठ निर्माण करणारी जागतिक अर्थव्यवस्थेची ही एक व्यापक प्रक्रिया आहे. या प्रक्रियेमध्ये उदारीकरण, खाजगीकरण या धोरणांचा अंगीकार करण्यात आला आहे. आर्थिक घटकांबरोबरच राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि पर्यावरणात्मक क्षेत्रांना व्यापणारी अशी ही प्रक्रिया आहे. जागतिकीकरणाची संकल्पना आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील व्यापार, भांडवल व तंत्रज्ञान यांच्यातील बंधने दूर करून मुक्त अभिसरण स्पष्ट करते. **बायलिस व स्मिथ** यांच्या मते, ''जगातील वेगवेगळ्या प्रदेशातील लोकांमध्ये वाढत जाणारे आर्थिक, सामाजिक, औद्योगिक, व्यापारी व सांस्कृतिक संबंध दाखविणारी व्यापक प्रक्रिया म्हणजे जागतिकीकरण होय.''

**अभ्यासाची उद्दिष्ट्ये :**

सदर शोध निबंधाच्या अभ्यासाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत –

१. जागतिकीकरणाच्या आर्थिक परिणामाचा अभ्यास करणे.
२. जागतिकीकरणाच्या सामाजिक परिणामाचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत शोध निबंधाच्या उद्दिष्टांनुसार दुय्यम स्त्रोतांद्वारे संकलित तथ्यांचे स्पष्टीकरणात्मक व तुलनात्मक पध्दतीने तार्किक मांडणी करून जागतिकीकरणाच्या परिणामांचा शोध घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. दुय्यम स्त्रोतांमध्ये संदर्भ पुस्तके, मासिके यांचा आधार घेण्यात आला आहे. मुख्यत: १९९१ च्या नवीन जागतिक आर्थिक धोरणांतर्गत जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरण या प्रकियांचा समाज जीवनावर कोणते

परिणाम झाले आहेत याचा शोध घेण्याचा मुख्यत: प्रयत्न करण्यात आला आहे.

**माहितीचे विश्लेषण :**

शोध निबंधाच्या उद्दिष्टांनुसार दुय्यम स्रोतांद्वारे संकलित केलेल्या माहितींचे स्पष्टीकरणात्मक पद्धतीने खालीलप्रमाणे विश्लेषण करण्यात आले आहे.

**जागतिकीकरणाचे आर्थिक परिणाम :**

जागतिकीकरणाचे आर्थिक परिणाम यामध्ये आर्थिक विषमता, बेकारी, कल्याणकारी धोरणांचा त्याग आणि सामाजिक मूल्यांचा ऱ्हास या घटकांचे विश्लेषण केले आहे.

जागतिकीकरणाच्या नवीन आर्थिक धोरणामुळे उद्योग, व्यापार, दळणवळण, माहिती-तंत्रज्ञान ही उत्पादनाची क्षेत्रे भांडवलदाराच्या अधिपत्याखाली आलेली आहेत. त्यातून त्यांनी वस्तूंचे प्रचंड उत्पादन करून नफा मिळवलेला आहे. जागतिकी- करणाची प्रक्रिया भांडवलशाहीच्या विकासाला अधिक पोषक ठरली आहे. या प्रक्रियेतून भांडवलावर मालकी असणारा भांडवलदार आणि भांडवलावर मालकी नसलेला श्रमिक असे दोन वर्ग अधिकच बळकट होत गेले आहेत. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत उद्योगधंद्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढविण्यात आली आहे. त्यामध्ये काम करण्यासाठी कुशल कामगार वर्गाचा आवश्यकता आहे. त्याप्रमाणे श्रीमंतांच्या मुलांनी महागडे उच्च व्यावसायिक शिक्षण घेऊन वेगवेगळ्या उद्योगधंद्यामध्ये नोकरी पटकावली आहे. तथापि, शिक्षण संस्थांची फी आणि देणग्या न देऊ शकलेल्या गरीब मुलांना व्यावसायिक शिक्षण घेता न आल्यामुळे त्यांना उद्योगधंद्यामध्ये नोकरी मिळणे कठीण झाले आहे. त्यामुळे त्यांना गरीबीच्या परिस्थितीला सामोरे जावे लागत आहे. अशा या परिस्थितीतून श्रीमंत अधिक श्रीमंत तर गरीब अधिक गरीब बनत चालले आहेत. ही आर्थिक विषमतेची परिस्थिती देशाची अर्थव्यवस्था अस्थिर करणारी आणि गरीब-श्रीमंत यांच्यातील सामाजिक अंतर वाढविणारी आहे.

बहुराष्ट्रीय कंपन्यांनी वेगवेगळ्या उद्योगधंद्यांमधून आधुनिक तंत्रज्ञानाचा आणि यंत्रांचा मोठ्या प्रमाणावर वापर करून मर्यादित श्रमिकांच्या आधारे अधिक उत्पादन घेण्यावर भर दिला आहे. त्याचा परिणाम म्हणून छोटे उद्योग बंद पडून त्यातील कामगारांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळली आहे. मोठ्या कंपन्यांनी जाहिरातीच्या माध्यमांतून आपल्या उत्पादीत वस्तूंना जागतिक बाजारपेठ मिळवून दिली आहे. याउलट छोट्या उद्योगधंद्यातून उत्पादीत होणाऱ्या वस्तूंना योग्य बाजारपेठ न मिळाल्यामुळे असे छोटे उद्योग बंद पडून त्यातील कामगारांवर बेकारीची वेळ आली आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत उत्पादन खर्च कमी करून अधिक नफा मिळविणे हे कारखानदारांचे लक्ष्य असल्यामुळे त्यांनी मोठ्या प्रमाणात श्रमिकांची कपात करून यंत्राद्वारे वस्तूंचे प्रचंड उत्पादन घेण्यावर भर दिला आहे. त्यामुळे बेकारीचे प्रमाण वाढतच आहे.

दुसरी महत्त्वाची बाब अशी भरमसाठ लोकसंख्या वाढल्यामुळे पोट भरण्यासाठी रोजगाराच्या दृष्टिने विविध प्रकारचे कौशल्यपूर्ण शिक्षण घेतलेला मोठा कारागीर वर्ग निर्माण झाला आहे. कारखानदारांच्या मागणीपेक्षा अधिक कुशल श्रमिक वर्ग आणि भरमसाठ लोकसंख्या ही भांडवली विकासाची मुख्य कारणे होत. याचे कारण असे आहे की, भांडवलदारांची स्वस्त कौशल्यपूर्ण मर्यादित श्रमिकांची गरज पूर्ण होते. आणि त्या श्रमिकांद्वारे भरमसाठ लोकसंख्येच्या मागणीप्रमाणे वस्तूंचे प्रचंड उत्पादन घेता येते. कार्ल मार्क्स म्हणतात त्याप्रमाणे भांडवलदारांच्या मागणीपेक्षा कामगारांचा पुरवठा अधिक असेल तर अशी परिस्थिती कामगारांच्या

शोषणाला पोषक ठरते. भांडवलदार अशा कामगारांकडून कमी मोबदल्यात अधिक श्रम करून घेतात आणि अधिक नफा मिळवतात. त्यामुळे श्रमिकांच्या शोषणातून भांडवलशाही अधिक बळकट होत गेली आहे.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पंडित जवाहरलाल नेहरू यांनी मानवतावादी दृष्टिकोनातून समाजवादी व मिश्र अर्थव्यवस्थेच्या धोरणाचा स्वीकार केला. त्यातून बहुसंख्य बहुजन समाजाचा सर्वांगिण विकास साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यातून भारताचा आर्थिक आणि भांडवली विकास फारशा प्रमाणात झाला नसला तरी दुर्बलांना सबल बनविण्याचे उदात्त कार्य पूर्ण होऊ शकले आहे. १९९१ च्या जागतिक आर्थिक धोरणामध्ये दुर्बलांचा विकास साधणाऱ्या समाजवादी धोरणांचा त्याग करण्यात आला आहे. याउलट पैसा व भांडवल असलेल्या कारखानदार लोकांना उदारीकरण, खाजगीकरणातून अधिक सेवासंधी देवून त्यांचाच विकास करण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यामुळे 'कल्याण' या उदात मूल्याचे अवमूल्यन होऊन प्रचंड भांडवल असलेल्या भांडवलदारांचे कल्याण साधणाऱ्या या नव्या आर्थिक धोरणाचा स्वीकार करण्यात आला आहे. ते तारक की मारक याकडे उघड्या डोळ्यांनी पाहणे आवश्यक आहे. जागतिकीकरणातून रोजगाराच्या संधींची प्रचंड उपलब्धता करून दारिद्रय हटवण्याचा केवळ उदघोष फोल ठरत चालला आहे. याचे मुख्य कारण असे की, संपूर्ण जगाला आणि भारताला भेडसावणारा व विचार करायला लावणारा बेकारीचा प्रश्न हा होय. कोणत्याही देशाची आणि जगाची अर्थव्यवस्था लोकांना जगण्याचे अधिकार आणि हक्क प्राप्त करून देत नसेल तर त्या देशामध्ये आणि जगामध्ये आराजकता अटळ आहे हे नाकारता येणार नाही.

जागतिकीकरणाच्या धोरणामुळे सार्वजनिक उद्योगधंद्याचे खाजगीकरण केले जात आहे. कंत्राटी पध्दतीने कर्मचाऱ्यांची नेमणूक, कामगार कपात, पेन्शन, विमा इत्यादी सुविधांवरील बंदी, लोकांना कमी किंमतीमध्ये वस्तू आणि सेवा पुरवणाऱ्या उद्योगांच्या अनुदानातील कपात, सरकारी स्वस्त धान्य दुकान, स्वयंपाक गॅस, डिझेल, पेट्रोल, खते, बी-बियाणे, कृषी, आरोग्य, शिक्षण, पाणीपुरवठा, वीजपुरवठा इत्यादीवरील अनुदानातील कपात यामुळे बहुसंख्य गरीबांच्या विकासाला खीळ बसली आहे. त्याचबरोबर जागतिकीकरणाच्या प्रभावातून सहकार्य, मानवता, सदाचार, सहिष्णुता, त्याग, नैतिकता, चारित्र्य, संयम, दया-क्षमा-शांती इत्यादी उदात्त सामाजिक-सांस्कृतिक मूल्यांचा ऱ्हास होवू लागला आहे. या सर्व मूल्यांवरच भारतीय समाजाची इमारत अभेद, अखंड निरंतरपणे टिकून राहिली होती. प्राचीन काळापासून या मूल्यांचे अनेक संत-महंतांनी संरक्षण व संवर्धन करून समाजाची एकता टिकवून ठेवली पण सद्या जागतिकीकरणातून व्यक्तीमध्ये व्यक्तीवादी, उपयुक्ततावादी, भोगवादी व चंगळवादी वृत्ती वाढत चालली आहे.

**जागतिकीकरणाचे सामाजिक परिणाम :**

जागतिकीकरणाचे सामाजिक परिणाम यामध्ये स्त्रीया, दलित आणि आदिवासी समाज या घटकांचे विश्लेषण केले आहे ते खालीलप्रमाणे आहे.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत सेवा क्षेत्रांचा मोठा विस्तार होऊन त्यामध्ये स्त्रियांना विशेषतः उच्च शिक्षित तरूणींना रोजगाराच्या मोठ्या संधी निर्माण झाल्या आहेत. तथापि, या क्षेत्रात तरूणींचे शोषण केले जात आहे. त्यांना रोजगार देताना ती सुंदर असणे, तीने विशिष्ट प्रकारचा पोषाख परिधान करणे यासाठी सक्ती केली जाते. अनेक ठिकाणी पुरूष अधिकारी व सहकारी कर्मचारी तरूण आणि सुंदर स्त्रियांचा लैंगिक छळ करतात. नोकरी टिकावी

म्हणून अनेक तरूणी हे सर्व अत्याचार निमूटपणे सहन करतात. NCRB या संस्थेच्या अहवालानुसार १९९६ ते २००० या कालावधीत स्त्रियांविरूध्दच्या गुन्ह्यामध्ये २४.२ टक्के एवढी वाढ झाली आहे.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत स्त्रियांचे वस्तूकरण होत चालले आहे. स्त्री देह प्रदर्शनीय मानून त्यांच्या माध्यमातून विविध उत्पादने बाजारपेठेत खपवली जात आहेत. मिस वर्ल्ड, मिस युनिव्हर्स, मिस एशिया, मिस इंडिया अशा सौंदर्य स्पर्धा आयोजित करून त्यातील विजेत्या तरूणीला ब्रँड ॲम्बेसडर म्हणून प्रयोजक कंपन्यांच्या उत्पादनाची जाहिरात करावी लागते. म्हणजेच तरूणींचे सौंदर्य व तारूण्य हे बाजारपेठा काबीज करण्याचे माध्यम बनविले जात आहे. जागतिकीकरणात मनोरंजन, पर्यटन, हॉटेलिंग, मॉडेलिंग, डान्सबार अशा व्यवसायांचा विस्तार होत असून त्यामध्ये विशेषत: सुंदर तरूणींना रोजगार उपलब्ध होत आहे. या व्यवसायात स्त्रियांना बाजारूवृत्तीने आपल्या देहाचे प्रदर्शन करावे लागत आहे. नियतकालिकांचे मुखपृष्ठ, विविध उत्पादनाच्या जाहिराती, चित्रपट, दूरदर्शन मालिका, व्हिडिओ, अल्बम, डान्सबार, डिस्को क्लब इत्यादींद्वारे स्त्रीदेहाचे उत्तान व शृंगारिक स्वरूपात प्रदर्शन केले जात आहे. पैसा व ग्लॅमर यांच्या हव्यासापोटी काही स्त्रीयाही आपल्या देहाचे भडक प्रदर्शन करून उच्च प्रतिचा सन्मान मिळाल्याचा मानसिक आनंद मिळवत आहेत. त्यातून स्त्रीही एक भोगवस्तू आहे किंवा कामूकतेचे प्रतिक आहे, असा हीन दृष्टिकोन बळावत चालला आहे. याचाच परिणाम म्हणून स्त्रियांवर लैंगिक अत्याचाराच्या प्रमाणात वाढ झाली आहे. म्हणून जागतिकीकरण ही स्त्री अत्याचाराची किंवा शोषणाची व्यवस्था म्हणावी काय? असा प्रश्न निर्माण होतो.

राज्य घटनेने दलितांना नोकऱ्यांमध्ये आरक्षण ठेवून त्यांचा विकास करण्यावर भर दिलेला आहे. परंतु, १९९१ च्या जागतिकीकरणाच्या नवीन आर्थिक धोरणाने दलितांचे नोकऱ्यांतील आरक्षण धोक्यात आले आहे. जागतिकीकरणामध्ये खाजगीकरणाचा पुरस्कार केला आहे. त्यामुळे सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगधंद्यांचे व इतर सेवाक्षेत्रांचे हस्तांतरण खाजगी क्षेत्रांकडे होऊ लागले आहे. दलितांसाठीच्या राखीव जागा केवळ सार्वजनिक क्षेत्रातच असाव्यात असे घटनेत कोठेही नमूद केलेले नसतानाही त्या राखीव जागा सार्वजनिक क्षेत्रापुरत्याच मर्यादित ठेवल्या असल्याची संदिग्धता निर्माण केली जात आहे. त्यातच खाजगी उद्योग आणि इतर सेवाक्षेत्रे ही उच्च वर्गातील भांडवलदार लोकांकडेच हस्तांतरीत झाल्यामुळे गरीब दलितांना नोकरीतील सेवासंधी देण्यामध्ये त्यांच्याकडून उदासिनता दाखवली जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रातील उद्योग आणि सेवाक्षेत्रांमध्ये यंत्रांचा मोठ्या प्रमाणात वापर केला जात आहे. त्यामुळे स्वेच्छा सेवानिवृत्ती व कामगार कपातीचे धोरण मोठ्या प्रमाणावर अवलंबिले जात आहे. परिणामी राखीव जागांतर्गत नोकऱ्यांची संख्या कमी होत असून दलित सुशिक्षित बेकारांचे प्रमाण वाढत आहे. मूळातच भूमिहीन, अल्पभूधारक आणि पारंपारिक व्यावसायिकतेचा कोणताही वारसा नसलेल्या दलितांना आरक्षणाच्या संधी मिळाल्या नाहीत, तर त्यांच्या जगण्याचे यक्ष प्रश्न निर्माण होतील.

राज्यघटनेतील आरक्षणाच्या धोरणाची योग्य अंमलबजावणी न करणारी मानसिकता असलेली काही व्यवस्था दलितांचे नोकरीतील त्यांचे आरक्षणाचे हक्क डावलून त्याठिकाणी इतर उच्च वर्गातील व्यक्तींच्या नेमणूका केल्या जात असताततच.

जागतिकीकरण ही पात्रतेप्रमाणे सर्वांना समान प्रमाणात रोजगाराची संधी उपलब्ध करून देणारी प्रक्रिया दलितांच्या निराधाराची व्यवस्था ठरते आहे काय? असा प्रश्न निर्माण झाल्याशिवाय राहात नाही. खाजगी उद्योग व इतर सेवा क्षेत्रातील आरक्षण धोरणाचा संकोच म्हणजे दलितांच्या आर्थिक विकासाला खीळ बसविणे होय. अशा प्रकारे ही प्रक्रिया सुरू राहिली तर दलितांना असहाय्यतेच्या, अगतिकतेच्या विषम पारंपारिक व्यवस्थेच्या खाईत शेकडो वर्षे मागे ढकलण्यासारखे होईल, याची दखल घेण्याची वेळ आली आहे. कारण खाजगी उद्योग आणि बहुराष्ट्रीय कंपन्या दलितांना नोकऱ्या देतीलच याची खात्री देता येत नाही. राखीव जागा भरणे हे कायद्याने बंधनकारक असूनही काही ठिकाणी दलितांना हेतुपुरस्कर डावलेले जात आहे.

भारत स्वतंत्र होवून ६० वर्षांचा प्रदीर्घ कालखंड उलटून गेला तरी आदिवासींचे दारिद्रय, कर्जबाजारीपणा, शोषण, वेठबिगारी, अज्ञान संपलेले नाही. त्यामुळे सरकार, जमीनदार, सावकार, व्यापारी, उद्योगपती त्यांच्या विरोधात आदिवासी विभागात असंतोष खदखदत आहे. या असंतोषाचा फायदा घेवून आदिवासी क्षेत्रात नक्षलवाद्यांनी सशस्त्र संघर्ष सुरू ठेवला आहे. त्यातच जागतिकीकरणाच्या नव्या आर्थिक धोरणामुळे ऐतद्देशीय तसेच बहुराष्ट्रीय कंपन्यांनी आदिवासीं क्षेत्रातील खनिज संपत्तीची अक्षरशः लुट सुरू केली आहे. बिहार, झारखंड, ओरिसा, छत्तीसगड या राज्यातील जंगलमय प्रदेशात खाण उद्योग मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. त्याचा परिणाम म्हणून जंगलातील उत्पादनावर निर्वाह करणाऱ्या आदिवासींचे जीवन उद्ध्वस्त होत आहे. जंगलातील फळे, कंदमुळे, लाख, डिंक, मध, सरपण, गुरांचा चारा, शिकार, पशुपालन, शेती हे त्यांच्या जगण्याचे व अस्तित्वाचे स्त्रोत हिरावून घेतले जात आहेत. त्यामुळे त्यांच्यापुढे जीवन, मरणाचा प्रश्न निर्माण झाला आहे.

खाजगीकरणाच्या धोरणातून आदिवासींच्या क्षेत्रात मोठे उद्योगधंदे उभारले जात आहेत. सावकार व उद्योगपती हे शक्य होईल तेवढ्या प्रमाणात आदिवासींचे शोषण करीत आहेत. ओरिसा राज्यातील कालाहंडी जिल्ह्यातील नियामगिरी परिसराच्या जंगलातील तेंदूची पाने आदिवासी गोळा करतात. बाजारपेठेत या पानांची किंमत प्रतीटन रूपये १६ हजार इतकी आहे. यापैकी रूपये १२ हजार सरकार कर म्हणून घेते व केवळ ४ हजार रूपये आदिवासींच्या पदरात पडतात. सरकारच्या या धोरणामुळे आदिवासींच्या आर्थिक स्थितीत सुधारणा झाली नाही. याउलट नियामगिरी पसिरातील बॉक्साईट खाणीतून हजारो रूपये किंमतीचे बॉक्साईट काढले जाते. यावर सरकार केवळ प्रतिटन रू.३०/- एवढी रॉयल्टी घेते. त्यामुळे खाणमालक प्रचंड फायदा कमवतात. अशाप्रकारे खाजगीकरणाचे धोरण हे उद्योगपतींच्या फायद्याचे तर आदिवासींच्या शोषणाचे कारण ठरत आहे, हे निर्विवाद सत्य आहे.

**निष्कर्ष :**

जागतिकीकरणाचे परिणाम : एक समाजशास्त्रीय अभ्यास या विषयाच्या संदर्भात संकलित माहितीचे स्पष्टीकरणात्मक विश्लेषणानंतर प्राप्त निष्कर्ष खालीलप्रमाणे –

- रोजगाराच्या अपेक्षेने कौशलपूर्ण श्रमिक वर्गात झालेली वाढ आणि लोकसंख्येतील भरमसाठ वाढ, भांडवलशाहीच्या हिताची तर श्रमिकांच्या शोषणाची ठरली आहे.
- नवीन आर्थिक धोरणामध्ये दुर्बल घटकांचे 'कल्याण' या उदात्त मूल्याचे अवमूल्यन होऊन भांडवलदारांचे कल्याण होत आहे.

- पेन्शन व विमा कंपन्यांच्या सेवासंधी मोडित निघाल्यामुळे सेवानिवृत्त वृध्दांच्या जास्त काळ जगण्याच्या आशा मावळल्या आहेत.
- सहकार्य, सहिष्णुता, त्याग, मानवता, नैतिकता व चारित्र्य या पारंपारिक उदात्त सांस्कृतिक मूल्यांचा ऱ्हास होवून सामाजिक विघटनात वाढ झाली आहे.
- वेगवेगळ्या कंपन्यांच्या उत्पादित वस्तूंची जाहिरात तरूण स्त्रियांद्वारे प्रदर्शित केली जात असून, तरूणींचे तारूण्य आणि सौंदर्य हे जागतिक बाजारपेठा काबीज करणारे माध्यम ठरले आहे. त्यामुळे स्त्रियांचे वस्तूकरण होत आहे.
- जागतिकीकरणाच्या या नव्या आर्थिक धोरणात तरूण सुंदर स्त्रियांना रोजगाराच्या संधी मिळत असल्या तरी त्या ठिकाणी त्यांचे लैंगिक शोषण, अत्याचार यात वाढ होवून त्यांच्या सामाजिक दर्जाचे आणि चारित्र्याचे हनन होत आहे.
- विविध उद्योग व इतर सेवा क्षेत्रातील यांत्रिक उत्पादन पध्दतीमुळे करण्यात आलेली कामगार कपात आणि राज्यघटनेतील दलितांच्या आरक्षण धोरणाची अयोग्य अंमलबजावणी यामुळे दलित बेकारांचे प्रमाण वाढून त्यांना दारिद्रयाच्या खाईत लोटले जात आहे.
- जागतिकीकरणाच्या नव्या आर्थिक धोरणामध्ये उद्योगधंद्यासाठी लागणाऱ्या व्यावसायिक शिक्षणाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. असे शिक्षण केवळ उच्च वर्गातील मुले वेगवेगळ्या व्यावसायिक शिक्षण संस्थांना भरमसाठ फी व डोनेशन देवून घेत आहेत. त्यामुळे त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. याउलट गरीब मुलांना असे शिक्षण घेणे परवडत नसल्यामुळे ते बेकार राहिले आहेत. परिणामी श्रीमंत अधिक श्रीमंत तर गरीब अधिक गरीब बनत आहेत.
- जागतिकीकरणाच्या आर्थिक धोरणामध्ये व्यापारी, दलाल, कंत्राटदार हे आदिवासींच्या उत्पादीत वस्तूंना योग्य भाव देत नसल्यामुळे त्यांचे आर्थिक शोषण होत आहे.

संदर्भग्रंथ:

१. डॉ.घाटगे, लालासाहेब नारायणराव,: भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन, डॉ.वावरे, अनिकुमार कृष्णराव जून-२०१०, पृष्ठ १०.१.
२. प्रा.कराडे, जगन (संपादक) : जागतिकीकरण भारतासमोरील आव्हाने, डायमंड पब्लिकेशन, पुणे, जानेवारी-२००८, पृष्ठ ५५.
३. धनागरे, द.ना.: उच्च शिक्षण ध्येयवादाकडून बाजार पेठेकडे, लोक वाडमय गृह, मुंबई, नोव्हेंबर-२०१०, पृष्ठ १६७.
४. स्टडी सर्कल केंद्र : सामान्य अध्ययन, स्टडी सर्कल पब्लिकेशन, मुंबई, नोव्हेंबर-२०१०, पृष्ठ १६७.

❖ ❖ ❖

# रत्नागिरी तालुक्यातील जलयुक्त शिवार अभियान अंमलबजावणीचे अध्ययन

**प्रा. सचिन सनगरे**
समाजशास्त्र विभाग,
गोगटे जोगळेकर महाविद्यालय रत्नागिरी

**प्रस्तावना:**

पाणी टंचाई आणि त्यातून निर्माण होणारे विविध प्रश्न नेहमीच चर्चेचे विषय राहिले आहेत. सरासरी ३००० मिमि पर्जन्यमान असलेल्या या तालुक्यात डिसेंबर नंतर पाण्यासंदर्भात विविध समस्या निर्माण होतात. पिण्याचे पाणी, वापरण्याचे पाणी, शेती आणि उद्योगांसाठी पाणी यासंदर्भात शासन विविध योजना राबवित असते. कोकणात एकूण पर्जन्यमान हे अन्य प्रदेशांपेक्षा भिन्न आहे. पाणी संदर्भात प्रश्न येथे नाही असे अनेकांना वाटते देखिल पण, पाण्याचे नियोजन व व्यवस्थापन, जलसिंचन यात कोकण अजूनही मागे आहे. जलसाक्षरता कोकणात झालेली नाही.

रत्नागिरी सारख्या अतीपर्जन्यमान असलेल्या तालुक्यात सध्या जलयुक्त शिवार योजना राबविण्यात येत आहे. या योजनेच्या अंमलबजावणीचे अध्ययन आम्ही करणार आहोत.

**संशोधन विषयाची उद्दिष्ट्येः**

१. जलयुक्त शिवार योजनेची शासकीय उद्दिष्ट्ये - धोरण यांचा अभ्यास करणे
२. रत्नागिरी तालुक्यात या योजनेचा झालेला लाभ व योजना राबविताना येणाऱ्या समस्यांचे अध्ययन करणे
३. रत्नागिरी तालुक्यात वाढती लोकसंख्या, शेती- फळबागायती, औद्योगिकीकरण यांची पाणी ही भविष्यकालिन गरज पूर्णत्वाला कशी नेता येईल याचे अध्ययन करणे

**संशोधन विषयाची गृहितके :**

१. रत्नागिरी तालुक्यात पावसाचे प्रमाण विपूल आहे मात्र जलसंवर्धनाचे नियोजन नाही.
२. जिल्ह्याची भौगोलिक स्थिती अन्य प्रदेशांपेक्षा वेगळी आहे याचा जलयुक्त शिवार योजना राबविताना विचार झालेला नाही.
३. शासनाच्या जलयुक्त शिवार योजनेचे सामाजिकीकरण होणे आवश्यक आहे.

**संशोधन विषयाची आवश्यकता**

- ❑ सरासरी पर्जन्यमान सर्वाधिक असताना डिसेंबर नंतर भूजलस्तर कमी होतो, नदीची गाळवहन क्षमता अधिक सिमेंट बंधाऱ्यांमुळे गाळ साठून बंधारे निकामी होतात.
- ❑ जलसंवर्धन साधने / तंत्राचा कोकणासाठी वेगळा विचार आवश्यक,
- ❑ कोकणात वाढती निवासी लोकसंख्या त्यामुळे पाण्याची वाढती मागणी त्या प्रमाणात जलसंवर्धनाचे नियोजन नाही
- ❑ वाढते औद्योगिक क्षेत्र भविष्यकाळात जलमागणीत वाढ होणार
- ❑ शेती जलसिंचनाचा अजूनही विचार नाही.
- ❑ अनेक पर्यटन स्थळे समुद्रकिनारी त्यामुळे पर्यटकांसाठी गोड्या पाण्याची मागणी ग्रामीण जलसाठ्यातून पूर्ण केली जाते.
- ❑ खाजगी विहिरींची संख्या अधिक असल्याने जलउपशावरती नियंत्रण नाही, उन्हाळ्यात जलस्तर कमी होतो. खाडीपट्ट्यांवर दुष्परिणाम.

**अध्ययन क्षेत्र**

**रत्नागिरी तालुका एकूण गावे- १९६**

**एकूण ग्रामपंचायती- ९४**

**अध्ययनासाठी नमुना ग्रामपंचायती- ३०**

**अभियान अंतर्गत *योजना प्राप्त ग्रामपंचायती***

| अध्ययनासाठी नमुना ग्रामपंचायती- ३० | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| आडी | आगवे | आंबेशेत | बसणी | भोके | मालगुंड |
| फणसवळे | नाणीज | जयगड | रानपाट | कारवांची वाडी | खंडाळा |
| केळ्ये | धामणसे | गावखडी | चरवेली | म्हामूरवाडी | वरवडे |
| करबुडे | टेंभे | हातखंबा | पावस | निवळी | पिरंदवणे |
| वाफे | मिरजोळे | शिरगांव | उक्षी | खानू | सोमेश्वर |

**संशोधन विषयाची व्याप्ती आणि मर्यादा :**

रत्नागिरी तालुका, जलयुक्त शिवार योजना राबविणाऱ्या ०५ ग्रामपंचायती, जलयुक्त शिवार योजना मंजुर न झालेल्या अन्य २५ ग्रामपंचायती. अध्ययन वर्ष जून २०१५ - डिसेंबर २०१६.

**संशोधन पद्धती :**

प्राथमिक माहिती संकलन पद्धती - अनुसूची, मुलाखत. दुय्यम सामग्री. इंटरनेट

**ऐतिहासिक पार्श्वभूमी**

१९७२ मध्ये महाराष्ट्राला तीव्र दुष्काळाला सामोरे जावे लागले. २०१२ ते २०१६ या कालखंडात मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्राला पाणी टंचाईने ग्रासले. लोकांना गाव सोडून जावे लागले. कॉंग्रेस - राष्ट्रवादी सरकारने शेती व पाणीसाठे वाढविण्यासंदर्भात अनेक योजना आणल्या मात्र प्रशासकीय अडथळे, स्थानिक कंत्राटदार, गैरव्यवहार, नियोजन अभाव यामुळे आघाडी सरकारला दुष्काळावर मात करता आली नाही.

२०१४ साली भाजप - शिवसेना सरकारने दुष्काळी परिस्थितीवर कायम स्वरूपी मात करण्यासाठी ५ डिसेंबर २०१४ मध्ये जलयुक्त शिवार अभियान योजनेची घोषणा केली. २६ जानेवारी २०१५ पासून ही योजना कार्यान्वीत करण्यात आली. शेतीसाठी शाश्वत पाणी व पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यात येईल हे ध्येय्य प्राधान्याने ठेवले. २०१९ सालपर्यंत महाराष्ट्रदुष्काळमुक्त करण्याचा निर्धार करण्यात आला आहे.

प्रत्येक थेंब रोपटे एक हे या योजनेची ब्रीदवाक्य आहे.

**जलयुक्त शिवार अभियान योजनेची उद्दिष्ट्ये**

- पावसाचे पाणी शिवारात अडविणे
- भूगर्भ जल वाढ
- सिंचन क्षेत्र वाढ
- शेतीसाठी संरक्षित पाणी, पाणीवापराची कार्यक्षमता वाढ
- पाणी उपलब्धतेची शाश्वती
- भूजल अधिनियम अंमलबजावणी
- पाणीसाठ्यांचे विकेंद्रीकरण
- जल संवर्धन करणारी कामे हाती घेणे
- जलस्त्रोतांचे संरक्षण, संवर्धन
- जल विषयक - जनजागृती
- पाणी अडवा पाणी जिरवा - जनसहभाग वाढविणे

**महाराष्ट्रातील पर्जन्यमान व जलसिंचन प्रकल्पाचे तुलनात्मक अध्ययन दर्शविणाऱ्या सारणी**

| महाराष्ट्रातील पर्जन्यमान व वार्षिक सरासरी २०१५-१६ | | |
|---|---|---|
| महाराष्ट्रातील प्रादेशिक विभाग | पर्जन्यमान व वार्षिक पर्जन्य/ सरासरी | पावसाचे दिवस |
| कोकण | २७०० | ८४ |
| प. महाराष्ट्र | ७७० | ४० |
| विदर्भ | ९५० | ४५ |
| मराठवाडा | ६५० | ३४ |

| महाराष्ट्रातील जलसिंचन प्रकल्पाचे तुलनात्मक अध्ययन | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| प्रादे. विभाग | मोठे प्रकल्प | मध्यम | लघु | एकूण | उपयुक्त साठा |
| पुणे | २७ | ४३ | ३४१ | ४११ | १०४१५ |
| नशिक | १८ | ३८ | २९४ | ३५० | ४७४२ |
| नागपूर | १६ | ४० | ३१० | ३६६ | ३८१२ |
| मराठवाडा | ११ | ७५ | ७१८ | ८०४ | ७६०१ |
| अमरावती | ०९ | २३ | ३४४ | ३७६ | २९०८ |
| कोकण | ०३ | ०५ | १५० | १५८ | १६४४ |

**महाराष्ट्रात विभागवार जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत झालेल्या कामांचे स्वरूप दर्शविणारी सारणी**

| विभाग | एकूण कामांची संख्या |
|---|---|
| कोकण | ८१५५ |
| पश्चिम महाराष्ट्र | ४१६७८ |
| खान्देश | २६२४३ |
| मराठवाडा | ३४४१८ |
| विदर्भ | ६०३५९ |



# महाराष्ट्रातील रामोशी-बेरड या भटक्या विमुक्त जमातींची सामाजिक चळवळ

**प्रा.सौ.सुषमा जाधव**
समाजशास्त्र विभाग,
देवचंद कॉलेज, अर्जुननगर (निपाणी)

**प्रस्तावना**

रामोशी आणि बेरड या जमातींना विमुक्त जमाती म्हणून महाराष्ट्रात ओळखले जाते. १८७१ च्या गुन्हेगार जमाती कायद्याने या जमातींना गुन्हेगार म्हणून नोंदविले होते. १९१२ च्या वसाहती कायद्याने तीन तारेच्या कंपाऊंडमध्ये डांबून ठेवले होते. हा कायदा १९५२ ला रद्द केला आणि तीन तारेच्या वसाहतीमधून या जमातींची मुक्तता करण्यात आली. ही मुक्तता प्रत्यक्षात ३१ ऑगस्ट १९६० ला करण्यात आली. या जमातींना वसाहतीमध्ये असताना थोड्याफार नागरी सुविधा प्राप्त होत होत्या परंतु या जमातींना वसाहतीमधून मुक्त केल्यानंतर त्यांच्या नविन नागरी समस्या निर्माण झाल्या. यामध्ये उदरनिर्वाह, शिक्षण, आरोग्य निवास इ. समस्या निर्माण झाल्या. रामोशी आणि बेरड समाज या समस्यापासून मुक्तता मिळावी म्हणून आणि आम्हाला भारताचे नागरीक म्हणून घेवून आम्हाला विकासाच्या मुख्य प्रवास समाविष्ट करा म्हणून १९६० नंतर ते चळवळी करत आहेत. १९६० ते आजपर्यंत या जमातींच्या चळवळी सुरू आहेत. संशोधकाने या चळवळींचे मुल्यमापनात्मक विश्लेषण करण्याचा प्रयत्न या प्रस्तुत शोधनिबंधात केला आहे.

**संशोधन पद्धती :**

**अ) संशोधनाची उद्दिष्टे :**

१) रामोशी आणि बेरड जमातींच्या समस्या समजावून घेणे.

२) रामोशी बेरड जमातींच्या महाराष्ट्रातील चळवळींचा आढावा घेणे.

३) रामोशी बेरड जमातींच्या चळवळींचे मुल्यात्मक विश्लेषण करणे.

**ब) अभ्यास पद्धती :**

प्रस्तुत शोधनिबंधाच्या संशोधनासाठी वर्णात्मक संशोधन आराखडा या पद्धतीचा उपयोग केला आहे.

**क) तथ्ये संकलनाचे स्त्रोत :**

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक आणि दुय्यम स्त्रोताचा उपयोग केला आहे.

'नरवीर उमाजी नाईक समाजसुधारक मंडळ, महाराष्ट्र राज्य' या संघटनेचे अध्यक्ष - वसंतराव चव्हाण, राहणार भेंडवडे, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर व 'बेरड समाज' अध्यक्ष डॉ.भिमराव गस्ती यांनी वरील संघटनेच्या माध्यमातून 'रामोशी-बेरड' या भटक्या-विमुक्त जमातींच्या समस्या, प्रश्न यासाठी १९८० पासून सातत्याने प्रयत्नशील आहेत. या संघटनेच्या माध्यमातून रामोशी-बेरड समाजातील प्रश्नासंबंधी पुढील मागण्या असल्याचे आढळून येते. त्यामध्ये-

१. क्रांतीकारी रामोशी (बेरड-बेडर वाल्मीकी तलवार) समाजास अनुसूचित जमातीमध्ये समावेश करावे. (स्वातंत्र्य पूर्वकाळातील जाती-जमाती आयोगाचे सदस्य व्ही.अय्यंगार, पंडीत जवाहर नेहरू, लालनिशान पक्षाचे पुढारी यांनी इंग्रजांनी

गुन्हेगार ठरविलेल्या जातींना जाती-जमातीत समावेश करणेबाबत सूचना)

२. अजूनही रामोशी समाजास गुन्हेगाराच्या नजरेने पाहिले जाते, या बाबी दुरूस्त होण्याबाबत.

३. जगण्याचे साधन नसलेल्या समाजाला सरकारी हक्कातील पडीक जमिनी कसायला व वणीकरणास द्याव्यात.

४. भारतीय सैन्यदलात उमाजी नाईक बटालियन सुरू करावी.

५. आद्य क्रांतीवीर उमाजी नाईक यांचे नांवे आर्थिक विकास महामंडळ सुरू करावे व समाजाचे उत्थान करावे.

६. आद्य क्रांतीवीर उमाजी नाईकांचा मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देण्यात यावा.

७. आद्य क्रांतीवीर उमाजी नाईक यांच्या चित्रपटासाठी अर्थसहाय्यबाबतचा दि.२४-०२-२००८ पासून प्रलंबित असणारा प्रस्ताव तात्काळ मंजूर करावा.

८. विमुक्त भटक्या जमातीच्या मुलांच्या उच्च शिक्षणासाठीची शिक्षण फी नियमित मिळत नाही, ती तात्काळ मिळावी.

९. पक्ष पातळीवर रामोशी समाजाच्या कार्यकर्त्यांना पक्षाच्या तालुका, शहर, जिल्हा पातळीवरील कमिट्यामध्ये नेमणुका देण्याबाबत व त्याअनुषंगाने तालुका, जिल्हा, युवक अध्यक्षांना तसे कळविण्यात यावे.

१०. राज्य पातळीवरील शासकीय समित्या, महामंडळे यावरील नियुक्त्या अद्यापी झालेल्या नाही. त्यामुळे कार्यकर्ते अस्वस्थ आहेत. याबाबत पक्षाने तात्काळ निर्णय घ्यावा.

११. समाजातील युवकांना विशेष कार्यकारी दंडाधिकारी पदावर पक्षाच्यावतीने नियुक्ती करणे.

वरील मागण्यांच्या संदर्भात या संघटनेच्या माध्यमतून अनेक आंदोलने, मोर्चे, परिषदा, मेळावे, यांचे आयोजन करून या जमातीच्या समस्या कमी होण्यासाठी किंवा त्यांचे निर्मुलन होण्यासाठी सतत प्रयत्नशील राहिलेली दिसून येते. या संघटनेच्या माध्यमातून झालेले प्रयत्न, वर्तमानपत्रे, निवेदने या माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न संशोधकाने केला आहे. तो पुढीलप्रमाणे -

**१) कर्नाटक-महाराष्ट्र सीमाभागातील बेरड-रामोशी समाजाची परिषद :**

कर्नाटक-महाराष्ट्र सीमाभागातील बेरड-रामोशी समाजाची परिषद डड्डी, ता.हुक्केरी, जि.बेळगाव येथे दि.८ व ९ मे १९८३ रोजी आयोजित करण्यात आली होती. या परिषदेमध्ये बेरड समाजातील अनेक समस्यावर विचारमंथन करण्यात आले. प्रामुख्याने पोलीस खात्यापासून संरक्षण व गुन्हेगारी यादीतून या जमातीचे नाव कमी करण्यात यावे तसेच पुनर्वसन करून, समानतेची वागणूक मिळावी, त्याचबरोबर या जमातीला वर्गीकृत करावे. या मागण्या प्रामुख्याने मांडण्यात आल्या. या परिषदेला मार्गदर्शन करण्यासाठी नानासाहेब गोरे, चंद्रकांत घोरपडे, बाबा आढाव, विठ्ठल बन्ने, बाळकृष्ण रेणके, लक्ष्मन माने, राजा व्यंकटाप्पा नाईक हे आले होते. ही परिषद यशस्वी करण्याकरिता भीमराव गस्ती हे प्रयत्नशील होते.

**२) बेरड-रामोशी परिषद :**

दि. ८ व ९ मे १९८३ रोजी संपन्न झालेल्या परिषदेमध्ये बेरड-रामोशी समाजाच्या समस्यांबाबत व्यक्त केलेली मते पुढीलप्रमाणे आहेत.

१. **दिनकर साखरेकर** - बेरड-रामोशी हा धाडसी आणि इमानदार समाज आहे. छ.शिवाजी महाराजांपासून ते वासुदेव

बळवंत फडक्यांपर्यंत या समाजाने स्वातंत्र्य लढ्याला साथ दिली. ब्रिटीशांनी त्यांना गुन्हेगार जमातीमध्ये नोंदविले. पोलीसांकरवी त्यांचा अमानुष छळ केला. स्वातंत्र्यप्राप्ती नंतरही त्यांना गुन्हेगार मानले जावे त्यांचा छळ केला जावा हे शोभत नाही. याकरिता आमुलाग्र परिवर्तनाची गरज आहे.

२. **जयशंकर कालकुंदीकर** – ते या परिषदेत म्हणतात की, या समाजाला शिक्षणाची, संस्काराची आणि समान संधीची गरज आहे.

३. **बाबा आढाव** – ते मत व्यक्त करताना असे म्हणतात की, 'मुळच्या व्यवसायावर पाणी पडल्यामुळे विस्थापित झालेले जीवन पुन्हा निर्माण करण्याचा हक्क मिळावा म्हणून दलित–पिढीत साऱ्यांनीच भक्कम संघटना उभी करण्याची गरज आहे. पोलीसी छळाचे पुरावे संबंधितांनी दिल्यास सरकारचे लक्ष वेधून घेण्यासाठी मी शिकस्त करीन.'

४. **लक्ष्मण माने** – ते आपल्या भाषणात म्हणतात की, 'कोणी माणूस जन्माला येतो. तो गुन्हेगार म्हणून, हीच संकल्पनाच फेकून दिली पाहीजे. आणि त्याला तसे मानण्याची तरतुद कायद्यात असावी. ही माणुसकीची, लोकशाहीची क्रूर थट्टा आहे. त्याला माणूस म्हणून प्रतिष्ठेने जगू द्या. त्यासाठी सरकारी तिजोरी थोडी रिकामी झाली तरी चालेल. ते पुढे म्हणतात की, केवळ बेरड समाजाची संघटना करून हा प्रश्न सुटणार नाही. सर्व शोषक पिढींनी एकत्र येण्याची गरज आहे.'

५. **प्रा.अरूण कांबळे** – यांच्यामते ज्याच्यावर अन्याय होतो. त्या सर्वांनी एकत्रित येऊन अन्याय वेशीवर टांगला तरच प्रभाव पडेल. एकाकी लढे फोल ठरतात. बेरड समाजाला जन्मजात गुन्हेगार ठरविल्याने त्याच्यातील अप्रतिम गुण वाया जात आहेत. त्यांना जर पोलीसात प्राधान्य मिळवले तर ते फार मोठी कामगिरी करतील.

या परिषदेमध्ये पुढील ठराव संमत करण्यात आले. १) सीमा भागातील बेरड–रामोशांना जमिनी द्या, ताम्रपर्णी व घटप्रभा नद्याकाठच्या बेरडांच्या जमिनीवरील अतिक्रमणे दूर करून त्या त्यांना परत द्या. वनीकरणाची योजना बेरडांकडे देऊन त्यांच्या रोजगाराची सोय करा. आमच्याकडे गुन्हेगार म्हणून पाहु नका. पोलीसी अत्याचाराची चौकशी करण्यासाठी समिति नेमा. भारतीय सैन्यात नाईक बटालियन निर्माण करून त्यात समाजाला स्थान द्या. पोलीस व सैन्यदलातल्या भरतीत अग्रक्रम द्या.

**३) इंग्रजांविरूद्ध लढणारा रामोशी समाज उपेक्षित:**

नरवीर उमाजी नाईक पुण्यतिथीनिमित्त, भेंडवडे, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर येथे आयोजित कार्यक्रमात भीमराव गस्ती म्हणतात की, रामोशी म्हटले की दरोडेखोर, चोर, लुटारू, खुनशी अशा उपाध्या लादल्या जातात. समाज व शासन याच दृष्टीकोनातून या समाजाकडे पाहत आला आहे. इंग्रजी सत्तेविरूद्ध स्वतःच्या प्राणाची बाजी लावणारे अनेक रामोशी उपेक्षित राहिले. इतिहासाने देखील याची नोंद घेतली नाही. आज या समाजाला स्वयंभू नेतृत्वाची गरज आहे.

**४) चंदगड तहसिल कचेरीवर बेरड समाजाचा मोर्चा :**

दि.१२ जून १९८४ रोजी बेरड समाजाने चेण्णारील येथून हा मोर्चा पायी चालत चंदगडला नेला. या मोर्चाच्या मागण्या पुढीलप्रमाणे होत्या.

१. मागासवर्गीयांसाठी शासनाने योजलेल्या योजनांची अंमलबजावणी योग्यप्रकारे व्हावी.
२. मागासवर्गीयांच्या योजनांचा फायदा सुशिक्षित व श्रीमंतवर्गच घेतो.
३. सरकार यंत्रणा पक्षपाती असल्या कारणाने या समाजाला न्याय मिळत नाही म्हणून सरकारने पक्षपाती वागू नये.
४. पोलीसांचे अत्याचार कमी व्हावेत.
५. आश्रमशाळा सुरू कराव्यात. वनीकरणाचे काम बेरडांना द्यावे. वरील मोर्चाचे नेतृत्व विठ्ठल बन्ने व भीमराव गस्ती यांनी केले.

**५) लोकसंख्येच्या प्रमाणात आर्थिक तरतुद करावी**

विमुक्त व भटक्या जमाती महामंडळाने रामोशी समाजाच्या विकासासाठी लोकसंख्येच्या प्रमाणात आर्थिक तरतूद करून इतरांच्यापेक्षा ५० वर्षे मागे असलेल्या या भटक्यांना स्थैर्य प्राप्त करून द्यावे अशी मागणी नरवीर उमाजी नाईक समाजसुधारक बैठकीत करण्यात आली. या बैठकीचे अध्यक्ष श्री.वसंतराव चव्हाण हे होते.

**६) पेठवडगाव येथील रामोशी समाजाच्या जमिनीचा प्रश्न :**

पेठवडगाव येथील सर्व्हे क्रमांक ९५ 'अ' ची जमीन इनाम म्हणून येथील रामोशी समाजाच्या लोकांना मिळाली होती. १९६५ पर्यंत या जमिनी कसून हा समाज पोट भरत होता. गावातील प्रस्थापित लोकांनी ही जमीन जनावरांच्या बाजारासाठी उपलब्ध व्हावी म्हणून शासनाकडे प्रस्ताव दिला आणि तो मंजूर होऊन ही जमीन बाजारतळासाठी संपादीत करण्यात आली. या अन्यायाविरूद्ध रामोशी समाज संघटनेचे अध्यक्ष वसंतराव चव्हाण, भास्कर शिंदे, डॉ.भीमराव गस्ती, आर.के.भनवाडे, रामचंद्र बोडवे, भूते गुरूजी, विलासराव चव्हाण यांनी या जमिनीच्या चौकशी प्रकरणी सतत पाठपुरावा केला.

**७) बेरड-रामोशी समाजाचा मोर्चा :**

बेरड-रामोशी समाजाची परिषद गडहिंग्लज येथील साधना विद्यालयात ३ एप्रिल १९८५ रोजी संपन्न झाली. या परिषदेमध्ये रामोशी जमातीच्या लोकांचा पोलीसी छळापासून सुटका व्हावी. या मागणीचे निवेदन गडहिंग्लज विभाग प्रांत अधिकारी यांना देण्यात आले.

**८) पेठ-वडगाव येथील रामोशी जमिनीची परिषद :**

दि.४ जून १९८५ रोजी रामोशी-बेरड समाजाची परिषद पेठवडगाव, जि.कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आली. या परिषदेमध्ये रामोशी समाजाच्या प्रश्नासंदर्भात चर्चा झाली. त्यामध्ये प्रामुख्याने -

१. रामोशी समाजाला रोजगार मिळत नाही, पोट भरत नाही त्यामुळे ते दारू काढणे व विकणे हा व्यवसाय करावा.
२. पोलीस यंत्रणा रामोशी समाजाचे शोषण करते कुठेही चोरी झाली तरी बेरड-रामोशी समाजाच्या वस्तीवर धाड घालतात व पकडून नेतात. हे थांबणे अपेक्षित आहे.
३. स्वतःच्या जमिनीचा सातबारा स्वतःला मिळत नाही. जमिनीच्या चुकीच्या निवडी होतात.
४. ही कसली लोकशाही हे प्रश्न या परिषदेमध्ये उपस्थित केले.

या परिषदेला वसंतराव चव्हाण, भीमराव गस्ती, विठ्ठल बन्ने, प्रा.सिध्दार्थ बनगर इत्यादी उपस्थित होते.

**९) बेरड-रामोशी समाजाचा बेळगाव येथील मेळावा :**

दि.१६ व १७ ऑगस्ट १९८७ रोजी बेरड-रामोशी समाजाचा मेळावा बेळगाव येथील आयोजित करण्यात आला. या मेळाव्यानंतर हे लोक बेळगाव कलेक्टर कचेरीवर मोर्चा घेऊन गेले. या मोर्चाच्या

माध्यमातून बेरड-रामोशी समाजाच्या प्रश्नाकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला.

**१०) बेरड-रामोशी समाजाचे आंदोलनाचे दुसरे पर्व :**

बेरड-रामोशी समाजाच्या दुसऱ्या पर्वाला सुरूवात झाली आहे. आपल्या मागणीसाठी महाराष्ट्र व कर्नाटक विधानसभेवर मोर्चा नेण्यात येणार आहे. याची माहिती नरवीर उमाजी नाईक समाजाचे अध्यक्ष वसंतराव चव्हाणांनी पत्रकार परिषदेत दिले.

**११) सांगली ते मुंबई पदयात्रा :**

राज्यातील रामोशी समाजाच्या वतीने समाजाच्या विविध मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्याकरिता सांगली ते मुंबई अशी पदयात्रा १ मे १९८९ रोजी सुरू झाली. ते २३ मे १९८९ ला मुंबई येथील आझाद मैदानावर पोहोचले. व मोर्चाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये पोलीसांचे अत्याचार बंद व्हावेत, विनाअट नोकऱ्या मिळाव्यात, उमाजी नाईक याचा पुतळा जेजुरी येथे उभा करावा. या मागण्यांचे निवेदन मंत्र्यांना देण्यात आले.

**१२) पोलीसांचा महात्रास थांबवावा :**

नरवीर उमाजी नाईक समाज सुधारक या संघटनेच्या माध्यमातून सातारा व सांगली जिल्ह्यातील जिल्हाधिकाऱ्यांना खालील मागण्यांचे निवेदन देण्यात आले. पोलिसी छळापासून रामोशी समाजाची मुक्तता व्हावी.

**१३) दलित महासंघाने - नेसरी येथे - बेरड-रामोशी मेळावा : (१९९२)**

दलित महासंघाने पहिला मेळावा घेतला तो भटक्या-विमुक्तांच्या प्रश्नावर नेसरी येथे घेतला. कर्नाटक-महाराष्ट्राच्या सीमाभागावर नेसरी हे गाव आहे. दलित महासंघाने प्रथमच भटक्या-विमुक्तांच्या प्रश्नावर आवाज उठविला. आणि बेरड-रामोशी मेळावा हा १९९२ ला घेण्यात आला. या मेळाव्याचे आयोजन प्रा.शामराव वंटमुरी यांनी आणि अध्यक्षस्थानी प्रा.डॉ.मच्छिंद्र सकटे होते. या मेळाव्याचा प्रमुख उद्देश म्हणजे या सीमाभागातील बेरड-रामोशी समाजाची आर्थिक उन्नती व्हावी म्हणून त्यांना अर्थसहाय्य देणारी एखादी पतसंस्था स्थापन करावी. जेणेकरून मिळणाऱ्या अर्थसहाय्यातून हा समाज एखादा लहान-सहान उद्योग स्थापन करून उदरनिर्वाह करू शकेल.

**१४) लक्षवेधी धरणे आंदोलन :**

दि.२० मे १९९६ रोजी पुणे येथील कौन्सिल हॉल, साधुवासवानी पुतळ्याजवळ या धरणे आंदोलनाचे आयोजन नरवीर उमाजी नाईक समाजसुधारक मंडळ, महाराष्ट्र राज्य यांचे नेतृत्वाखाली केले होते. या आंदोलनाचा मुख्य उद्देश असा होता की, देशाला स्वातंत्र्य मिळाले, ५० वर्षे पूर्ण होऊन गेली. रामोशी जमातीतील आजची पिढी स्वातंत्र्यात जन्माला आली, वाढली परंतु ज्या थोर समाजसुधारकांनी, आद्य क्रांतिकारकांनी देशाच्या इतिहासात महत्त्वपूर्ण योगदान दिले त्यांचे योगदान हे जाणिवपूर्वक दुर्लक्षित ठेवले गेले आहे. त्यामध्ये उमाजी नाईक, भद्राप्पा नाईक, आवळ्या रामोशी, सिंधूर लक्ष्मण, राजा महकरी नाईक, दौलत रामोशी, सत्तु बेरड, राणी केळदी चन्नमा, व्यंकटप्पा नाईक हे आद्य क्रांतिकारक होते.

त्याचबरोबर आजच्या रामोशी व बेरड जमातीच्या अनेक समस्या आहेत या समस्या शासनाने सोडवाव्यात म्हणून सतत एक चळवळ उभी केली. परंतु शासनाने या समाजाच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष केले आहे.

या धरणे आंदोलनाचा मुख्य हेतु थोडक्यात सांगावयाचा झाल्यास रामोशी व बेरड समाजातील आद्य क्रांतिकारकांचा इतिहास शासनाने उजागर करावा आणि रामोशी समाजाने वेळोवेळी आंदोलने, मोर्चे, मेळावे आयोजित करून रामोशी व बेरड

समाजाच्या प्रश्नाकडे शासनाने लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. परंतु शासनाने वारंवार दुर्लक्ष केले त्यांचे लक्ष वेधण्यासाठी या 'लक्ष्यवेधी धरणे आंदोलनाचे' आयोजन करण्यात आले होते.

**१५) पंढरपूरला रामोशी समाजाचे राज्यव्यापी अधिवेशन :**

दि.२५ ऑक्टोबर १९९८ रोजी पंढरपूर, जि.सोलापूर येथे रामोशी समाजाचे राज्यव्यापी अधिवेशन घेण्यात आले. या अधिवेशनाचे उद्देश पुढीलप्रमाणे –

१. रामोशी समाजाला निश्चित दिशा देण्यासाठी व रामोशी समाजाच्या प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी.
२. रामोशी समाजाचा समावेश हा अनुसूचित जमातीमध्ये करावा. रामोशी समाजावरील गुन्हेगारीचा शिक्का नष्ट करून पोलीसी अत्याचारापासून मुक्तता व्हावी.
३. रामोशी बेरड समाजातील आद्य क्रांतिकारकांचा इतिहास शासनाच्या प्रयत्नातून उजागर व्हावा.
४. रामोशी समाजाची धाडसी वृत्ती व धडधाकट शरीर यष्टी यांचा विचार करून सैन्यामध्ये 'रामोशी बटालियन' सुरू करावी जसे की, मराठा, शीख, गुरखा, महार बटालियन आहे तशी 'रामोशी बटालियन' सुरू करावी.
५. रामोशी समाजाच्या अज्ञानपणाचा प्रस्थापित समाजाने फायदा घेऊन त्यांना वतन म्हणून प्राप्त असणाऱ्या जमिनी बळकावल्या आहेत. त्या जमिनी त्यांना परत मिळाव्यात, शिवाय पडीक, गायरान जमिनीतील काही भाग राहण्यासाठी व कसण्यासाठी रामोशी समाजाला देण्यात याव्यात.
६. रामोशी समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी 'नरवीर उमाजी नाईक विकास महामंडळ' स्थापन करावे. अशा वरील मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासठी या अधिवेशनाचे आयोजन वसंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली केले होते.

**१६) आद्य क्रांतिकारक म्हणून 'नरवीर उमाजी नाईक' यांना घोषित करावे :**

दि.८ मार्च २००३ रोजी महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री ना.सुशिलकुमार शिंदे यांना नरवीर उमाजी नाईक समाजसुधारक मंडळ यांनी एक पत्र लिहून नरवीर उमाजी नाईक हे आद्य क्रांतिकारक म्हणून घोषित करावे असे सूचित केले. या मागील कारण असे की, वासुदेव बळवंत फडके हा एक चित्रपट प्रसिद्ध झाला होता. या चित्रपटामध्ये आणि इतर नोंदीमध्ये वासुदेव बळवंत फडके यांना आद्य क्रांतिकारक म्हणून घोषित केले होते. असे करणे चूक आहे. खऱ्या इतिहासावर अन्याय करणारे आहे. असे वसंत चव्हाण यांचे मत होते. या मताच्या पुष्ठ्यार्थ ते असे लिहितात की, १८३२ रोजी उमाजी नाईक यांना त्यांच्या क्रांतिकारक कारवायामुळे फासावर देण्यात आले आणि वासुदेव बळवंत फडके हे १८३२ नंतर १३ वर्षांनी जन्माला येतात मग आद्य क्रांतिकारक कोण? म्हणून ते मुख्यमंत्र्यांना म्हणतात की, येणाऱ्या अधिवेशनामध्ये आपण आद्य क्रांतिकारक म्हणून 'नरवीर उमाजी नाईक' यांना घोषित करावे अशी तमाम रामोशी व बेरड समाजाची मागणी आहे. इतिहासाचा व समाजाचा आपण आदर कराल अशी अपेक्षा ते व्यक्त करतात.

**१७) आद्य क्रांतिकारक उमाजी नाईक अभियान :**

नरवीर उमाजी नाईक यांना आद्य क्रांतिकारक म्हणून शासनाला वेळोवेळी निवेदने दिली आहेत. मोर्चा आणि आंदोलन यातून मागणी केली आहे. पण शासनाने या मागणीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचे आढळून आल्याने

रामोशी समाजाने नरवीर उमाजी नाईक समाजसुधारक मंडळ या संघटनेच्या माध्यमातून एक अभियान ३ फेब्रुवारी २००९ रोजी हाती घेण्यात आले ते म्हणजे 'आद्य क्रांतिकारक उमाजी नाईक अभियान' या अभियानाची सुरूवात ही जेजूरी ते मुंबई अशी मोटार सायकल रॅली काढून करण्यात आली.

**१८) रास्तो रोको :**

१३ जानेवारी २०१२ वाघवाडी फाटा नॅशनल हायवे येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाच्या माध्यमातून पुढील मागण्या मांडण्यात आल्या.

१. आद्य क्रांतिकारक नरवीर उमाजी नाईक यांच्या फाशी स्थळाला राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित करण्यात यावे.
२. जगण्याचे साधन नसणाऱ्या समाजाला सरकारी जमीनी देण्यात याव्यात.
३. ३ फेब्रुवारी हा फाशी दिवस राष्ट्रीय सुट्टी म्हणून घोषित करावा.
४. समाजाचा अनुसूचित जाती-जमातीमध्ये समावेश व्हावा.

**१९) हल्लाबोल आंदोलन :**

दि.२२ जुलै २०१३ रोजी आझाद मैदान मुंबई येथे हल्लाबोल आंदोलनाचे आयोजन करण्यात आले होते. या आंदोलनातील मागण्या ह्या पूर्वीपासून मागत आलेल्या मागण्या होत्या. त्यामध्ये रामोशी समाजाचे पुनर्वसन करावे. रामोशी समाजाला अनु.जमाती-जातीमध्ये समावेश करावा. नरवीर उमाजी नाईक यांना आद्य क्रांतिकारक म्हणून घोषित करावे आणि आतापर्यंत शासनाने आमची फसवणूक केली आहे म्हणून आता हल्लाबोल आंदोलन. हे आंदोलन नरवीर उमाजी नाईक समाजसुधारक मंडळ या संघटनेच्या माध्यमातून करण्यात आले.

रामोशी-बेरड समाजाची चळवळ ही महाराष्ट्र सीमाभाग आणि महाराष्ट्रामध्ये प्रामुख्याने डॉ.भीमराव गस्ती, विठ्ठल बन्ने आणि बसंतराव चव्हाण या नेतृत्वाच्या माध्यमातून सुरूवात झाली. रामोशी-बेरड समाजाच्या चळवळी पुर्वी या चळवळीचे नेतृत्व हे भटक्या-विमुक्त जमातींच्या अंतर्गत असणाऱ्या नेतृत्वाकडे होते. परंतु १९८० च्या नंतर रामोशी समाजाची व बेरड समाजाची स्वतंत्र चळवळ उभी राहिली. यामागील कारणाचा शोध घेत असताना असे आढळून येते की, भटक्या-विमुक्त जमातींच्या चळवळी अंतर्गत वर्चस्ववादासाठी अनेक गट निर्माण झाले. याचा परिणाम असा दिसून येतो की, भटक्या विमुक्तांमधील जातीजमातींना असे वाटू लागले की, या वर्चस्ववादात आपल्या जमातीचे प्रश्न मागे पडतील आणि आपल्या समाजाच्या समस्या जशा आहेत तशाच राहतील. म्हणून आपल्या जमातींच्या प्रश्नांसाठी एक आपली स्वतंत्र चळवळ उभी करण्यात यावी. यातूनच नरवीर उमाजी नाईक समाजसुधारक मंडळ आणि बेरड समाज संघटनांची निर्मिती झाली. या संघटनांचा अभ्यास केल्यानंतर असे दिसून येते की, या संघटना स्थिर स्थावर होत असताना संघटनेचे पुनर्वसन होण्यासाठी महाराष्ट्रातील भटक्या-विमुक्त नेतृत्वाच्या प्रसिद्धीस आलेल्या चेहऱ्यांचा यांनी उपयोग करून घेतला आहे. यामध्ये लक्ष्मण माने यांचे अग्रक्रमाने नाव घेता येईल.

रामोशी बेरड समाजाची अनेक अधिवेशने पाहता, त्यामध्ये लक्ष्मण माने यांनी प्रत्येकवेळी सर्व समावेशक भूमिका घेतली. सर्वांची एकजुट बांधूया अशी मते व्यक्त केली. तर दुसऱ्या बाजूला भीमराव गस्ती यांनी आपण आपले स्व-अस्तित्व निर्माण केले तरच आपला प्रश्न आपण सोडवू शकतो असे मत मांडले.

होते असे की आपल्या जमातीलमधील नेतृत्वाने व्यक्त केलेल्या भावना ह्या त्या जमातीला जवळच्या वाटतात. याप्रमाणे रामोशी समाजाची

चळवळ महाराष्ट्रात उभी राहिलेली दिसते.

अनेक प्रश्नासाठी व आपल्या समाजाच्या समस्या सोडविण्यासाठी आणि आपण संघटित झालो तर हे प्रश्न मार्गी लागतील या भावनेतून संघटक समाजाला एकत्र बांधत होता. समाजाची उन्नती ही जर रामोशी जमात ही अनुसूचित जमातीत गेल्याशिवाय नाही. यासाठी प्रयत्नशील संघटना राहिली. त्याचबरोबर या जमातीवर पडलेला गुन्हेगारीचा शिक्का मिटविण्यासाठी या चळवळींना खूप प्रयत्न करावे लागले. कारण एकतर हा समाज उपेक्षित, उदरनिर्वाहाचे साधन नाही. त्यात गुन्हेगार म्हणून पोलीस अतोनात छळ करीत, पुरूषांना डांबून ठेवत त्यामुळे कुटुंबातील इतर सदस्यांची उपासमार होत असे.

रामोशी व बेरड जमातीचे लोक धाडसी व शरीर दणकट यामुळे गावकरी त्यांना राखनदार म्हणून ठेवत त्याचबरोबर कसण्यासाठी थोडीबहुत जमिन दिली जात असे. परंतु या जमातीच्या अज्ञानपणाचा फायदा घेवून प्रस्थापित समाजाने त्यांच्या जमिनी बळकावल्या. त्यांचा उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला.

रामोशी-बेरड समाजाची चळवळ ही खालील प्रश्नांबाबत होती. नेमक्यापणाने मांडता येईल की,

१. गुन्हेगारीचा शिक्का हटवा.
२. समाजाची उन्नतीसाठी जमातीला अनुसूचित जाती-जमातीच्या यादीत समावेश करा.
३. वतन दिलेल्या जमिनी परत मिळाव्यात.
४. राहण्यासाठी गायरान जमिनी व कसण्यासाठी पडीक जमिनी प्राप्त व्हाव्यात.

या मागण्यांच्या आधारावर चळवळ उभी राहिली पण हा प्रश्न कित्येक दशके एक इंचही हालत नाही. या समाजामध्ये एकोपा व समाज संघटित राहिला नाही. नेतृत्वाने समाजामध्ये अस्मितेची गरज असल्याचे ओळखले. त्याशिवाय लोक संघटित होणार नाहीत म्हणून 'नरवीर उमाजी नाईक' हा आपला आद्य क्रांतिकारक आहे. तो आपला देव व प्रेरणास्थान आहे हे लोकांच्यामध्ये रूजविण्यासाठी चळवळ कार्य करू लागली. शासनाकडे पाठपुरावा करू लागली की, 'नरवीर उमाजी नाईक' यांना आद्य क्रांतिकारक घोषित करा. 'नरवीर उमाजी नाईक' पुण्यतिथी दिवशी लोकांना एकत्र करण्याचे प्रयत्न सुरू झाले. या प्रयत्नाला यश म्हणून जेजुरी, जि.पुणे येथे 'नरवीर उमाजी नाईक' यांचा पुतळा बसविण्यात आला आहे. आज रामोशी समाजातील लोक जेजुरीला आले की नरवीर उमाजी नाईक यांचे दर्शन घेतल्यशिवाय जात नाहीत. आणखी एक 'ज्योती' नेण्याच्या प्रथा महाराष्ट्रात आहेत. रामोशी समाजातील लोक जेजूरी येथून नरवीर उमाजी नाईक यांच्या पुतळ्यापासून ज्योती नेण्यासाठी महाराष्ट्रातून येत असतात.

परंतु समाजाचा मूळ प्रश्न सुटला नाहीच. प्रस्थापित संघटना ह्या विशिष्ट पक्षाच्या राजाश्रयाला जावून बसल्या. संस्थापक अध्यक्ष हा अध्यक्षपद सोडायला तयार नाही. तरूण पिढीला प्रस्थापित संघटना, नेतृत्वावर आणि राजकीय पक्षांवर विश्वास नव्हता. तरूणांचे म्हणणे होते की, प्रस्थापित राजकीय पक्ष आपले प्रश्न सोडविणार नाही. आपण इतर पक्षांना आपले प्रश्न समजावून सांगूयात परंतु संस्थापक अध्यक्ष तयार झाले नाहीत. याची परिणिती अशी झाली की, महाराष्ट्रात आज रामोशी समाजाच्या अनेक संघटना निर्माण झाल्या आहेत. या संघटना वेगवेगळ्या राजकीय पक्षाच्या प्रभावाने प्रभावित होऊन कार्य करतात. उदा.राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस, भाजपा, शिवसेना अशा विविध पक्षाशी संबंधित या संघटना राहिल्या आहेत. त्यामुळे समाजाचे विभाजन पर्यायाने ताकतीचे विभाजन झाले. शासन हे दबावाचे ऐकते, राजकीय पक्ष

डोक्यांची संख्या मोजते. या संघटनांची ताकत कमी झाली कारण समाजाचे विभाजन झाले. यामुळे संघटनात्मक दबाव कमी पडतो. त्यामुळे समाजाचे प्रश्न जैसे थे राहतात.

पण एक गोष्ट निश्चित आहे की, नेते मोठे झाले पण त्या समाजातील सर्वसामान्य लोक जिथे काल होते तिथेच आज आणि उद्याही राहतील. असं चित्र रामोशी समाज संघटनेच्या चळवळीचा अभ्यास केल्यानंतर दिसून येते.

महाराष्ट्रामध्ये १९८० मध्ये स्थापन झालेली संघटना म्हणजे नरवीर उमाजी नाईक समाजसुधारक मंडळ, महाराष्ट्र राज्य ही होय. या संघटनेच्या माध्यमातून रामोशी आणि बेरड समाजाच्या समस्यासाठी चळवळी केल्या आहेत. या चळवळी पुढील उद्दिष्टांसाठी केल्या आहेत. १) भारताचे नागरिक म्हणून स्विकारा. २) रामोशी-बेरड समाजावरील गुन्हेगार म्हणून वागणूक दिली जाते ती देवू नये. ३) भारतीय सैन्यात उमाजी नाईक बटालीयन सुरू करून या समाजातील तरूणांना भरती करावे. ४) राहण्यासाठी जागा व कसण्यासाठी पडीक जमिनी मिळाव्यात. ५) मोफत शिक्षण व आरोग्याच्या सुविधा मिळाव्यात हे आणि इतर उद्दिष्टांसाठी या संघटनेने ८ व ९ मे १९८३ रोजी एक परिषद आयोजित केली होती. यानंतर या संघटनेच्या माध्यमातून मेळावे, चर्चासत्रे, परिषदा, मोर्चे, आंदोलने, पदयात्रा यांचे आयोजन करत आहेत.

तरीही आजही या जमातींचे प्रश्न १९६० नंतर जे होते. त्यामध्ये फारसा बदल झाल्याचे दिसत नाही. भारताचे नागरिक म्हणून या जमातींना आजही मान्यता मिळत नाही. या जमातींच्या चळवळींना अपेक्षित यश आजही प्राप्त झालेली दिसून येत नाही.

**संदर्भग्रंथ:**


१) लक्ष्मन माने (१९९७) 'विमुक्तायन' यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई.

२) निवेदन

३) दै.सकाळ - दि.०८ मे १९८३

४) दै.पुढारी - दि.०३ मे १९८३

५) दै.समाज - दि.१० मे १९८३

६) दै.पुढारी - दि.१२ मे १९८३

७) दै.पुढारी - दि.१३ जून १९८४

८) दै.पुढारी - दि.२३ जुलै १९८४

९) दै.पुढारी - दि.३१ जुलै १९८४

१०) दै.पुढारी - दि.०६ एप्रिल १९८५

११) दै.पुढारी - दि.३० मे १९८५

१२)दै.पुढारी - दि.१८ ऑगस्ट १९८७

१३) दै.सकाळ - दि.०२ सप्टेंबर १९८७

१४) दै.सकाळ - दि.२४ जून १९८७

१५) दै.संदर्भ - संघटनेचे निवेदन दि.४ जून १९९०

१६) नरवीर उमाजी नाईक समाज समाज सुधारक प्रसिद्धी पत्रक

१७) दै.पुढारी - दि.२५ ऑक्टोबर १९९८ प्रेस नोट


❖ ❖ ❖

# विमुद्रीकरणाचे (चलनबदलाचे) समाजावरील सामाजिक व आर्थिक परिणाम

डॉ. दादासाहेब मोटे,
समाजशास्त्र विभागप्रमुख,
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंबड, जि. जालना.

**प्रस्तावना:**

कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये आर्थिक व्यवहाराचे एक महत्त्वपूर्ण साधन म्हणून चलनव्यवस्थेला अनन्यसाधारण स्वरुपाचे महत्त्व आहे. चलनाची उपलब्धता, व्यहारातील त्याचा वापर, चलनप्रकार, त्याची सुरक्षितता आणि सरकारचे नियंत्रण यासारख्या बाबींवर देशाच्या अर्थव्यवस्थेचे स्वरुप अवलंबूत असते. देशाची अर्थव्यवस्था जितकी सदृढ / मजबूत तितक्या प्रमाणांत आर्थिक व सामाजिक विकासाला गती मिळत असते. याउलट स्थिती म्हणजे देशामध्ये काळ्या पैशाची समांतर अर्थव्यवस्था, भ्रष्टाचार, चलनासाठीची असुरक्षितता आणि सरकारचे नियंत्रण नसेल तर अनेक प्रश्न / समस्या निर्माण होऊन देशाच्या सामाजिक - आर्थिक विकासाच्या प्रक्रियेला खीळ बसते. सामाजिक - आर्थिक बदलाच्या या प्रक्रियेमध्ये शासकीय व्यवस्थेची भूमिका अंत्यत महत्त्वाची असलेली दिसून येते.

भारतामध्ये आतापर्यंत तीन वेळा चलनबदलाचे निर्णय घेतले गेल्याचे दिसून येते. पहिला निर्णय १२ जुलै, १९४६ ला घेतला गेला. या निर्णयानुसार १९४७ वर्षाच्या अखेरपर्यंत चलनातील १४३.९७ कोटी नोटांपैकी १३४.९ कोटी रुपयांचे चलन बदलण्यात आले. रु. १००० आणि रु.१०,००० नोटा चलनव्यवस्थेतून बाद करून त्याठिकाणी रू. १०००, रु. ५००० आणि रु. १०,००० च्या नवीन नोटा चलनात आणल्या गेल्या. १९५४ मध्ये हे विमुद्रीकरण करण्यात आले. दुसरा विमुद्रीकरणाचा निर्णय जनता पार्टी सरकारच्या काळामध्ये घेण्यात आला. १६ जानेवारी १९७८ मध्ये रु. १०००, रु. ५००० आणि रु. १०,००० च्या नोटांचे विमुद्रीकरण करण्यात आले. तिसरा निर्णय ०८ नोव्हेंबर २०१६ रोजी भारतीय जनता पक्षाच्या सरकारच्या काळामध्ये घेण्यात आला. या निर्णयानुसार रु. ५०० आणि रु. १००० च्या नोटा चलनातून बाद करुन नवीन रु. २००० आणि रु. ५०० च्या नोटा चलनात आणल्या गेल्या.

**विमुद्रीकरणाची संकल्पना :**

*"Demonetization is the act of stripping a currency unit of its status as legal tender. Demonetization is necessary whenever there is a change of national currency. The old unit of currency must be retired and replaced with a new currency unit."*

**विमुद्रीकरणाची आणखी एक संकल्पना** म्हणजे,

*"It is radical financial setp in which currency units status as a legal tender in decleared invalid. This move is usually executed when old currencies have tobe replaced by new one's or whenever there is a change of national currency. However, given the extent to which the project has tobe executed, the move as to be well planed in advance."*

विमुद्रीकरणाचा अर्थ म्हणजे शासकीय निर्णयानुसार जून्या चलनातील नोटा रद्द आणि त्याठिकाणी नवीन चलन व्यवहारामध्ये उपयोगात आणणे. अशा निर्णयामध्ये चलन बदलून देण्याची व्यवस्था आणि त्यासाठी निश्चित कालावधीही दिला जातो.

**विमुद्रीकरणाचे उद्देश :**

०८ नोव्हेंबर २०१६ रोजी भारताच्या पंतप्रधानाकडून ज्यावेळेस हा निर्णय जाहीर

करण्यात आला त्यावेळेस त्यांनी विमुद्रीकरणाचे खालील उद्देश स्पष्ट केलेले होते.

१. चलन प्रक्रियेमध्ये बनावट नोटांचे प्रमाण वाढणे.
२. करचुकवेगिरीमधून काळ्या पैशात वाढ होणे.
३. भ्रष्टाचाराला आळा घालणे, त्याचे निर्मूलन करणे.
४. अतिरेकी / दहशतवादी यांना होणारा चलनाचा पुरवठा थांबविणे त्याबरोबरच यांच्याकडून चलनात येणाऱ्या बनावट नोटा थांबविणे.

वरील उद्देशांना अनुसरुन शासकीय पातळीवर चलनबदलाचा निर्णय घेतल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. भारतीय समाजातील भ्रष्टाचार नष्ट व्हावा, काळा पैसा बाहेर यावा या उद्देशाबरोबरच सर्व व्यवहार बँकामार्फत व्हावेत, आर्थिक व्यवहारात पारदर्शकता यावी, करदात्यांची संख्या वाढावी, कॅशलेस व्यवहार व्हावेत यासाठी हे पाऊल उचलले गेले असले तरी विमुद्रीकरणाच्या निर्णयाने अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. दीर्घकाळीन उपाययोजनांचा एक भाग म्हणून हा निर्णय स्वागतार्ह असला तरी या निर्णयामधून तात्कालीक प्रश्नांची सोडवणूकही व्हावयास हवी होती. चलनबदलाच्या निमित्ताने सामाजिक आणि आर्थिक व्यवहारामध्ये जी परिस्थिती निर्माण झाली त्यांची मांडणी प्रस्तूत लेखातून करण्याचा प्रयत्न केलेला आहे. विमुद्रीकरणाचा शेतकरी आणि त्यांचे व्यवसाय, मजूर-शेतमजूर, छोटे व्यावसायीक, व्यापारी, नोकरदार वर्ग, अत्यावश्यक सेवा, बाजारपेठा, सर्वसामान्य जनता यासारख्या विवीध घटकांवर सामाजिक - आर्थिकदृष्ट्या कोणते सकारात्मक - नकारात्मक परिणाम होत आहेत त्याचा वेध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**अ) शेती व्यवसाय आणि शेतकऱ्यांवरील परिणाम :**

शेती व्यवसाय हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो. दीर्घकालीन उपाययोजना म्हणून शेती क्षेत्रासाठी चलनबदलाचा निर्णय पूरक स्वरुपाचा असला तरी सद्परिस्थितीमध्ये शेतकऱ्यांना अनेक समस्यांना जावे लागत आहे. शेतीमालाला हमी भाव न मिळणे, बाजारपेठांची उपलब्धता नसणे, व्यापारी वर्गाकडून शेतकऱ्यांची पिळवणूक / लूट होणे, शेती व्यवसायाला मान-सन्मान प्रतिष्ठा न मिळणे यासारख्या त्यांच्या जुन्याच समस्या / प्रश्न आहेत, त्यामध्ये चलन बदलाच्या निर्णयाने त्यांची परिस्थिती अधिकच बिकट बनलेली आहे. विमुद्रीकरणाचा शेती व्यवसाय आणि शेतकऱ्यांवर जो परिणाम दिसून येत आहे, त्याची मांडणी सारांश रुपात खालीलप्रमाणे करता येऊ शकते.

१. खेड्यापाड्यातील आठवडी बाजारामधून किरकोळ व्यवहार, विक्री यामधून शेतकऱ्यांवर विमुद्रीकरणाचा परिणाम जाणवतांना दिसून येतो.
२. आठवडी बाजारामधील ग्राहकी घटण्याबरोबरच शेतकऱ्यांच्या मालाला कवडीमोल किंमत मिळू लागली, त्यामुळे सामान्य शेतकऱ्यांना तोटा (नूकसान) सहन करावा लागत आहे.
३. खते - बि - बियाणे, औषधी यासाठी जुन्या नोंटाचा शेतकऱ्यांना वापर करता येईल असे जून्या नोटा / चलन शिल्लकच राहिले नाही आणि दुसरे म्हणजे चलनाच्या अभावी व्यापारी वर्गाकडून शेतकऱ्यांना अपेक्षीत प्रतिसाद मिळाला नाही.
४. सहकारी पतसंस्था / सहकारी बँका याचा पतपुरवठा बंद केल्यामुळे शेतीसाठी शेतकरी वर्गाला कर्ज मिळणे कठीण होऊन बसले.
५. शेतकऱ्यांकडील उत्पादित सोयाबीन, कपाशी वा अन्य शेतीमाल विक्रीच्या संदर्भात व्यापारी

वर्गाने जुने चलन आणि नवे चलन यानुसार दोन भाव केले. चलनाच्या कमतरतेमुळे व्यापाऱ्यांनी एक-दोन महिन्यानंतरचे चेक देण्यास सुरुवात केली. यामुळे नवीन चलनानुसार खरेदीभाव कमी केला, त्याचा आर्थिक फटका शेतकऱ्यांना बसलेला दिसून येतो.

६. राष्ट्रीयकृत बँकामधून पैसे काढण्यावर मर्यादा, कांही ठिकाणी कॅश (*Cash*) संपली असे झळकणारे फलक यामुळे शेतकरी, मध्यमवर्गीय आणि सर्वसामान्य जनता यांना कुटुंबातील जमलेले विवाह / विवाहाच्या तारखा पैशाअभावी पुढे ढकलाव्या लागत आहेत. अपवादात्मक स्थितीमध्ये विवाहातील वऱ्हाडी मंडळींना चहापान देऊन विवाह संपन्न झाल्याचे एक- दोन प्रकार मिडीयामधून पहावयास मिळाले.

७. क्रेडीट कार्ड / डेबीट कार्ड, नेट बँकींग, धनादेश इ. सारख्या बाबीबद्दल शेतकरी तितकासा जागरुक नाही. छोटे शेतकरी तर चलनाच्या रुपामध्ये व्यवहाराला पसंती देतात. एकीकडे शेतकऱ्यांना बँकामधूनही आवश्यक तितके चलन मिळत नाही, व्यापाऱ्यांकडूनही लूट होते तर दुसरीकडे वरील बाबींबद्दल अज्ञान, चलनाचा तुटवडा यामुळे शेतकरी कात्रीत सापडलेला दिसून येतो आहे. सद्यस्थितीत तरी देखील शेतकरी वर्ग विमुद्रीकरणामुळे आर्थिक अडचणीत सापडल्याचेच चित्र सर्वत्र दिसून येत आहे.

**ब) व्यापारी वर्गावरील परिणाम :**

व्यापारी वर्गावरील विमुद्रीकरणाचा परिणाम हा सकारात्मक आणि नकारात्मक अशा दोन्ही स्वरुपाचा असलेला दिसून येतो. व्यापारी वर्गामध्येही मोठे व्यापारी आणि छोटे व्यापारी / व्यावसायीक अशा दोन वर्गामध्ये त्याचे विभाजन करता येऊ शकते. सर्वच क्षेत्रातील व्यापारी वर्गावर निरीक्षणात्मक दृष्टीने विमुद्रीकरणाचे जे परिणाम दिसून आले ते खालील स्वरुपामध्ये.

१. केंद्र सरकारचा विमुद्रीकरणाचा निर्णय आणि चलन व्यवहारामध्ये दोन हजार रुपयाची नवीन नोट याचा फायदा मोठ्या / होलसेल व्यापाऱ्यांनी अधिक प्रमाणात घेतलेला दिसतो. जून्या एकहजार आणि पाचशे रुपयांच्या नोटा बंद आणि शंभर रुपयाच्या नोटांची कमतरता यामधून मोठे व्यापारी आणि इतर हितसंबंधी वर्गीयांकडून मूद्दाम / जाणीवपूर्वक शंभर रुपयांच्या नोटांची साठवणूक / साठेबाजी त्यामुळे दैनंदिन व्यवहारामध्ये असंख्य अडचणी निर्माण झाल्या.

२. नोटाबंदीचा अधिक परिणाम लहान / छोटे व्यापारी, दुकानदार यांना बसलेला दिसून आला. चलनबदलामुळे दोन हजार रुपयाची नवीन नोट, त्याचे सुटे होण्यामध्ये अडचण त्यामुळे छोट्या व्यापाऱ्यांना ग्राहकांअभावी बसून राहण्याशिवाय पर्याय राहिला नाही.

३. मोठ्या व्यापाऱ्यांनी दोन हजार रुपये चलनाच्या बदल्यात अधिकाधिक सामान खरेदी करण्याची सक्ती केली त्यामुळे सर्वसामान्य जनतेचे हाल होत आहेत.

४. धान्य खरेदीच्या मोबदल्यात व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांना धनादेश देण्यास सुरुवात केली. धनादेश बँकेमध्ये जमा केला तरी बँकेतून रक्कम काढण्यावर मर्यादा त्यामुळे आर्थिक त्रासाला त्यांना सामोरे जावे लागत आहे.

५. मोठे व्यापारी / होलसेल विक्रेते यांनी बँक कर्मचाऱ्यांशी संधान बांधून, काही प्रसंगी कमिशन देऊन स्वतः कडील जुन्या नोटा बदलून घेतल्या, त्यामुळे व्यवहारामध्ये चलनाची कमतरता अधिक जाणवू लागली.

मोठ्या व्यापाऱ्यांनी स्वतःचे उखळ पांढरे करुन घेण्याचा प्रयत्न केला.

६. बऱ्याच ठिकाणी पेट्रोल पंपावरुन कमिशन घेऊन चलन बदलून देण्याचे प्रकारही उघडकीस आले. रेल्वे काऊंटरवर देखील असे प्रकार घडल्याचे निदर्शनास आले.

**क) अत्यावश्यक सेवांवरील प्रभाव :**

चलनबदलाच्या निर्णयाने बहुतांशी अत्यावश्यक सेवांवर परिणाम झाल्याचे दिसून आले. आरोग्यसेवा, औषधी दुकाने, गॅस, रेल्वेसेवा, विमानसेवा, पेट्रोलपंप यासारख्या सेवांसाठी विशेष सवलत शासकीय व्यवस्थेने जाहीर केली होती. अत्यावश्यक सेवांच्या निमित्ताने घरपट्टी, पाणीपट्टी, वीजबील भरण्यासाठी जुन्या चलनाचा वापर करण्याची सुविधाही उपलब्ध करुन देण्यात आली होती. विमुद्रीकरणाचा अत्यावश्यक सेवांवर खालील स्वरुपाचा परिणाम झाल्याचे जाणवते.

१. हॉस्पीटलमध्ये रुग्णांच्या बिलाच्या निमित्ताने जून्या चलनाचा स्विकार करावा असा राज्य सरकारने अध्यादेश काढून देखील हॉस्पीटल प्रशासनाने जून्या नोटा स्विकारण्यास नकार दिला. त्याचबरोबर धनादेश स्विकारण्यासही नकार दिला. नवीन चलनाच्या रुपामध्ये बिलामध्ये मागणी होत होती, त्यामुळे रुग्ण, कुटुंबीय, नातेवाईक यांना त्रास सहन करावा लागला.

२. एकीकडे हॉस्पीटल्समध्ये रुग्ण, कुटुंबियांची हेळसांड तर दुसरीकडे नागरिकांनी घरपट्टी, पाणीपट्टी भरल्यामुळे नगरपालीका, महानगरपालिका मालामाल झाल्या. बऱ्याच वर्षापासून ची त्यांची थकबाकी वसूल झाली. यासाठी नागरिकांनी जून्या चलनांचा वापर केलेला दिसून येतो. ज्यांनी रु. ५०,००० हजारा च्या वर कर रकमेचा भरणा केलेला आहे अशा लेकांची नांवे शासनाने मागितल्याची बातमी मिडीयामधून ऐकावयास मिळाली.

३. रेल्वे, पेट्रोलपंप याठिकाणी नोटाबदलीचे बरेच प्रकार घडले. चलन तुटवड्यामुळे पेट्रोल पंप चालकांनी राऊंड फिगरमध्ये इंधन भरण्याची सूचना केली. त्यामुळे ग्राहकांना त्रास होतो आहे. रेल्वे काऊंटर, पेट्रोलपंप याठिकाणी सर्रासपणे जुन्या नोटा बदलून दिल्या गेल्या. त्यामुळे सरकारच्या निर्णयाला हरताळ फासला गेला की काय? अशी शंका येत आहे.

**ड) सर्वसामान्य जनतेवरील परिणाम :**

चलन बदलाचा परिणाम सर्वात अधिक सर्वसामान्य जनतेवर झालेला दिसतो. चलन बदलाचा निर्णय हा काळा पैसा बाहेर आणण्यासाठी, भ्रष्टाचार रोखण्यासाठी, सर्व व्यवहारामध्ये पारदर्शकता आणण्यासाठी आणि बाहेरील वा शेजारी राष्ट्रामधून जो बनावट पैसा राष्ट्रामध्ये येतो तो रोखण्यासाठी घेतला गेला असल्याचे शासकीय व्यवस्थेकडून वारंवार स्पष्ट केले जात आहे. सर्वसामान्य लोकांचा या निर्णयाला पाठिंबा आहे असेही माध्यमांमधून दाखवले जात आहे. राजकीय दृष्टीकोनातून विरोधी पक्ष हे सर्व खोटे आहे, चलन बदलाची आवश्यकता नव्हती, चलनाची उपलब्धता का करुन दिली जात नाही, सर्वसामान्य जनतेला वेठीस धरले गेले आहे असे विवीध प्रश्न उपस्थित करुन विमुद्रीकरणाला विरोध केला जात आहे.

०८ नोव्हेंबर २०१६ रोजी शासनाकडून हा निर्णय जाहीर झाल्यानंतर आतापर्यंत म्हणजे २२/१२/२०१६ पर्यंत ४५ दिवसांत शासनाच्या वतीने विमुद्रीकरणाच्या संदर्भात ६१ निर्णय /परिपत्रके जाहीर करण्यात आलेली आहेत. अशा परिपत्रकांमधून जनतेमध्ये संभ्रम निर्माण झाल्याचे चित्रही जाणवत आहे. विमुद्रीकरणाचा सर्वसामान्य जनतेवर काय आणि कोणता परिणाम झाला हे

निरीक्षणाच्या माध्यमातून खालील स्वरुपात टिपण्याचा प्रयत्न केलेला आहे.

१. शासकीय व्यवस्थेने विमुद्रीकरणाचा निर्णय जाहीर केल्यानंतर आणि जुने चलन बदलून घेण्यासाठी विशीष्ठ कालावधी दिल्यानंतरही बँकामध्ये चलन बदलून घेण्यासाठी रांगा लागल्या. रांगामध्ये कित्येक तास उभे रहाण्याशिवय सर्वसामान्य जनतेला पर्याय राहिला नाही.

२. चलनबंदीच्या निर्णयानंतर बहुतांशी सर्वच बँकाची अेटीएम सेवा बंद होती, आजही थोड्याफार फरकाने अशीच स्थिती आहे. ज्या बँकाची अेटीएम सेवा कार्यरत होती त्यामधून केवळ रु. दोन हजाराची मर्यादा होती. अेटीएम समोर देखील रांगा लागल्याचे चित्र सर्वत्र निरीक्षणाच्या माध्यमातून पहावयास मिळाले.

३. जुने चलन बँक खात्यामध्ये जमा करण्यावर कोतणेही निर्बंध नसले तरी बँक खात्यामधून पैसे काढण्यावर मात्र निर्बंध घातले गेले. त्यामुळे व्यवहारामध्ये सर्वसामान्य जनतेला असंख्य अडचणींना / समस्यांना सामोरे जावे लागले.

४. बँकामधून मिळणारी रक्कम ही दोन हजार रुपये नोटांच्या स्वरुपात त्यामुळे बाहेर बाजारपेठांमध्ये तिचे सुटे होण्याबाबतचे प्रश्न निर्माण झाले. रु. १०० आणि त्यापेक्षा कमी रुपयाच्या चलन तुटवड्यामुळे हे प्रश्न आणखी गंभीर स्वरुपाचे झाले.

५. दैनंदिन जीवनात बाजारपेठांवर याचा विपरीत परिणाम झाला. सुट्या चलनाच्या अभावामुळे एकीकडे ग्राहकांची आर्थिक बचत झाली असे चित्र जाणवत असले तरी दुसरीकडे छोटे दुकानदार / व्यावसायीक यांना याचा फटका बसला. दुकानांमध्ये बसून राहण्याशिवाय त्यांच्यासमोर पर्याय राहिला नाही.

६. कांही श्रीमंत लोकांनी / धनदांडग्यांनी स्वतःचा काळा पैसा पांढरा करण्यासाठी गरीबांच्या जनधन खात्यांचा आधार घेतला. जनधन खात्यात पैसे भरण्याची मर्यादा असतांनाही गरीब जनधन खातेधारकांच्या ते लक्षात आले नाही. कांही ठिकाणी कमिशनवर या खात्यांमध्ये रक्कम जमा केली. उत्तर प्रदेश, पश्चीम बंगाल ही घटक राज्ये याबाबत आघाडीवर राहिली. आतापर्यंत जनधन खात्यामध्ये जमा झालेल्या ७२ हजार कोटी रुपयांवरुन हे लक्षात येऊ शकते.

७. बँकींग व्यवस्था आणि केंद्र शासनाची डाकघरे यामधूनच नव्या चलनाची उपलब्धता करुन दिलेली असल्यामुळे कांही ठिकाणी बँकेतील अधिकारी / कर्मचारी यांना हाताशी धरुन संगनमताने चलन बदली केल्याचे प्रकार निदर्शनास आले. नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमधून एकाच दिवशी ४७ कोटी रुपयाचे चलन बदलले गेले. याचा सर्वाधिक परिणाम सर्वसामान्य जनतेवर झालेला दिसून येतो.

८. विमुद्रीकरणाचा निर्णय आणि बँक खात्यामधून पैसे काढण्यावरील मर्यादा याचा परिणाम म्हणून शेतकरी, सर्वसामान्य जनता यांना आपल्या कुटुंबातील जमलेले विवाह / विवाहाच्या तारखा पैशाअभावी पुढे ढकलाव्या लागत आहेत.

९. आठवडी बाजारांमध्ये २०%, २५% कमिशनवर चलन बदलून देण्याचे प्रकारही उघडकीस आले आहेत. असे प्रकार निश्चीतच संगनमताने होत असावेत असा संशय निर्माण होण्याला वाव आहे.

१०. बँकेमधून पैसे काढण्यासाठी रांगामध्ये उभे राहण्यामधून हा लेख लिहीला जाईपर्यंत एकूण २७ लोकांचा मृत्यू झालेला मिडीयाच्या

माध्यमातून निदर्शनास आला. हे सर्वसामान्य लोकच होते.

११. बँक कर्मचारी / अधिकारी यांच्यावर कामाचा अतिरिक्त ताण येतो आहे. भांडणाचे प्रसंग देखील उद्‌भवत आहेत. याचा सर्वसामान्य जनतेला त्रास सहन करावा लागतो आहे.

**इ) नोकरदार वर्गावरील परिणाम :**

नोकरदार वर्ग हा सुशिक्षीतांचा वर्ग आहे. विविध सेवा क्षेत्रामध्ये हा वर्ग विस्तारलेला आहे. हा वर्ग महिन्याच्या शेवटी स्वतःच्या श्रमाचे वेतन घेतो. शासनाच्या विमुद्रीकरण निर्णयाचा या वर्गावर कोणत्या स्वरुपात परिणाम जाणवतो आहे ते खालील स्वरुपात दर्शविता येईल.

१. मुळामध्ये हा वर्ग सुशिक्षीत / पगारदार असल्यामुळे या वर्गाने कॅशलेस व्यवहारामध्ये अधिक योगदान देण्याची आवश्यकता आहे आणि योगदान देण्यासाठी तो तत्परही झालेला दिसून येतो. मात्र दैनंदिन जीवनामध्ये किरकोळ खर्चासाठी ज्या सुट्या चलनाची आवश्यकता भासते त्यानिमित्ताने ते त्रस्त आहेत.

२. महिन्याकाठी नोकरदारांना जे वेतन मिळते / बँकेत खात्यावर जमा होते ते वेतन चलनाच्या स्वरुपामध्ये काढण्याचे निर्बंध आहेत. त्या निर्बंधाचाही बऱ्याच वेतनदारांना त्रास जाणवतो आहे.

३. भारतामध्ये खाजगी सेवाक्षेत्रामध्ये बऱ्याच ठिकाणी महिन्याचे वेतन रोख पैशाच्या स्वरुपामध्ये दिले जाते. अशा ठिकाणी चलनबदलाच्या निर्णयाने कर्मचारी / कामगार यांचे दोन महिन्यांचे (पुढील दोन महिने) वेतन आगावू स्वरुपात जुन्या चलनाच्या रुपामध्ये दिले गेले. बऱ्याच सेवाक्षेत्रामध्ये असे प्रकार घडल्याचे निदर्शनास आले.

४. नोकरदार लोकांना बँकांच्या रांगामध्ये तासनतास उभे राहणे शक्य नव्हते कारण कामावर जाणे महत्त्वाचे, जिथे पर्याय तिथे नोकदारांनी कुटुंब सदस्यांना रांगेत उभे केले पण जिथे पर्याय नव्हता तिथे काम बुडवून रांगेत उभे राहिले, नोकरदारांना स्वतः बरोबरच त्यांच्या कुटुंबियांनाही मनस्ताप सहन करावा लागतो आहे.

**चलनबदलाच्या / विमुद्रीकरणाच्या वर उल्लेखीत केलेल्या परिणामांबरोबरच –**

१. ज्येष्ठ नागरीक, सेवानिवृत्त नागरिकांना मानसिक -शारीरिक मनस्ताप सहन करावा लागत आहे.

२. जुन्या चलनामधील रु. ५००, रु. १००० च्या नोटा फाडून टाकण्याचे, जाळून टाकण्याचे बरेच प्रकार मिडीयाच्या माध्यमातून पहावयास मिळाले.

३. अनाधिकृतपणे चलन बदलून देण्याचे प्रकार बँका, रेल्वे स्टेशनवरील कॅश काऊंटर, पेट्रोल पंप याठिकाणी सर्वत्र स्वरुपामध्ये घडलेले पहावयास मिळाले.

४. बँकाना पुरेशी कॅश मिळत नससल्यामुळे / पुरवठा होत नसल्यामुळे निर्बंध घातलेल्या रकमेपेक्षाही कमी रक्कम ग्राहकांना मिळत होती, कांही बँकामधून कॅश संपल्याचे बोर्डस् झळकतांना पहावयास मिळाले.

५. अेटीएम्‌ची सर्व व्यवस्था कोलमडलेली दिसून आली.

६. विवाहासाठी २ लाख ५० हजार रुपयाची मर्यादा निश्चित केलेली असतांना तीही रक्कम लोकांना विवाहासाठी मिळाल्याचे चित्र दिसून येत नाही.

७. व्यापारी वर्गासाठी अनंत अडचणी निर्माण झाल्या कारण शेतकरी वर्ग चेक घेण्यास नकार देत होता.

विमुद्रीकरणाच्या निर्णयाचे वरील परिणाम नकारात्मक स्वरुपाचे जाणवत असले तरी

दीर्घकालीन आर्थिक धोरण सुरक्षित राहण्यासाठी, राष्ट्राच्या विकासासाठी निश्चितच सकारात्मक स्वरुपाचे आहे. ज्या कारणांसाठी / उद्देशासाठी हा निर्णय घेतला गेला त्यामधील किती उद्देश सफल होतील हा भाग वेगळा. निर्णय बहुतांशी लाभदायक व्हावा अशी अपेक्षा आहे. सकारात्मक स्वरुपाच्या परिणामांचा विचार केल्यास –

१. भारतीय चलनव्यवस्थेमध्ये काळ्या पैशाची जी समांतर अर्थव्यवस्था आहे, ती नष्ट करण्याला बऱ्याच प्रमाणांत मदत होऊ शकेल.

२. बाहेरच्या शेजारील राष्ट्रामधून ज्या बनावट / नकली नोटा विवीध मार्गाने येत होत्या त्यावर प्रतिबंध बसेल. अर्थव्यवस्थेमधील बनावट चलनाचे प्रमाण कमी होईल.

३. रिअल इस्टेट क्षेत्राला विमुद्रीकरणाच्या निर्णयाचा मोठा धक्का बसण्याची शक्यता नाकारता येत नाही. शहरी भागात 'ऑन मनी' याच क्षेत्रात अधिक प्रमाणात चालत होता. रेडीरेकनर दरामुळे बिल्डर्स लॉबीला फटका बसेल.

४. शहरी भागात घरांच्या किमती सर्वसामान्यांच्या आवाक्यामध्ये येतील अशीही आशा करावयास हरकत नाही.

५. काळा पैसा किती प्रमाणांत बाहेर येईल याबबात शंका असली तरी तो वाढण्याचे प्रमाण निश्चितच कमी होईल.

६. शेतकऱ्यांच्या शेतीमालाला हमी भाव मिळण्याच्या संदर्भात शासकीय पातळीवरुन सकारात्मक प्रयत्न होतील, अशी आशा करावयास हरकत नाही.

७. बहुसंख्य व्यवहार बँकामार्फत / पारदर्शक त्यामुळे व्यवहार कॅशलेस होण्याला मदत होईल, वार्षिक उलाढाल कळेल आणि कर चुकवेगिरीला आळा बसेल. सरकारच्या उत्पन्नामध्ये वाढ होईल, विकास योजनांना गती मिळण्यास मदत होईल.

८. बँकीग व्यवहारामधील नवनवीन बाबी म्हणजे नेट बँकीग, ई-बँकीग, मोबाईल बँकींग, आरटीजीएस, चेक पेमेंट यासारख्या प्रकारांचा अधिकाधिक वापर होईल. त्यादृष्टीने लोकांना सुशिक्षीत / जागृत करावे लागेल, त्याचा वापर वाढवावा लागेल. भारतीय अर्थव्यवस्थेत ७५ %व्यवहार रोखीने होतात, तर पाश्चिमात्य विकसीत राष्ट्रात हेच व्यवहाराचे प्रमाण केवळ २०% ते २५% इतके आहे, हेही लक्षात घ्यावे लागेल.

९. कर्जदारांना कर्ज देण्यासाठीचा बँकांचा कागदपत्रांचा त्रास वाचेल. कर्जदारांची कर्ज परत फेडण्याची पत बँक अधिकाऱ्यांना ठरविता येईल. सहकारी बँका बुडीत निघण्याचे प्रमाण कमी होईल.

१०. शेतकऱ्यांकडील जमीन, त्यामधून मिळणारे उत्पन्न, व्यवहार आधारकार्डाशी जोडल्यामुळे तेही आयकराच्या जाळ्यामध्ये येऊ शकतील, सरकारचे उत्पन्न वाढण्यास मदत होऊ शकेल.

११. भारतीय जनतेला व्यवहारामध्ये / जीवनामध्ये काटकसर करण्याची सवय लागेल, 'बँकेत खात्यामध्ये पैसा आहे पण तो खर्च करता येत नाही' असे म्हणण्यामागचा दुसरा उद्देश बचत हाही आहे, हे लक्षात घेतले पाहिजे.

१२. सर्व माहिती संगणकीय स्वरुपात त्यामुळे कागदपत्रावरील खर्च वाचेल.

१३. बँकिंग व्यवसायाला प्रोत्साहन मिळेल आणि सुरक्षेची हमी बँका घेतील. भ्रष्टाचाराला सर्वस्वी नाही पण काहीतरी प्रमाणांत आळा बसेल.

दीर्घकालीन आर्थिक धोरणासाठी निश्चितच विमुद्रीकरणाचे धोरण सकारात्मक ठरेल अशी अपेक्षा

बाळगण्यास हरकत नाही. शासकीय पातळीवरुन या निर्णयाची अंमलबजावणी कशी होते यावर सर्वकाही अवलंबून आहे. कठोर स्वरुपाच्या निर्णयाची आवश्यकता आहे हे मात्र निश्चित.

संदर्भग्रंथ :


1. Bodhisattva Senguputa - 2016 - 'Endogenous Leadership in a federal Transfer Game' - National Institute of Public Finance and Policy, Delhi.
2. PTI (2016, Nov. 9) - 'Demonetisation will benefit economy in long run - Jaitely' - The Hindu Business line.
3. Soetevent A.R. (2011), 'Payment choice, Image motivation and contributions to charity : Evidence from a field experiment' - American economic Journal, P. 180.
4. Morewedge C.K. (2007), 'Unfixed Resources : Perceived costs, consumption and the accessible account effect, Journal of consumer re- search, 34(4), P. 459.
5. अेबीपी माझा - Live telecast News chanel, 8th Nov. to 24 Dec. 2016.
6. एनडीटीव्ही - Live telecast News chanel, 8th Nov. to 24 Dec. 2016.
7. Care Ratings, Finance Ministry website.
8. Squire Patton Boggs - 'The Impace of Demonetization in India.'
9. Tax Research Team (2016), 'Demonetisation : Impact on the Economy', National Institute of Public Finance and policy, New Delhi, Page 3 to 17.

१०. दैनिक लोकसत्ता - लाकसत्ता कार्यालय, पुणे.


❖ ❖ ❖

# भारतीय संविधान आणि मानवी हक्क

**प्रा.मनाली शेटे**
**सोनाई, संकल्प कॉलनी, यशोदा नगर, सातारा**

**प्रस्तावना :-**

व्यक्तीला आंतरिक विकासासाठी काही अधिकार आवश्यक असतात हे तत्व सनातन आहे. या दृष्टीने मानवी हक्कांचा विचार ही प्राचीन काळापासून निरंतर चालत आलेला दिसतो. काळानुरूप त्याच्या स्वरुपात बदल होत गेले. मानवी संस्कृतीच्या वेगवेगळया टप्प्यांवर त्यास वेगवेगळया संज्ञा वापरल्या गेल्या. त्यामुळे आज अस्तीत्वात असलेल्या मानवी हक्कांची संकल्पना ही ऐतिहासिक मूळ असलेली संकल्पना आहे. त्या मुळेच मानवी हक्क म्हणजे अनेक पिढयांचे योगदान, दुर्दम्य इच्छा आणि अनुभव यांचा परिपाक होय. मानवी हक्कांशिवाय आपण माणूस म्हणून जगू शकत नाही हे सिध्द झाले आहे. मानवी हक्कांची व्याप्ती मोठी आहे. यात एकीकडे पारंपारिक हक्क आणि राजकीय हक्कांचाही समावेश होतो. तर दुसरीकडे नव्याने विकसित होत असलेल्या सामाजिक आणि सांस्कृतीक सक्कांचाही समावेश केला जातो. माणुस हा जन्मतःच हक्क आणि पतिष्ठेच्या दृष्टीने समान आहे. हे मुलभूत तत्व यातून प्रसूत होते. मानवतेच्या गुणांमुळेच ते मानवास प्राप्त होतात. त्यामूळे माणसापासून वेगळे न करता येणारे जन्मसिध्द हक्कांचे स्वरुप मानवी हक्कांना प्राप्त होते. त्यामुळे मानवी हक्कांची संकल्पना अभ्यासणे महत्वाचे ठरते. भारतीय संविधान मानवी हक्कांना अंतर्भूत करत प्रतिष्ठा दिल्यामुळे भारतीय संविधानाच्या संदर्भात मानवी हक्कांचे विश्लेषण अधिक उपयुक्त ठरते.

**मानवी हक्क संकल्पना :-**

मानवी हक्क म्हणजे असे हक्क जे माणसाला जन्मतःच प्राप्त होतात व ते कोणत्याही परिस्थितीत कोणाकडून ही हिरावले जावू शकत नाहीत. १९४८ साली संयूक्त राष्ट्रांनी मानवी हक्कांचा जाहिरनामा प्रसूत केल्यानंतर मानवी हक्कांना खऱ्या अर्थाने वैश्विक स्तरावर मान्यता मिळाली. त्यानूसार मानवी हक्क म्हणजे जन्मतः मिळालेले असे हक्क आहेत जे माणसाच्या व्यक्तिमत्व विकासासाठी, मानवी मुल्यांच्या जपणूकीसाठी , संवर्धनासाठी , बौध्दीक , वैचारीक व सदसदविवेक बुध्दीच्या वाढीसाठी महत्वाचे आहेत. तसेच ते मानवाच्या अध्यात्मिक व इतर गरजा भागविण्यासकरीता आवश्क असतात.

सारांश जे हक्क मानवाच्या जीवनाशी, स्वातंत्र्याशी , समानतेशी, प्रतिष्ठेशी , न्यायाशी संबंधित असतात त्यांना मानवी हक्क असे म्हणतात.

**मानवी हक्कांचा विकास :-**

मानवी हक्कांचा विकास तीन पिढयांच्या हक्कांसंदर्भात मांडला जातो.

**अ) पहिली पिढी:-**

पहिल्या पिढीच्या मानवी हक्कांमध्ये नागरी व राजकीय हक्कांचा समावेश केला जातो. हे हक्क प्रदिर्घ काळ विकसित होत आलेले आहेत. अनेक राष्ट्रांनी आपल्या संविधानामध्ये या हक्कांना मुलभूत स्थान दिले आहे. त्यामुळे हे हक्क कायद्याच्या अविभाज्य भाग मानले जातात. नागरी हक्क व राजकीय हक्क यांचे स्वरुप भिन्न मानले असले तरी ते एकमेकांशी जोडलेली आहेत. याबाबतचा नागरी व राजकीय हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा (ICCPR) १६ डिसेंबर १९६६ रोजी संयूक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेत स्विकारला . तो प्रत्यक्षात येण्यासाठी किमान ३० राष्ट्रांच्या स्वाक्षऱ्यांची आवश्यकता होती ती प्रत्यक्षात पुर्ण झाली.

**ब) दुसरी पिढी :-**

आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक हक्क हे सर्वसामान्यपणे दुसऱ्या पिढीतील हक्क म्हणून ओळखले जातात. आर्थिक , सांस्कृतीक व सामाजिक हक्क हे माणसाच्या मुलभूत गरजांशी संबंधित हक्कक आहेत. निरोगी वातावरण, सामाजिक सुरक्षा, कामाचा हक्क, उपासमारीपासून मुक्तता इत्यादींचा यात प्रामुख्याने अंतर्भात केला जातो. संयुक्त राष्ट्रांनी १६ डिसेंबर १९६६ रोजी या संदर्भात आंतरराष्ट्रीय करारनामा करण्यात आला तोही सर्व राष्ट्रांनी प्रत्यक्षात स्वीकारला. हे हक्क साधारणतः अभावापासून मुक्तता या संकल्पनेवर आधारलेले दिसतात.

**क) तिसरी पिढी :-**

सामुहिक हक्क हे तिसऱ्या पिढीचे हक्क मानले जातात. व्यक्ती प्रत्यक्षात विविध गटांचे व समूहांचे सभासद असतात. त्यामुळे तिसऱ्या पिढीचे हक्क हे समूहाच्या सामुहिक प्रयत्नातून प्रत्यक्षात येतात. हे हक्क प्रामुख्याने एकत्रित राहणाऱ्या इच्छेवर व बंधूत्वाच्या भावनेवर आधारलेले दिसतात. तिसऱ्या पिढीतील हक्कांमध्ये स्वयंनिर्णयाचा हक्क, शांततेचा हक्क यांचा प्रामुख्याने विचार केला जातो. सामूहिक हक्कांची प्रभावी अंम्मलबजावणी प्रामुख्याने इतर हक्कांच्या उपभोग घेण्यासाठी मदतकारक ठरते.

**मानवी हक्कांचे विविध सिध्दांत :-**

मानवी हक्कांच्या कालसुसंगत विकासात मानवी हक्कांना सैध्दांतिक आधार ही मिळत गेले. त्यातील मानवी हक्क विषयक सिध्दांत पुढील प्रमाणे मांडता येतील.

**१) नैसर्गीक हक्क सिध्दांत :-**

व्यक्तीचे हक्क हे जन्मतः किंवा निसर्गतःच अस्तित्वात असतात हा मूलभूत विचार या सिध्दांताचा पाया आहे. एलेन पॅगेल्स या संदर्भात असे म्हणतात की, व्यक्तीचे काही हक्क समाजाच्या संदर्भात किंवा समाजाच्या विरोधात असू शकतात की जे हक्क समाजाने मान्य केले पाहिजेत. व त्या प्रमाणे क्रिया करणे व्यक्तीवर बंधनकारक असले पाहिजे. ते व्यक्तिंचा विचार करता मूलभूत स्वरुपाचे असावेत. मानवी हक्क सिध्दांतातून प्रथमतः काही बाबी पुढे आल्या त्यात मानवी हक्कांना मान्यता मिळवावी लागते. मानवी हक्क हे अध्ये स्वरुपाचे असतात व सर्व मानव समान असतात या तत्वांचा अंतर्भात स्पष्ट झाला.

**२) कायदेशिर हक्क सिध्दात :-**

कायदेशिर हक्क सिध्दाताच्या पुरस्कर्त्यांनी नैसर्गिक हक्क सिध्दांतावर प्रखर टिका केली. त्यांच्या मते हक्क ही नैसर्गिक प्रक्रिया नसून ती राज्याची निर्मिती आहे. त्यामूळे हक्क स्वाभाविक किंवा निरंकूश राहत नाहीत. केवळ हक्कांना मान्यता मिळवून उपयोगाचे नसते तर खरा प्रश्न हक्कांच्या अंमलबजावणीचा असतो. म्हणून कायदेशीर हक्क सिध्दांताच्या पुरस्कर्त्यांनी हक्कांची निर्मिती व अंमलबजावणी कायद्याद्वारेच व्हावी यावर भर दिला.

**३) ऐतिहासिक सिध्दांत :-**

मानवी हक्क विषयक समर्थनास ऐतिहासिक सिध्दांताचा ही उल्लेख आवश्यक ठरतो. कारण काही हक्क हे प्रथा, परंपरेच्या सातत्यातून पुढे येतात. या सिध्दांतकर्त्यांच्या मते प्रथा म्हणजे प्राचीन कायदाच होय.प्रथा, परंपरा, नाते यासारख्या संकल्पनातून ही अधिकाराची प्रक्रिया आकार घेत असते. उदा. वाढदिवसाच्या दिवशी आपल्या आई-बाबांनी, पती-पत्नीने आपणास भेटवस्तू दिलीच पाहीजे हा अधिकार किंवा हक्क वाटू लागतो.

**४) सामाजिक कल्याण सिध्दांत :-**

मानवी हक्कांच्या संदर्भात सामाजिक कल्याण सिध्दांताचा प्रथम पूरस्कार रॉस्की पाऊंड आणि शफी यांनी प्रथम केला. पुढे बेथॉम जे.एस. मिल हे या सिध्दांताचे प्रभावी पुरस्कर्ते ठरले. त्यांनी सामाजिक साध्यांना हक्कांमध्ये महत्वाचे स्थान दिले. मात्र हक्कांच्या उल्लंधन प्रक्रियेवर फारसे लक्ष दिले नाही.

**५) मार्क्सवादी सिध्दांत :-**

मानवी हक्कांच्या सिध्दांतामध्ये मार्क्सवादी दृष्टीकोनाला ही महत्वाचे स्थान आहे. मार्क्सवादी

सिध्दांत कर्त्यांच्या मते मानवी हक्क हे मध्यमवर्गीय मोहजाल असून परिस्थिती बदलली की या संकल्पनांमध्ये बदल होतो. हक्काच्या दृष्टीने मार्क्सवादी क्षमतांचा पुरुपूर वापर व गरजांची पूर्तता या तत्वाला प्राधान्य देतात.

**मानवी हक्क व भारतीय संविधान :-**

भारतीय घटना समिती गठित झाल्यानंतर दोन वर्षांनी मानवी हक्कांचा जागतिक जाहिरनामा प्रसिध्द झाला. हा मानवी हक्कांचा जाहिरनामा भारतीय संविधानाने तंतोतंत स्विकारलेला दिसतो. भारतीय संविधानातील मुलभूत हकक व मार्गदर्शक तत्वांच्या भागात मानवी हक्क जाहिरनाम्याचे प्रतिबिंब पहावयास मिळते. उदा. मानवी हक्क जाहिरनाम्याच्या पहिल्या कलमा प्रमाणे सर्व माणसे जन्मतः मुक्त आणि पतिष्ठा व त्यांच्या हक्का बाबतीत समान असतात यास भारतीय संविधानाने १४ व्या कलमाने समाविष्ठ करताना राज्य कोणऱ्याही व्यक्तीस भारताच्या राज्यक्षेत्रात कायद्यापुढे समानता अथावा कायद्याचे संरक्षण नाकारणार नाही. याप्रमाणे मानवी हक्क जाहिरनाम्यातील कलम नं २ ते २९ ला भारतीय राज्यघटनेतील मुलभूत हक्कांचे तिसरे प्रकारण व मार्गदर्शक तत्त्वांचे चौथे प्रकरण सकारात्मक प्रतिसाद देत मानवी हक्कांची प्रतिष्टापना करताना दिसते.

**मानवी हक्कांशी सबंधीत भारतीय कायदे :-**

मानवी हक्कांच्या संरक्षण व संवर्धनावर नियंत्रण असणाऱ्या काही महत्वाच्या राष्ट्रीय कायद्यांची यादी पुढील प्रमाणे आहे.

- मानवी हक्क संरक्षण कायदा १९९३
- अल्पसंख्यांकांसाठी राष्ट्रीय आयोग कायदा १९९२
- महिलांसाठी राष्ट्रीय आयोग कायदा १९९०
- नागरी हक्क संरक्षण कायदा १९५५
- अनुसुचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा १९८७
- हाताने भंगीकामाचा उद्योग आणि शुष्क सौचालयांचे बांधकाम प्रतिबंध कायदा १९९३
- अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६
- स्त्रियांचे अश्लिल प्रदर्शन प्रतिबंध कायदा १९८६
- हुंडा प्रतिबंधक कायदा १९६१
- सती जाणे प्रतिबंधक कायदा १९८७
- प्रसुतिविषयक लाभ कायदा १९६१
- बालविवाह विरोध कायदा १९२९
- बालक (श्रमाची प्रतिष्ठा) कायदा १९३३
- अनाचालयाचे आणि इतर धर्मदाय गृह देखरेख आणि नियंत्रण कायदा १९६०
- बालक कायदा १९६०
- बाल कामगार प्रतिबंध आणि नियमन कायदा १९८६
- अल्पवयींनासाठी न्यायदान कायदा १९८६
- तरुण व्यक्ती अपायकारक प्रकाशन कायदा १९५६
- जात अपात्रता निरसन कायदा १९५०
- मानसिक आरोग्य कायदा १९८७
- वेठबिगार पध्दती निर्मूलन कायदा १९७६

याशिवाय ही २० पेक्षा अधिक कायदे भारत सरकारने पारित केलेले आहेत जे मानवी हक्कांच्या अंमलबजावणीचा आग्रह धरतात.

**सारांश :-**

मानवी हक्क विषयक विचार हा मानवी जीवनाच्या प्रतिष्ठेसाठी कटिबध्द विचार आहे. मानवी हक्क विषयक विचारांचे अस्तित्व अनादी काळापासून असले तरी जागतिक स्तरावर या विषयाची निकड हिटलरने जर्मनीमध्ये ज्यूंची केलेली कत्तल व दुसऱ्या महायुध्दात झालेली युध्दनियमांची सर्रास उल्लंघने यातून प्रकर्षाने पुढे आली. भविष्यात

या सारख्या मानवी समुदायास लाजवेल अशा घटनांची पुनरावर्ती होवू नये म्हणून फ्रँकलीन डी रुझ विल्ट व विन्स्टन चर्चिल यांच्या नेतृत्वाखाली मानवी हक्क विषयक विचारांची रुपरेषा निश्चित झाली. १० डिसेंबर १९४८ रोजी मानवी हक्कांचा जाहीरनामा घोषित झाला. त्यावेळी भारतीय संविधान लिहीण्याचे काम चालू होते. या जाहीरनाम्याचा प्रभाव भारतीय घटनाकारांवर ही पडला.कारण सर्व विषमतांचे घर असणाऱ्या भारतीय समाजाला मानवी हक्कांशी परिचित करणे आवश्यक होते. व्यक्तींना वर्षानुवर्ष प्रतिष्ठा हक्क नाकारले जात होते. त्या नाकारलेल्या वंचित समुहांना सामावून घेवून समान प्रतिष्ठा व मुल्य कायद्यांचे आधारे देणे आवश्यक होते ते महान कार्य भारतीय संविधानकारांनी केले म्हणूनच आज भारतीय संविधान मानवी हक्कांच्या समर्थनाचा महान दस्तऐवज म्हणून जगात गौरविला जातो.

**संदर्भसुची**


१ काश्यप सुभाष, `भारतीय संविधान विश्वकोश ` विष्णू बुक्स, नई दिल्ली. २०११

२ गोडबोले माधव `द ज्युडी शिअरी ॲण्ड गव्हर्नंस इन इंडिया` रुपा ॲन्ड कंपनी, नई दिल्ली, २००८

३ जवाहरलाल नेहरू मेमोरिअल फंड, `सिलेक्टेड वर्क्स ऑफ जवाहरलाल नेहरु` द्वितीय मालिका , खंड १९ , नई दिल्ली १९९६

४ बिमल जलान, `पॉलिटिक्स ॲन्ड गर्व्हनंस`, इंडिया इंटरनॅशनल सेंटर क्वर्टली नई दिल्ली, समर २००८

५ गोडबोले माधव , `भारताच्या संसदिय लोकशाहीची अग्निपरीक्षा` , राजहंस प्रकाश , पुर्ण २०१२

६ यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठ, `मानवी हक्क व भारतीय राज्यघटना`, नाशिक २०१०


❖ ❖ ❖

# २६ व्या राष्ट्रीय अधिवेशनाचा अहवाल

सचिव,
मराठी समाजशास्त्र परिषद

मराठी समाजशास्त्र परिषदेचे २६ वे राष्ट्रीय अधिवेशन एल.जे.एन.जे. महिला महाविद्यालय, विले-पार्ले (पूर्व) मुंबई ४०० ०५७ येथे दिनांक २५ व २६ मार्च २०१६ या कालावधीत संपन्न झाले. अध्यक्ष या नात्याने अधिवेशनाचा अहवाल थोडक्यात देत आहे.

या राष्ट्रीय अधिवेशनाचा मुख्य विषय 'भारतीय शिक्षण आणि बदलते वास्तव' असा होता.

या अधिवेशनाच्या पहिल्या सत्रात उदघाटन कार्यक्रम शुक्रवार दि. २५ मार्च २०१६ रोजी सकाळी १० वाजता संपन्न झाला. उदघाटक म्हणून मा.डॉ. आर.बी. पाटील, माजी समाजशास्त्र विभाग प्रमुख, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर हे लाभले तर बीजभाषक म्हणून मा.प्रा.डॉ. उत्तमराव भोईटे, माजी कुलगुरु, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक हे होते. अधिवेशनाच्या दुसऱ्या सत्रामध्ये 'शिक्षणातील बदलती वास्तवता' या विषयावरील परिसंवादामध्ये डॉ. स्मिता अवचार यांनी अध्यक्षस्थान भुषविले तर प्रमुख वक्ते म्हणून अरविंद वैध, माजी प्राचार्य नंदादीप विद्यालय, गोरेगांव मुंबई, डॉ. बालाजी केंद्रे समाजशास्त्र विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई हे उपस्थित होते.

अधिवेशनाच्या तिसऱ्या सत्रामध्ये प्राध्यापकांच्या शोधनिबंधाचे सादरीकरण झाले. अधिवेशनाच्या चौथ्या सत्रात डॉ. इरावती कर्वे स्मृती व्याख्यान मालिकेत वक्त्या म्हणून डॉ. स्नेहलता देशमुख, माजी कुलगुरु, मुंबई विद्यापीठ, मुंबई या होत्या. शनिवार दिनांक २६ मार्च २०१६ रोजी पाचव्या सत्रातून शोधनिबंधाचे सादरीकरण झाले. सहाव्या सत्रामध्ये 'बदलते जागतिक वास्तव आणि शिक्षणाचा प्रश्न' या विषयावरील परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी डॉ. विजय मारुलकर होते. या परिसंवादात वक्ते म्हणून डॉ. श्रुती तांबे, समाजशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ व डॉ. अंबुजा साळगावकर, संचालक दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई ह्या होत्या. सातव्या सत्रातून शोधनिबंधाचे सादरीकरणे झाले. या अधिवेशनाचा समारोप दिनांक २६ मार्च २०१६ रोजी ४.३० ते ५.३० दरम्यान झाला. या समारोप प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. पद्मा वेलीसकर,प्रोफेसर

सेंटर फॉर स्टडीज इन सोशिऑलॉजी ऑफ एज्युकेशन टाटा समाज विज्ञान संस्था देवनार, मुंबई यांची उपस्थिती होती तर अध्यक्ष म्हणून डॉ. स्मिता अवचार यांनी स्थान भूषविले, तर प्राचार्य डॉ. स्मृती भोसले एल.जे.एन.जे. महिला महाविद्यालय, विले-पार्ले, मुंबई व डॉ. भारती तेंडूलकर, मराठी विभाग प्रमुख, एल.जे.एन.जे. महिला महाविद्यालय, विले-पार्ले, मुंबई हे प्रमुख उपस्थित होते.

कै. जय जोशी उत्कृष्ठ ग्रंथ पुरस्कार २०१६ प्रा.डॉ. दिपक पवार यांना महिलांचे राजकीय सक्षमिकरण या ग्रंथास देण्यात आला. तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ठ शोध निबंध पुरस्कार प्रा.डॉ. मंजूषा नळगीरकर यांना 'ग्रामीण भागातील इंग्रजी शिक्षणाकडे वाढता कल आणि इंग्रजी शाळांची गुणवत्ता: एक बदलते वास्तव' या शोधनिबंधास पुरस्कार देण्यात आला.

❖ ❖ ❖

समाजशास्त्र संशोधन पत्रिका या वार्षिक नियतकालिकाचे स्वामित्त्व व इतर बाबींविषयी निवेदन

(नियतकालिकांच्या नोंदणीविषयी नियम ८ प्रमाणे)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्रकाशन स्थळ | : | मराठी समाजशास्त्र परिषद<br>द्वारा-समाजशास्त्र विभाग, नाइट कॉलेज ऑफ आर्टस् अॅण्ड कॉमर्स, आझाद चौक, कोल्हापूर |
| २. | नियतकाल | : | वार्षिक (ISSN) |
| ३. | मुद्रकाचे नांव | : | डॉ. अरुण पौडमल |
| | राष्ट्रीयत्त्व | : | भारतीय |
| | पत्ता | : | कोल्हापूर महानगरपालिकेचे, यशवंतराव चव्हाण (केएमसी) कॉलेज, गंगावेश, कोल्हापूर ४१६ ०१२. |
| ४. | मुद्रण स्थळ | : | श्रीकांत कॉम्प्युटर्स अॅण्ड पब्लिशर्स, कोल्हापूर. |
| ५. | प्रकाशकाचे नाव | : | डॉ. महेंद्रकुमार जाधव |
| | राष्ट्रीयत्त्व | : | भारतीय |
| | पत्ता | : | नाइट कॉलेज ऑफ आर्टस् अॅण्ड कॉमर्स, आझाद चौक, कोल्हापूर |
| ६. | संपादकाचे नाव | : | डॉ. महेंद्रकुमार जाधव |
| | राष्ट्रीयत्त्व | : | भारतीय |
| | पत्ता | : | स्तंभ क्र. ५ प्रमाणे |
| ७. | मालकाचे नाव | : | मराठी समाजशास्त्र परिषद |
| | पत्ता | : | वरीलप्रमाणे |

मी, डॉ. महेंद्रकुमार जाधव असे जाहीर करतो की, वर दिलेला तपशील माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे खरा आहे.

डॉ. महेंद्रकुमार जाधव
प्रकाशक व संपादक

## - लेखकांना सूचना -

१. समाजशास्त्र संशोधन पत्रिकेचा वार्षिक अंक दरवर्षी डिसेंबर महिन्यात प्रसिद्ध होईल. या अंकातील लेखन साहित्य त्या-त्या वर्षीच्या ३० ऑक्टोबरपूर्वी पाठविता येईल. या पुढील आलेल्या लेखांचा विचार करता येणार नाही. लेखनसाहित्य पाठविताना लेखकांनी आपला आजीव सदस्य क्रमांक कळविणे अनिवार्य आहे.

२. संशोधन पत्रिकेत समाजशास्त्र विषयाशी संबंधित मराठी भाषेतीलच लेख प्रसिद्ध करण्यात येतील. पत्रिकेसाठी पाठविलेला लेख इतरत्र कोठेही प्रसिद्ध झालेला किंवा प्रसिद्धीसाठी पाठविलेला नसावा.

३. अन्य भाषांमधील उत्कृष्ठ लेखांचे अनुवाद मूळ लेखकांच्या अनुमतीसह संपादक मंडळाकडे पाठवावयास हवे

४. प्रसिद्धीसाठी पाठवावयाचे लेख शक्यतो संगणकीय अक्षरजुळणी करुन ई-मेलद्वारा पाठवावे. तसेच वापरलेला फॉन्ट व सॉफ्टवेअरचा तपशीलही कळवावा. संगणकीय लेखाची मुद्रीत प्रत व सीडी स्वतंत्र टपालाने पाठवावी. लेखासोबत स्वत:विषयी संक्षिप्त माहिती, मोबाईल नंबर, ई-मेल इ. वेगळ्या कागदावर पाठवावे.

५. प्रकाशनासाठी पाठविलेले संशोधनात्मक लेख विशेष करुन संकल्पनात्मक व विश्लेषणात्मक असावेत. आढाव्यात्मक नसावे व लेखाची कमाल शब्दपर्यादा ५००० शब्दापर्यंत असावी. लेखाचा थोडक्यात गोषवारा सोबत जोडावा.

६. लेखामध्ये तक्ते व आकृत्या मर्यादित असाव्यात.

७. लेखातील टीपा लेखाच्या अखेरीस द्याव्यात. संदर्भ ग्रंथांची यादी, लेखकाचे आडनाव, प्रकाशन वर्ष, ग्रंथाचे शीर्षक, प्रकाशनाचे नाव व संदर्भाचा पृष्ठ क्रमांक देण्यात यावा. एखाद्या लेखाचा संदर्भ द्यावयाचा असल्यास लेखकाने आडनाव, प्रकाशनाचे वर्ष, लेखाचे शीर्षक (अवतरण चिन्हात), संपादकाचे नाव, प्रकाशनाचे नाव तसेच नियतकालिकामध्ये प्रकाशित झाला असल्यास लेखाच्या शीर्षकानंतर नियतकालिकाचे नाव, प्रकाशनाचा सप्ताह, महिना, वर्ष, संदर्भ पृष्ठ क्र. या पद्धतीने असावेत.

८. विस्तृत परीक्षणासाठी तज्ज्ञांना संपादकामार्फत प्रत पाठविली जाईल. त्यासाठी संपादकीय पत्त्यावर परिक्षणार्थ ग्रंथाच्या दोन प्रती लेखकाने किंवा प्रकाशकाने पाठविणे आवश्यक आहे.

९. परीक्षणात्मक लेखाची मर्यादा १००० ते १५०० इतकी असावी.

१०. समाजशास्त्र संशोधन पत्रिकेतील लेखाच्या प्रकाशनाबाबत संपादक मंडळाचा निर्णय अखेरचा राहिल.